
# हाकारा

वर्ष : चौदावे अंक पहिला व दुसरा



# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

**स्फूर्तिस्थान / प्रेरणा :** *कै. प्रा. गं. बा. सरदार*

## -: कार्यकारी मंडळ :-

**अध्यक्ष** : डॉ. पी. व्ही. सुखात्मे (पद्मभूषण)

**उपाध्यक्ष** : प्रा. व्ही. जी. पेंढारकर

**मुख्य सचिव** : प्रा. रा. के. मुटाटकर

**सहसचिव** : डॉ. पराग माणकीकर

**खजिनदार** : डॉ. व्ही. एस. कुलकर्णी

**सभासद** : डॉ. एन. एस. देवधर

: श्रीमती मीरा तडवी

: डॉ. बी. व्ही. भानू

: डॉ. मिलिंद बोकील

: डॉ. एस. जी. देवगांवकर

: ॲड. पद्माकर वळवी

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता !

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक

# हाकारा

## — अनुक्रमणिका —

संपादकीय ....................................................... २

१) आदिवासींचा धर्म – एक मानवशास्त्रीय परिचय : डॉ. लता छत्रे ....................... ४

२) महाराष्ट्रातील वारली आदिवासी आणि त्यांचा धर्म : प्रा. अंजली कुरणे ............ १२

३) कोलाम – धार्मिक स्थिती : डॉ. प्रकाश गंभीर ............................................ १७

४) माडिआ गोंडांचे धार्मिक जीवन : डॉ. शौनक कुलकर्णी .................................. २०

५) 'बुडवा' पावरांच्या धार्मिक जीवनातील महत्त्वाची व्यक्ती : डॉ. प्रकाश गंभीर....... २५

६) सातपुड्यातील आदिवासींचे देव आणि देवता : डॉ. लता छत्रे ......................... ३२

७) निसर्गोपासक भिल्ल : डॉ. शौनक कुलकर्णी .................................................. ३५

८) उत्सवप्रिय संथाल : डॉ. लता छत्रे ............................................................ ४०

९) जव्हारच्या परिसरात साजरा होणारा 'बोहाडा' : दयानंद मुकणे ....................... ४५

१०) 'काज' वारली आदिवासींची आत्म्याविषयीची संकल्पना : डॉ. लता छत्रे ........... ४९

११) 'होळी' आदिवासींचा खास सण : डॉ. लता छत्रे ............................................ ५३

१२) जुन्नर परिसरातील महादेव कोळ्यांचे सण आणि उत्सव : डॉ. लता छत्रे ........... ५६

१३) इंग्रजी ग्रंथ परिचय : सुषमा सोनक ........................................................... ६०

वर्ष चौदावे : अंक पहिला-दुसरा
जानेवारी-जून १९९३

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.
फोन : ३३७२१९

**संपादक**
रामचंद्र मुटाटकर
**कार्यकारी संपादक**
ग. शां. पंडित
**मुखपृष्ठ**
डॉ. बी.व्ही. भानू

मूल्य रु. २०/-

**प्रकाशक**
रा. के. मुटाटकर
सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
यांच्यासाठी,
**मे. इंप्रेशन्स**
३३६०/४, लिंगराज कॉलेज समोर,
गोंधळी गल्ली, क्रॉस रोड,
बेळगांव – ५९० ००२.
फोन : २१३०९
येथे छापून प्रसिद्ध केले.

अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी किंवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# संपादकीय ...

'आदिवासी सण आणि उत्सव' या विषयावरील हा अंक म्हणजे आदिवासींच्या जीवनाचे, त्यांच्या संस्कृतीचे वेगळेपण दाखवून देणारा वैशिष्ट्यपूर्ण विशेषांक आहे.

आदिवासी आणि निसर्ग यांचे अतूट नाते आहे. त्यामुळे ते निसर्गोपासक असणे अपरिहार्य आहे. साहजिकच निसर्गात आढळणाऱ्या विविध वृक्ष, प्राणी व अमानवी गोष्टींना ते देव मानून त्यांची पूजा-अर्चा करतात. त्यांच्या देव-देवतांची नावे सुद्धा निसर्गाशी नाते सांगणारी आहेत. उदा. हिरवा, हिमाई, कणसरी, धरतरी, वाघदेव, तसेच महादेव, भिमदेव, भैरोबा, खंडोबा, मारुती इत्यादी. यातल्या काही देवदेवतांची उदा. महादेव, खंडोबा, मारुती इ. या देवतांची उपासना हिंदूंमध्ये महत्त्वाची मानली गेली आहे; त्यामुळे हिंदू धर्मातील लोक ते आपले देव मानतात. आदिवासी सुद्धा हेच देव पूजित असल्यामुळे ते हिंदू आहेत असा दावा हिंदू धर्मीय करताना दिसतात. परंतु महादेव या दैवताच्या बाबतीत विचार केला तरी असे आढळते की, हा देव पर्वतावर निवास करणारा, वल्कले नेसणारा व हातात डमरू, गळ्यात सर्प धारण करणारा देव हिंदूंचा कसा म्हणता येईल? मारुतीच्या बाबतीतही असेच म्हणता येईल.

आणखी एका बाबतीत आदिवासींवर हिंदू किंवा मुस्लिम धर्म लादण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. तो असा की आदिवासी त्यांचे काही खास सण-उत्सव साजरे करतात. त्यामध्ये नव्याचा सण, कोवळीचा सण, भंगोऱ्या सण, गाव दिवाळी, वाघबारस असे काही आदिवासींचे म्हणविले जाणारे सण आहेतच, शिवाय दसरा, दिवाळी, होळी, संक्रांत मोहरम, हे सण साजरे करण्याची त्यांची विशिष्ट पद्धत आहे. या दसरा-दिवाळी, होळी, मोहरम सारख्या सणांना हिंदू- मुस्लिमांमध्ये विशेष स्थान आहे. या धर्माची संस्कृती, परंपरा, प्रथा, रुढी यांचे प्रतिबिंब त्यांत उमटलेले आहे, त्यामुळे हे सण साजरे करणाऱ्या जाती-जमाती हिंदू किंवा मुस्लिम आहेत असे म्हटले जाते. परंतु बऱ्याचशा लोकांना व अभ्यासकांना आदिवासी जीवनाबद्दल व त्यांच्या संस्कृतीविषयी अपुरी माहिती असल्याचे दिसते. त्यांच्याविषयीचे गैरसमज या लोकांमध्ये अधिक आहेत. दसरा, दिवाळी, होळी किंवा मोहरम हे सण म्हणजे केवळ आदिवासींमधील नामसदृश गोष्टी आहेत असे म्हणावे लागेल. कारण आदिवासींमध्ये साजरी होणारी दिवाळी आणि हिंदूमध्ये साजरी होणारी दिवाळी यात विलक्षण फरक आहे. आदिवासींमध्ये दिवाळी किंवा इतर कुठलाही सण १०-१०, १५-१५ दिवस चालतो. त्यांच्यात करंज्या, लाडूसारखे फराळाचे पदार्थ नसतात,

फटाके वगैरेंची आतषबाजी नसते की नवे-नवे कपडे घालून मिरविण्याची हौस नसते. कोणताही सण असो किंवा उत्सव असो 'दारू पिणे व ढोलाच्या तालावर धुंद होऊन नाचणे-गाणे, रात्र-रात्र जागवणे हीच त्यांची सण-उत्सव साजरा करण्याची पद्धत. वेळ-काळाचे बंधन त्यांना नाही. आपापल्या सोयीनुसार सणोत्सव साजरे करून मुक्त जीवनाचा, आनंदाचा उपभोग घेणे हीच त्यांची परंपरा आहे.

अलीकडे काही महादेव कोळी, कोकणांसारख्या आदिवासींमध्ये शिक्षित लोकांचे प्रमाण वाढल्यामुळे ते हिंदूंच्या रीतीरिवाजांचे, सण-उत्सवांचे अनुकरण करू लागले आहेत. परंतु म्हणून काही ते हिंदू झाले असे म्हणता येत नाही. आदिवासींमध्ये शिकून-सवरून शहाणे झालेले काही कार्यकर्ते इतर प्रतिष्ठित म्हणविल्या गेलेल्या कुठल्याही धर्माचे अनुयायीत्व मान्य करीत नाहीत. परंतु अशा कार्यकर्त्यांनी केवळ अनुयायीत्व नाकारून काही होणार नाही. उलट त्यांनी आपल्या संस्कृतीचा अभ्यास करून आपली संस्कृती कशी वेगळी आहे, आपला धर्म कोणता आहे हे दाखवून द्यायला हवे तरच इतरांचे धार्मिक आक्रमण थोपावता येईल.

खरे तर आदिवासी हे कुठल्याही धर्माचे होऊच शकत नाहीत. कारण धर्मांचा संबंध जातीशी लावला जातो. आणि आदिवासी ही जात नसून जमात आहे. त्यामुळे त्यांचा स्वतःचा असा वेगळा धर्म आहे, व त्याचे स्वरूप त्यांच्या विशिष्ट अशा संस्कृतीतून, रीतीरिवाज, परंपरा, सण-उत्सव आदिंमधून दिसून येते. एवढेच नव्हेतर आदिवासींच्या प्रत्येक जमातीचे स्वतःचे असे वेगळेपण असते.

या अंकात व्यक्त झालेले काही विचार किंवा मते आदिवासी कार्यकर्ते, अभ्यासकांना रुचतील किंवा पटतीलच असे नाही. अशा लोकांनी त्यांच्या या विषयीच्या प्रतिक्रिया व अभिप्राय आम्हाला जरूर कळवावेत. त्यांचे निश्चितच स्वागत होईल.

**-- संपादक**

# आदिवासींचा धर्म-एक मानवशास्त्रीय परिचय

डॉ. लता छत्रे

धर्म हा मानवी संस्कृतीचा अविभाज्य घटक आहे. मानवी जीवनातील समस्या सोडवून मानवी संस्कृतीची प्रगती होण्यासाठी धर्माला अनन्यसाधारण महत्त्व आहे. परंतु धर्माचे स्वरूप समजून घेणे जितके महत्त्वाचे आहे तितकेच ते अवघडही आहे. वेगवेगळया धार्मिक नेत्यांनी आणि तत्त्ववेत्यांनी धर्माचे स्वरूप सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. सर्वसाधारणपणे असे म्हटले जाते की धर्म म्हणजे अहिंसा, सत्य, मैत्री, करुणा, मुदिता आदी तत्त्वांचा प्रसार आणि प्रचार करणारी विचार प्रणाली. कधी कधी असेही सांगितले जाते की धर्म म्हणजे मानवी जीवनाविषयीचे आदर्श सांगणारी, मानवाचे सामाजिक आणि नैतिक जीवन घडविणारी तत्त्वप्रणाली. परंतु आदिवासींच्या धर्माचे स्वरूप बघता धर्माचे वर सांगितलेले स्वरूप अपुरे पडते आणि धर्म म्हणजे काय याचे अध्ययन करण्याची गरज भासते. कारण सुसंस्कृत समाजातील धर्माचे स्वरूप आणि आदिवासी समाजातील धर्माचे स्वरूप भिन्न आहे. सुसंस्कृत समाजातील धर्माला शास्त्राचा आधार असतो. त्यांच्या धर्माचे स्वतंत्र ग्रंथ असतात. परंतु आदिवासींचा धर्म काहीसा अ-शास्त्रीय आणि अंधश्रद्धेवर आधारलेला असतो. त्यांचे धर्मविषयक ग्रंथ नसतात तर त्यांच्या धर्माचे दर्शन त्यांचे देव, उत्सव, लोकगीते आणि लोककथा यांच्यातून होते. असे असले तरी धर्माचा इतिहास समजून घेण्यासाठी आणि आदिवासींच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आदिवासींच्या धर्माचा परिचय असणे आवश्यक आहे.

आदिवासींच्या धर्माचा अभ्यास प्रामुख्याने मानवशास्त्रामध्ये केला जातो. आदिवासी धर्माचे स्वरूप समजून घेण्याच्या दृष्टीने मानवशास्त्रज्ञांनी आदिवासी संस्कृतीचा अविभाज्य घटक असणाऱ्या आदिवासी धर्माविषयी विविध उपपत्त्या आणि संकल्पना मांडलेल्या आहेत. आदिवासींच्या धर्माचे स्वरूप समजून घेण्यासाठी उपपत्त्यांचे आणि संकल्पनांचे स्वरूप काय आहे याचा **विचार** प्रस्तुत लेखामध्ये केलेला आहे.

आदिवासी धर्म म्हणजे मानवाचे सुरवातीचे धार्मिक जीवन. सर इ.बी. टेलर आणि सर जेम्स फ्रेझर यांनी मानवाच्या इतिहासात धर्माचा उगम कसा झाला याचा अभ्यास करताना आदिवासी धर्म (Primitive Religion) हा वर्णनात्मक शब्दप्रयोग केला. याचा अर्थ धर्माची अगदी सुरुवातीची अवस्था.

सर इ.बी. टेलर यांच्यामते आदिवासी धर्म म्हणजे आदिवासी मनुष्याचा आदिदैविक शक्तीवर असलेला विश्वास. तर सर जेम्स फ्रेझर यांच्यामते धर्म म्हणजे मानवी जीवन आणि निसर्ग यांना अंकीत करणाऱ्या, त्यांच्यावर वर्चस्व गाजविणाऱ्या अशा अमानवी शक्तीची आराधना. हर्बट स्पेन्सर यांच्यामते जगातील सर्व वस्तूंना निर्माण करणारी ज्ञानातीत शक्ती म्हणजे धर्म. थोडक्यात आदिवासी धर्म म्हणजे असा धर्म की जो अतिशय प्राथमिक स्वरूपाचा आहे. तसेच आदिवासी धर्म हा अशा लोकांचा धर्म आहे की ज्यांचा सुसंस्कृत समाजाशी सांस्कृतिक संबंध आलेला नाही.

मानवशास्त्रज्ञांनी सांगितलेले विचार अधिक स्पष्ट होण्यासाठी आपण थोडे खोलात जाऊन धर्म म्हणजे काय याचा विचार करू.

इंग्रजीमधील (Religion) या शब्दाचा धर्म हा मराठी अनुवाद आहे. (Religion) हा शब्द लॅटिनमधील (Religion) यापासून आलेला आहे. या शब्दातसुद्धा मूळ (Leg) किंवा (Lig) हे शब्द आहेत. लॅटिन (Leg) म्हणजे गोळा करणे किंवा निरिक्षण करणे तर (Lig) म्हणजे शोधणे किंवा शोध घेणे. वरील दोन्हीही शब्द लक्षात घेतले तर असे दिसते की धर्म म्हणजे व्यक्तीचा दैवीशक्ती-वरील विश्वास आणि तिचे त्या शक्तीबद्दलचे निरीक्षण होय. या अर्थाने धर्मामध्ये मनुष्य आणि दैवी शक्ती यांना जेणे करून एकत्र बांधले जाईल अशा आवश्यक त्या कर्मकांडाचा अंतर्भाव होतो. थोडक्यात सांगायचे झाले तर धर्म म्हणजे व्यक्तीचा दैवी शक्तीवरील विश्वास आणि या दैवी शक्तीशी संबंध प्रस्थापित करण्याचा त्याचा प्रयत्न.

समाजात रहात असताना मनुष्यापुढे विविध प्रकारच्या समस्या असतात. या समस्या सोडविण्याचा प्रयत्न मनुष्य नेहमीच करीत असतो. परंतु काही वेळेस त्याचे हे प्रयत्न असफल होतात. जीवनात उद्भवणाऱ्या अनेक घटनांचा, अनेक प्रश्नांचा त्याला अर्थ लावता येत नाही, त्याची विचारशक्ती खुंटते. अशावेळेस तो विचारांचा वेगळा मार्ग अवलंबितो. तो विचार करतो की ज्याअर्थी केलेले सर्व प्रयत्न अयशस्वी होत आहेत, प्रश्न अनुत्तरीत रहात आहेत त्याअर्थी या जगात कोणती तरी अज्ञात शक्ती अस्तित्वात असली पाहिजे की ज्या व्यक्तीच्या जीवनात घडणाऱ्या घटनांवर नियंत्रण ठेवते. मनुष्य या अज्ञात, दैवी शक्तीवर केवळ विश्वासच ठेवत नाही तर तो असाही विचार करतो की जीवनातील हव्याहव्याशा वाटणाऱ्या घटना आणि नको असणाऱ्या घटना जर ही दैवी शक्तीच ठरवीत असेल तर पाहीजे असणाऱ्या घटना घडण्यासाठी आणि नको असणाऱ्या घटना टाळण्यासाठी या शक्तीची आराधना करण्यास काय हरकत आहे? मनुष्याच्या या प्रकारच्या विचारातूनच या शक्तीच्या प्रार्थनेचे आणि आराधनेचे विविध मार्ग हे कर्मकांड आणि रीतीरिवाज या स्वरूपात पुढे आले.

अयशस्वी प्रयत्न यशस्वी व्हावेत म्हणूनच केवळ धर्माची निर्मिती झाली असे नाही तर फार पूर्वी म्हणजे मनुष्य जेव्हा भटक्या अवस्थेत होता, त्याची विचारशक्ती जेव्हा प्रगल्भ नव्हती तेव्हा साहजिकच निसर्गात दिसून येणारी दिवस-रात्र, ऋतुचक्र यांच्यातील सुसंगती पाहून त्याला आश्चर्य वाटले. त्याचप्रमाणे भूकंप, वादळ, दुष्काळ आदी निसर्गाचा रूद्रावतार पाहून त्याला निसर्गाची भीती वाटली. निसर्गाबद्दल वाटणाऱ्या या आश्चर्य आणि भीतीयुक्त आदरातून निसर्गाची उपासना करण्याची प्रवृत्ती मानवामध्ये निर्माण झाली आणि यातूनच धर्माची निर्मिती झाली असे काही मानवशास्त्रज्ञांचे मत आहे. निसर्गाबद्दल मानवाला वाटणारे प्रेम, विश्वास आणि आदर हा प्रत्येक व्यक्तीनुसार आणि समाजानुसार जसा बदलत जातो त्यानुसार निसर्गाची उपासना करण्याचे मार्गही भिन्न भिन्न असतात.

प्रसिद्ध मानवशास्त्रज्ञ डरखीम आणि ब्राऊन यांनी धर्माचे स्वरूप सामाजिक दृष्टिकोनातून विशद केले. असे करीत असताना त्यांनी श्रद्धा आणि विधी या धर्माच्या दोन अंगांची सविस्तर चर्चा केली. श्रद्धा आणि विधी ही धर्माची दोन अंगे आहेत. मनुष्य हा विचारशील आणि चिंतनशील प्राणी आहे. त्यामुळेच एखाद्या व्यक्तीवर किंवा शक्तीवर तो सहजासहजी श्रद्धा ठेवत नाही तर तो त्याला वेळोवेळी येणारे अनुभव तर्काच्या कसोटीवर तपासून पाहतो आणि तर्काच्या कसोटीवर जर ते अनुभव उतरले तरच त्यांचा तो स्वीकार

करतो. त्याप्रमाणेच असेही म्हणता येईल की मनुष्याची श्रद्धा हीसुद्धा त्याच्या विचारांचा परिणाम आहे.

एकदाका व्यक्तीची श्रद्धा एखाद्या शक्तीवर बसली की मग तिला ती शक्ती म्हणजे सर्वस्वच आहे असे वाटू लागते. जीवनातील चांगल्या वाईट घटना घडविण्याचे सामर्थ्य त्या शक्तीमध्येच आहे असा त्याचा विश्वास बसतो या शक्तीच्या सहाय्याने जीवनात चांगल्या घटना घडाव्यात आणि वाईट घटना घडू नयेत म्हणून व्यक्ती या शक्तीची उपासना करण्यास सुरवात करते. या उपासनेचे स्वरूप कायिक म्हणजे नमस्कार करणे, वाचिक म्हणजे स्तोत्र, मंत्रपठन आदिवासींच्या बाबतीत लोकगीतं आणि मानसिक म्हणजे ध्यानधारणा अशा प्रकारचे असते. काहीवेळेस मनुष्य त्याच्या अंगी असणाऱ्या गुणांमुळे तसेच सामाजिक मानदंडामुळे या शक्तीची उपासना करण्यास असमर्थ ठरतो. अशावेळेस मनुष्य जी व्यक्ती अशाप्रकारे उपासना करण्यामध्ये तरबेज आहे तिच्या मदतीने या शक्तीची उपासना करतो. आदिवासी समाजात भगत किंवा बडव्याला असणारे महत्त्व हे त्यामुळेच आहे. अशा प्रकारे एखाद्या शक्तीची उपासना करणे हे धर्माचे कर्मात्मक किंवा विधीरूप स्वरूप आहे.

जेव्हा एखादी व्यक्ती एखाद्या शक्तीची उपासना करत असते तेव्हा तिच्या मनात त्या शक्तीविषयी आदर, प्रेम आणि पावित्र्य आदिभावना असतात. त्यामुळेच अशी उपासना करीत असताना स्थल, काल आणि व्यक्ती यांच्याबाबतीत शुद्धता आणि पावित्र्य बाळगले जाते.

श्रद्धा आणि विधी या धर्माच्या अंगाचे स्वरूप केवळ धार्मिक नाही तर सामाजिकही आहे. प्रसिद्ध मानवशास्त्रज्ञ डरखीम यांनी धर्माची 'धर्म म्हणजे श्रद्धा व आचारविधी यांचे संकलन होय. यांचा संबंध पवित्र वस्तूशी असतो, अशी व्याख्या करून श्रद्धा आणि विधी यांचे सामाजिक स्वरूप स्पष्ट केले. त्यांच्यामते प्रत्येक वस्तूच्या ठिकाणी काही अंगभूत असे सद्‌गुण असतात. त्यामुळेच अशा वस्तूबद्दल लोकांच्या मनात श्रद्धा, पूज्यभाव आदर आणि पावित्र्य असते. या विशिष्ट प्रकारच्या भावनेमुळे त्या वस्तूंचा गैरवापर न होता त्याचे पावित्र्य आणि मांगल्य राखण्याचा प्रयत्न केला जातो. परिणामी कोणतेही अनैतिक कृत्य न करता नैतिक कृत्य करण्याकडेच लोकांचा कल असतो.

डरखीमच्या मतानुसार समाजही अशाच वस्तूपैकी एक मूर्त पण आध्यात्मिक वस्तू आहे. धर्म हा या समाजाचा एक अमूर्त घटक असून आचार, विचार आणि ध्येय यांच्याबाबतीत धार्मिक समानता असणारे लोक एकत्र येऊन समाज निर्माण होतो. अशा प्रकारच्या समाजाबद्दल लोकांच्या मनात आदर, प्रेम, पावित्र्य आणि मांगल्य आदी भावना असतात. या त्यांच्या भावनेला जेणेकरून धक्का लागेल असे अनैतिक कृत्य व्यक्तीच्या हातून घडत नाही, उलट या भावनांची वृद्धी व्हावी म्हणून नैतिक कृत्यच व्यक्तीच्या हातून घडते. म्हणूनच डरखीमच्या मते समाज हा पवित्रवस्तूंच्या पवित्रपणाचे उगमस्थान आहे.

त्यांच्यामते व्यक्तीमध्ये असणारी ही धार्मिक श्रद्धा चिरस्थायी करण्याचे कार्य विधी करतात. विधींमध्ये समाजाचे ऐक्य प्रतिबिंबित होऊन ज्या समान धार्मिक श्रद्धांवर समाजाची उभारणी असते त्यांना स्थैर्य, सुव्यवस्था प्राप्त होते आणि समाजात नवीन बदल होण्यास मदत होते.

अशा तऱ्हेने डरखीमच्या मते श्रद्धा आणि विधी या धर्माच्या अंगांचे स्वरूप सामाजिक असून समाजात स्थैर्य आणि सुव्यवस्था प्रस्थापित करणे हे त्याचे कार्य आहे. ब्राऊन यांनीही धर्माच्या श्रद्धा आणि विधी या अंगांचे स्वरूप सामाजिक

दृष्टिकोनातून सांगितले. त्यांच्यामते व्यक्तीच्या श्रद्धांमध्ये ज्याप्रमाणात बदल होतात, त्याप्रमाणात विधीमध्ये होत नाहीत. व्यक्तीला येणारे अनुभव आणि शिक्षण यांच्यामुळे व्यक्तीच्या एखाद्या गोष्टीवरील श्रद्धा बदलतात. श्रद्धा या परिवर्तनशील असतात. तर विधी हे तुलनेने कमी परिवर्तनशील असतात. त्यामुळेच समाजाच्या धारणेसाठी आवश्यक असणाऱ्या विधीमध्ये सहसा बदल होत नाहीत. परिणामी असे अनेकदा दिसते की व्यक्तीची श्रद्धा नसली तरी ती विशिष्ट आचार करीत असते.

अशा तऱ्हेने ब्राऊन यांच्यामते विधी हे स्थिर भावांचे नियमबद्ध व सांकेतिक आविष्कार आहेत. विधीमुळे समाजातील व्यक्ती-व्यक्तीमधील संबंध नियंत्रित होतात. त्यामुळेच समाजधारणा करणे हे विधींचे महत्त्वाचे कार्य आहे.

धर्माच्या संदर्भात जेव्हा आपण श्रद्धा आणि विधि यांचे स्वरूप बघतो तेव्हा आपल्या असे लक्षात येते की व्यक्ती ज्या अमानवी, अभौतिक शक्तीवर श्रद्धा ठेवते त्या शक्तीचे स्वरूपही विविध प्रकारचे आहे. काहींच्या मते अमानवी शक्ती दोन प्रकारची आहे. विधायक आणि विध्वंसक किंवा संहारक मनुष्य या दोन्हीही प्रकारच्या शक्तींना प्रसन्न करण्यासाठी त्यांना मूर्त स्वरूप देण्याचा प्रयत्न करून त्या मूर्तस्वरूपाची आराधना, पूजा करतो. अमानवी शक्तीचे हे मूर्त स्वरूप प्रतीकात्मक असते. काही वेळेस आपल्याला असे दिसते की काही समाजामध्ये असा समज असतो की त्या समाजातील लोकांची उत्पत्ती विशिष्ट वस्तूपासून झाली आहे. अशा विशिष्ट वस्तूला ते कुल मानतात. ती वस्तू त्या कुलाचे चिन्ह मानले जाते. या कुलचिन्हाची पूजा केली जाते.

आदिवासी धर्माचे स्वरूप जसे धार्मिक आणि सामाजिक आहे, त्याप्रमाणेच आदिवासी धर्माचा उगम का झाला याची कारणेही धार्मिक आणि सामाजिक आहेत. काही मानवशास्त्रज्ञांच्या मते आदिवासी धर्माचा उगम हा मानवाच्या अमानवी शक्तीवर असलेल्या विश्वासातून झाला तर काही मानवशास्त्रज्ञांच्या मते आदिवासी धर्माचा उगम हा समाजाची धारणशक्ती म्हणून झाला. आदिवासी धर्माविषयी असणाऱ्या या दोन्ही विचारसरणींचा विचार आपण आता करू.

### १ ) सर्वात्मवाद ( Animism )

प्रसिद्ध मानवशास्त्रज्ञ इ.बी. टेलर यांनी धर्माच्या उगमाविषयीची ही उपपत्ती मांडली. यालाच सर्ववस्तू चेतनावाद, जडचेतनावाद, आत्मवाद किंवा सजीवत्ववाद असेही म्हणतात. त्यांच्या मते आदीकालीन मानवाला जागेपणी तसेच झोपेमध्ये विशिष्ट अनुभव येत असावेत. जसे झोपेत असताना स्वप्नां-मध्ये त्याला त्याचे पूर्वज दिसत, तर जागेपणी कधी मृगजळ दिसे, तर कधी नदी किनाऱ्यावरून हिंडताना पाण्यामध्ये त्याला त्याचेच प्रतिबिंब दिसे, तर कधी कधी डोंगरदऱ्यांमधून हिंडताना त्याने घातलेली साद प्रतिध्वनी रूपाने पुन्हा ऐकायला येई. या अनुभवांचे आकलन करून घेणे म्हणजे जणू त्याला एक बौद्धिक आव्हानच होते. या आणि अशा प्रकारच्या अनुभवांचे त्याला जरी आकलन होत नसले तरी या अनुभवांवर त्याने विचार करण्यास सुरवात केली असावी. विचाराअंती त्याच्या असे लक्षात आले असावे की दृष्टीगोचर न होणारी पण चैतन्यरूपी अदृश्यशक्ती सर्व चरांचरांमध्ये वसलेली असली पाहिजे.

व्यक्तींमध्ये असणाऱ्या चैतन्यमय अदृश्य शक्तीच्या अस्तित्वामुळे व्यक्ती जिवंत असते, आणि ही शक्ती नाहीशी झाल्यामुळे व्यक्ती मृत होते. या चैतन्यरूपी अदृश्य शक्तीलाच आदीकालीन मानवाने आत्मा या नावाने संबोधले. टेलर यांच्यामते स्वप्नावस्थेत येणारा अनुभव, जागेपणी दिसणारे प्रतिबिम्ब, ऐकू

येणारा प्रतिध्वनी या प्रकारच्या विविध अनुभवांचा अन्वयार्थ लावत असताना या आदीकालीन मानवाने आत्म्याचे दोन प्रकार मानले ; एक मुक्त आत्मा आणि दुसरा बंध आत्मा. या मानवाचा असा विश्वास होता की हे दोन्हीही आत्मे मनुष्याच्या शरीरात वस्ती करून असतात. मुक्त आत्मा मनुष्याच्या शरीरातून केव्हाही बाहेर पडून विविध अनुभव घेऊ शकतो. मात्र बंध आत्मा शरीरातून बाहेर पडल्यावर मनुष्याला मृत्यू येतो. आत्मा अमर आहे कारण व्यक्तीच्या मृत्यूनंतरही मृत व्यक्ती स्वप्नामध्ये येऊन भेटते.

टेलर यांचा असा विश्वास आहे की अदृश्य आणि चेतनयुक्त अमानवी शक्तीबद्दल वाटणारी भीती आणि कुतूहल हा सुरुवातीच्या काळातील मानवाच्या धर्माचा गाभा होता. या अमानवी शक्तीला आपण आपल्या ताब्यात ठेवू शकत नाही , त्यामुळेच या शक्तीपासून आपल्याला कोणता अपाय होऊ नये आणि झाला तर त्याची मदतच व्हावी या विश्वासातूनच आदीकालीन मानवाने या अमानवी शक्तीची पूजा आणि आराधना करण्यास सुरवात झाली असावी. अशा तऱ्हेनेच पितरांच्या पूजेला सुरवात केली असावी. आजही अनेक आदिवासी जमातींमध्ये पितरांच्या पूजेची प्रथा आहे तसेच सर्वात्मवाद अस्तित्वात आहे. उदाहरणार्थ , 'हो' या आदिवासी जमातींमध्ये मृत व्यक्तीला दोनदा दहन करण्याची प्रथा आहे. व्यक्तीच्या मृत्यूनंतर व्यक्तीला लगेचंच जाळले जाते. मात्र या प्रसंगी व्यक्तीच्या प्रेताला जाळत नाहीत तर त्या प्रकारचा विधी केला जातो. व्यक्तीचे प्रेत तसेच ठेवले जाते. काही काळानंतर मृत व्यक्तीचा आत्मा परत येणार नाही असे समजून व्यक्तीचे प्रेत जाळले जाते.

**जीवित सत्तावाद आणि अलौकिक शक्ती ( Animatism & Mana )**

टेलरने मांडलेल्या धर्मविषयक उपपत्तीवर टीका करताना अनेक मानवशास्त्रज्ञांनी असे प्रतिपादन केले की धर्माची उत्पत्ती आणि उत्क्रांती कशी झाली यासंबंधी विचार केला असता असे दिसते की आदीकालीक मानवाचा आत्म्यावरील विश्वास ही धर्माच्या इतिहासातील नंतरची पायरी होय. धर्माच्या सुरुवातीच्या काळात मानवाचा अज्ञात अशा शक्तीवर विश्वास होता. ही शक्ती चैतन्यशील आहे असा त्याचा समज होता. शक्तीवर असणाऱ्या या त्याच्या विश्वासातूनच धर्माची उत्पत्ती झाली. धर्माच्या उत्पत्तीविषयीचा हा विचार अधिक स्पष्ट करण्यासाठी प्रसिद्ध मानवशास्त्रज्ञ मॅरेट यांनी 'माना' ही संकल्पना उपयोगात आणली. माना म्हणजेच ही अलौकिक शक्ती. मॅरेट यांच्यामते मानवाच्या धार्मिक जीवनाची सुरुवात सजीव आणि निर्जीव वस्तूमध्ये अनाकलनीय , अवैयक्तिक , चैतन्यशील आणि आदीनैसर्गिक शक्ती असते या विश्वासातून झाली.

**निसर्गवाद**

मॅक्स म्युलरने धर्माच्या उत्पत्तीविषयी सांगितलेले विचार हे निसर्गवाद म्हणून ओळखले जातात. पूर्वीच्या काळी मानवाचे जीवन सर्वस्वी निसर्गावरच अवलंबून होते. निसर्गामध्ये दिवस-रात्र , ऋतुचक्र इत्यादी बाबत दिसून येणारी सुसंगती तसेच वादळ , भूकंप इत्यादी घटनांमुळे त्याच्या मनात निसर्गाबद्दल प्रेम , आदर , भय अशा विविध भावना निर्माण झाल्या. जीवनात निसर्गातील सुसंगतीमुळे सुबत्ता यावी आणि वादळ , भूकंप , दुष्काळ आदि नैसर्गिक घटनांपासून जीवन सुसह्य व्हावे म्हणून या काळातील मानवाने निसर्गपूजेला सुरवात केली. अशा तऱ्हेने मॅक्स म्युलर यांच्यामते धर्माचा उगम हा निसर्गाच्या पूजेपासून झाला. आजही आपल्याला असे दिसते की काही आदिवासी जमातींमध्ये निसर्गवाद अस्तित्वात आहे. महाराष्ट्रातील बहुतेक आदिवासी जमातींचा मुख्य धंदा शेती आहे. शेतीच्या बाबतीतील

नांगरणी, पेरणी, खुरपणी इत्यादी कामांच्या सुरवातीला आदिवासी विशिष्ट देवांची पूजा करतात. जसे वारली आदिवासींमध्ये कणसरीची पूजा, कवळी भाजी आदी पूजा केल्या जातात.

अशा तऱ्हेने इ.बी. टेलर, मॅरेट आणि मॅक्स म्युलर यांच्यामते धर्माचा उदय हा मानवाच्या कोणत्या तरी अलौकिक, अदृश्य शक्तीवर असलेल्या विश्वासातून आणि त्या शक्तीविषयी वाटणाऱ्या आदरयुक्त भीतीपोटी झाला.

**कार्यवादी उपपत्ती ( Functionalism )**

रेडक्लिफ ब्राऊन, मॅलीनोवोस्की, आणि डरखीम यांच्या मते धर्माचा उगम हा कोणत्यातरी अलौकिक शक्तीवरील विश्वासातून झाला नसून धर्माचा उगम हा व्यक्तीच्या सामाजिक आणि वैयक्तिक गरजेमधून झाला.

डरखीमच्या मते समाजात धर्मामुळे ऐक्य निर्माण होते. श्रद्धा आणि विधी ही धर्माची दोन अंगे आहेत. धार्मिक श्रद्धा ही धार्मिक विचारांचा परिणाम आहे. तर धार्मिक विधी हे धार्मिक वर्तनाचा भाग आहे. त्यामुळेच धार्मिक विधींचे स्वरूप प्रतीकात्मक आहे. धार्मिक आचार, विचार आणि ध्येय समान असणाऱ्या व्यक्ती नेहमीच एकत्र येतात आणि संघटीत होतात. त्यामुळेच समाजात ऐक्य प्रस्थापित होऊन स्थैर्य प्राप्त व्हावे असे वाटत असेल तर समाजातील लोकांमध्ये आचार, विचार आणि श्रद्धा, विधी, यांच्याबाबतीत धार्मिक समानता असण्याची गरज आहे. धार्मिक विधींबद्दल लोकांच्या मनात आदराची आणि पूज्यतेची भावना असते म्हणजेच धार्मिक आणि नैतिक मूल्ये यांच्यात समानता असते. डरखीमच्या मतानुसार समाजामध्ये ऐक्य निर्माण करण्यासाठी धर्माची निर्मिती झाली, त्यामुळे धर्माचा उगम हा समाजामध्ये सापडतो.

मॅलिनोवोस्की यांनी धर्माचा संबंध मानवाच्या भावनांशी जोडला. जीवनात मानवाला विविध प्रकारचे अनुभव येत असतात. या अनुभवांना अनुसरून मानवाच्या मनामध्ये द्वेष, हाव, राग, लोभ आदी भावना निर्माण होतात. परिणामी मानवी जीवनात ताण आणि तणाव निर्माण होतात. मानवाच्या जीवनात जर हे ताण आणि तणाव दीर्घकाळ राहीले तर त्यामुळे त्याच्या जीवनात नैराश्य येण्याची शक्यता आणि दूरान्वयाने त्याचा समाजावर वाईट परिणाम होऊ शकतो. त्यामुळे मनुष्याची समाजात रहात असताना होणारी प्रत्येक कृती ही तणावरहित होण्याची आवश्यकता असते. आणि धर्मामुळे मनुष्याची कृती ही तणावरहित आणि अर्थपूर्ण होते. थोडक्यात मॅलिनोवोस्कीच्या मते व्यक्तीच्या जीवनात समतोल आणि स्थिरता आणण्याचे महत्त्वाचे कार्य धर्मामुळे होते. मॅलीनोवोस्कीने मानवी जीवनातील नैराश्य दूर करण्याचे धर्म हे एक माध्यम आहे असे सांगितले.

ब्राऊन यांना मॅलीनोवोस्की यांचे म्हणणे मान्य नव्हते. त्यांच्यामते धर्माचे कार्य व्यक्तीच्या मनामध्ये निर्माण होणारी भीती किंवा भावनिक ताण दूर करणे हे नसून मानवी मनामध्ये जबाबदारीची जाणीव निर्माण करणे हे होय. कारण समाजाचे अस्तित्व हे व्यक्तीच्या अस्तित्वापेक्षा महत्त्वाचे असते. समाजाच्या अस्तित्वावर व्यक्तीचे अस्तित्व अवलंबून असते. तथापि असे दिसते की समाजात रहात असताना जबाबदारीची ही जाणीव व्यक्तीला नसते. आणि म्हणून व्यक्ती तिच्या मनात येईल तसे वागते. जर प्रत्येक व्यक्ती अशा प्रकारे जबाबदारीने न वागता तिला तसे वाटते म्हणून जर वागण्याचा प्रयत्न करेल तर त्यामुळे समाजात गोंधळ, अशांतता माजेल. परिणामी समाजात कोणतीही संघटक कृती होणे केवळ अशक्य होईल. म्हणून समाजात रहात असताना व्यक्तीच्या कृतीवर बंधन असणे आवश्यक असते. धर्मामुळे व्यक्तीच्या मनात



03233 3A

जबाबदारीची जाणीव निर्माण होते. ब्राऊन यांच्यामते धर्म मानवी मनामध्ये दोन प्रकारच्या सामाजिक जबाबदाऱ्या निर्माण करतो. व्यक्ती आणि सामाजिक नियम यांच्यात ऐक्य राहील आणि समाजाचे अस्तित्व अबाधित राहील अशाच प्रकारची कृती व्यक्तीकडून करवून घेणे. सामाजिक कृतीला आदीदैविक शक्ती विषयीच्या भीतीचा आधार देऊन धर्म अशा प्रकारे व्यक्तीकडून सामाजिक कृती करवून घेतो.

अशा तऱ्हेने डरखीम, ब्राऊन आणि मॅलिनोवोस्की यांनी समाजाच्या स्थैर्यासाठी, समाजाच्या धारणेसाठी धर्माचा उगम झाला असे प्रतिपादन केले.

आदीमानवी किंवा आदीदैविक शक्ती या दोन प्रकारच्या मानल्या जातात. एक म्हणजे मानवाला हितकारक असणाऱ्या म्हणजेच मानवाचे हित करणाऱ्या आणि दुसऱ्या म्हणजे मानवाला अहितकारक असणाऱ्या म्हणजेच मानवाचे अहित करणाऱ्या. भूताखेतांविषयीच्या आदीमानवशक्ती या दुसऱ्या प्रकारात मोडतात तर देवदेवतांच्या संबंधी असणाऱ्या आदीमानवीशक्ती या पहिल्या प्रकारात मोडतात. पहिल्या प्रकारच्या देवदेवतांमध्ये काही देवदेवता मुख्य मानल्या जातात तर काही देवदेवता ह्या कनिष्ठ मानल्या जातात. वेगवेगळया प्रकारचे विधी करून या दोन्हीही शक्तींना प्रसन्न करून घेण्याचे प्रयत्न केले जातात.

परंतु अनेकदा असे विधी करूनही मानवाचे इप्सित साध्य होत नाही. अशा वेळेस मनुष्य या दैवीशक्तींवर वर्चस्व गाजविण्याचा, त्यांना अंकीत करण्याचा प्रयत्न करतो. मानवाच्या या प्रयत्नांनाच आपण जादू, चेटूक इत्यादी नावांनी संबोधतो. जादू म्हणजे काय याची सविस्तर चर्चा आपण आता करणार आहोत.

**जादूविद्या**

धर्माचे स्वरूप बघताना आपण असे पाहिले की धर्म म्हणजे मानवांचा कोणत्या ना कोणत्या तरी आदीदैविक आणि अमानवी शक्तीवरील विश्वास आणि त्या शक्तीला कर्मकांड करून प्रसन्न करून स्वतःचे ध्येय साध्य करण्यासाठी चाललेले मानवाचे प्रयत्न. परंतु अनेकदा कर्मकांड, पूजा-अर्चा करूनही ही शक्ती प्रसन्न होत नाही आणि येणारी संकटे मनुष्य टाळू शकत नाही. अशावेळी मनुष्य मंत्रतंत्राचा वापर करून दुसऱ्या मार्गाचा म्हणजेच जादूचा उपयोग करतो. मनुष्य जादूच्या सहाय्याने जेव्हा एखादी गोष्ट साध्य करीत असतो तेव्हा त्याचा आदीदैविक शक्तीवर विश्वास असतो आणि त्या आदीदैविक शक्तीला अंकीत करून, तिच्यावर वर्चस्व गाजवून म्हणजेच पर्यायाने या शक्तीला साधन म्हणून वापरून मनुष्य स्वतःचे इप्सित साध्य करीत असतो. अशा तऱ्हेने जादूमध्येही श्रद्धा आणि विधी यांचा समावेश असतो. त्यामुळेच असे म्हणावे लागेल की जादूचे स्वरूप समजून घेतल्याशिवाय धर्माचे यथार्थ स्वरूप समजणे अवघड जाईल. म्हणूनच धर्माचा एक भाग असलेल्या जादूचे स्वरूप आपण बघणार आहोत.

जादूला पिशाच्चविद्या असेही संबोधले जाते. पिशाच्च विद्येमध्ये मांत्रिक किंवा जादूगार विशिष्ट मंत्रतंत्रांचा वापर करून विशिष्ट शक्तीला अंकीत करतो आणि तिच्या सहाय्याने ध्येयपूर्ती करतो. त्यामुळेच असे म्हणावे लागेल की पिशाच्च विद्या ही एक कला आहे.

या विद्येमध्ये मंत्रतंत्रांचा वापर विशिष्ट पद्धतीने करणे आवश्यक असते. एवढेच नव्हे तर त्यांचा उच्चारही विशिष्ट प्रकारेच केला पाहिजे. जादूमध्ये केले जाणारे विधीही ठराविक क्रमाने करणे आवश्यक असते. यामध्ये थोडाफार जरी बदल झाला तरी इप्सित साध्य होण्यामध्ये अडथळे निर्माण होतात. या दृष्टीने बघता पिशाच्चविद्या हे एक शास्त्र आहे. असे असले तरी ज्या अर्थाने

आपण विज्ञानाला शास्त्र म्हणतो त्या अर्थाने पिशाच्यविद्या हे शास्त्र नाही. विज्ञानामध्ये अनुभवाच्या आधारे, वस्तुनिष्ठ पद्धतीने आणि सुसंगतीने मिळविलेले ज्ञान निगमन आणि विगमन या पद्धतीच्या आधारे मांडले जाते. या ज्ञानाच्या आधारावर मांडलेले सिद्धान्त, तत्त्व आणि उपपत्त्या ह्या स्थलकाल निरपेक्ष असतात. तसेच विज्ञानाने सांगितलेल्या ज्ञानाचा उपयोग संपूर्ण मानव-जातीच्या भल्यासाठी केला जातो. पिशाच्च-विद्येच्या बाबतीत तसे नसते. पिशाच्चविद्या ही सदोष तर्कावर आधारित असते. तिचे स्वरूप स्थल-काल निरपेक्ष असे असू शकत नाही. पिशाच्चविद्येचा उपयोग मानवजातीच्या भल्यासाठी केला जाईलच असे नाही.

सर जेम्स फ्रेझर यांनी जगातील विविध भागांमध्ये जाऊन जादूविषयी अभ्यास केला आणि मिळविलेल्या पुराव्याच्या आधारे असे प्रतिपादन केले की कोणत्याही प्रकारची जादू ही दोन तत्त्वांवर आधारलेली असते.

**१) साधर्म्याचे तत्त्व**

या तत्त्वानुसार जादूगार किंवा मांत्रिक जेव्हा जादू करतो तेव्हा हे गृहित धरतो की समान गोष्टींपासून समान गोष्टीच निर्माण होतात. आदिवासींचा असा समज आहे की जी गोष्ट साध्य करावयाची त्या गोष्टीचे आपण अनुकरण केले की इप्सित गोष्ट साध्य होते. या तत्त्वाचा उपयोग अनुकरणात्मक जादूमध्ये केला जातो. छोटा नागपूरमधील काही आदिवासी जमातींमध्ये असा विश्वास आहे की ढगांच्या गडगडाटामुळे पाऊस पडतो, त्यामुळे त्यांना जेव्हा पाऊस पडावा असे वाटत असेल तेव्हा ते डोंगरमाथ्यावर जातात, कोंबडे किंवा डुक्कराचा बळी देतात आणि दगड धोंडे डोंगरावरून खाली घरंगळत सोडतात. असे करण्यामागे त्यांचा असा विश्वास आहे की दगडांच्या घरंगळयामुळे होणाऱ्या आवाजाने पाऊस पडेल. 'हो' या आदिवासी जमातीमध्ये पाऊस पडण्यासाठी अग्नी पेटवितात. असे करण्यामागे त्यांची अशी श्रद्धा आहे की अग्नीच्या धुरापासून पाऊस पडेल.

२) जादू करण्यामागील दुसरे तत्त्व असे आहे की एकदा संपर्क आला की तो कायमचाच राहतो. सांसर्गिक प्रकारच्या जादूमध्ये याचा उपयोग केला जातो. आदि-वासींचा असा विश्वास आहे की मानवाच्या शरीराचा आणि त्याच्या अवयवांचा उदा. केस, नखे इत्यादी तसेच तो वापरीत असलेल्या कपड्यांचा इतका घनिष्ट संबंध आहे की तो कपडा किंवा अवयव काही कारणामुळे अलग झाला तरीही तो घनिष्ट संबंध कायम रहातो. त्यामुळे शत्रूचा किंवा प्रतिस्पर्ध्याचा पाडाव करण्यासाठी त्याची नखे, केस इत्यादी गोष्टी जपून ठेवून त्या जाळल्या जातात. हेतू हा की अशा कृतीमुळे शत्रूला यातना होतील.

मॅलिनोस्की आणि रेमंड फर्थ यांनी उत्पादनशील, संरक्षणक्षम, आणि संहारक असे जादूचे तीन प्रकार मानले आहेत.

अशा तऱ्हेने मानवशास्त्रात आदिवासींच्या धर्माचा अभ्यास वेगवेगळया दृष्टीकोनातून केला जातो.

**संदर्भ ग्रंथ**


१) मानवशास्त्र सामाजिक व सांस्कृतिक
— डॉ. य. श्री. मेहेंदळे.

२) सामाजिक मानवशास्त्र
— प्रा. विलास संगवे.

# महाराष्ट्रातील 'वारली आदिवासी' आणि त्यांचा धर्म

-- प्रा. अंजली कुरणे

'वारली' जमात ही महाराष्ट्रातील आदिवासींमधील प्रमुख जमात आहे. लोकसंख्येच्या दृष्टीने या जमातीचा महाराष्ट्रामध्ये दुसरा क्रमांक लागतो. या जमातीची वस्ती प्रामुख्याने ठाणे जिल्हा, नाशिक जिल्ह्याचा पश्चिम भाग दमण व धरम भाग, डांग जिल्ह्यातील डोंगराळ भाग व गुजराथमधील सुरत जिल्ह्याच्या काही भागात आढळते. वारल्यामध्ये निहीर, मुरडे आणि 'डवर' या तीन प्रमुख पोटजाती आहेत; किंवा यांच्यामध्ये मुरडे, निहीर आणि, डावर अशी प्रादेशिक भिन्नता आढळते. 'डावर' जातीच्या या शब्दांसाठी अनुक्रमे अंट, तंट व कंट हे शब्द वापरतात. उंबरगाव भागात हे लोक जास्त आढळतात. 'निहीरे' या शब्दासाठी 'नाही रे नाही' हा शब्दप्रयोग ते करतात. पालघर, माहीम, जव्हार या भागात निहीरे वारली जास्त प्रमाणात आढळतात. ठाणे जिल्ह्यात मुरडे वारली आढळत नाही. पोट जातीप्रमाणे भुरके, निभारे, कुढवा, संस्कारा, भांगरा, जुरूडा, तेमाऱ्या, गुलाम, खानजोडे, दळवी, वळवी, लखात इ. कुळाचा देखील या जमातीत समावेश होतो.

महाराष्ट्रातील धरमपूर व त्याच्या आसपासच्या प्रदेशात या जमातीची वस्ती फार पुरातन काळापासून म्हणजे इ.स. पूर्वी ३०० वर्षापासून असावी असा शास्त्रज्ञांचा तर्क आहे. मात्र तपशीलवार माहिती उपलब्ध नाही. पण उपलब्ध असलेल्या भाषाविषयक पुराव्यावरून वारल्यांचा ६०० ते ७०० वर्षापासून पांढरपेशा समाजाशी संबंध आला असावा असे अनुमान काढले जाते. मेगॅस्थेनीसने आपल्या प्रवासवर्णनात या जमातीचा उल्लेख 'वारली' आणि ते राहत असलेल्या भू-प्रदेशाला 'वरलाट' असे म्हटले आहे.

'वारली' या जमातीला 'वारली' हे नाव कसे पडले असावे याबद्दल आज बरेच मतभेद आहेत. (१) काहींच्या मते 'वारली' जमात ही स्थलांतरीत जमात आहे. ती गुजरात आणि खानदेशच्या उत्तर भागातून ठाण्यात आली आहे. गुजरात ठाण्याच्या उत्तरेला आहे. उत्तर म्हणजे 'वर' म्हणजे वरल्याभागातून म्हणून 'वरली' किंवा 'वारली' असे या जमातीला नाव पडले. (२) इ.स. पूर्वी सुमारे ४०० वर्षे कात्यायान या भाष्यकाराने आपल्या संशोधनात निषाद, व्यास व वरूड या तीन अनार्यांचा उल्लेख केलेला आढळतो. म्हणून इतिहासकार राजवाडे यांच्या मते. वरूड या शब्दावरून वरूड = वरूडार = वारूली = वारली असा शब्द जन्माला आला असावा. (३) पौराणिक वाङ्मयात उल्लेख असलेल्या सात कोकण केरल, तुलाव, गोवराष्ट्र, कोकण, केरहट, वेरालट, बर्बर पैकी सहाव्या कोकणाला पेरालट असे म्हणतात. म्हणून या प्रदेशात राहणाऱ्या जमातीला 'वारली' असे म्हटले गेले की या जमातीवरून या प्रदेशाला 'वरलाट' हे नाव पडले हे सांगणे कठीण आहे, परंतु डॉ. विल्सन यांच्या मते 'वरलाट' या भूभागावर राहणारे लोक हे 'वारली' आहेत. 'वराल' म्हणजे नांगरलेला भाग म्हणून जे जमीन नांगरतात ते 'वारली.' (४)

लेथॅम यांच्या मते वारली ही भिल्लांचीच पोटजात आहे. कधीतरी या दोन जमाती एकत्र राहत असल्या पाहिजेत कारण त्यांच्या चालीरीति व संस्कृती यामध्ये पुष्कळच साम्य आढळते. (५) वारली जमातीत सुद्धा आपल्याला वारली हे नाव का पडले हे सांगणारे कोणी नाही. फक्त 'वटाळ' पसरवणारी जमात ही 'वारली' जमात असे कारण सांगितले जाते. 'वटाळ' म्हणजे जमिनीचा कस कायम राखण्यासाठी किंवा ती योग्य राखण्यासाठी 'वटाळ' या बारीक झाडाचा पालापाचोळा एकत्र करून जाळण्याची पद्धत असे. पण या कारणावरून एक निष्कर्ष असा काढता येतो की पुष्कळवेळा जमातीचे नाव हे त्या जमातीच्या धंद्याशी संबधित असते. वारल्याच्या देव देवतांच्या नावावरून उदा. वाघोबा, वाघ्या, हिमाई. वारली जमात ही द्रविड वंशाची असावी असा तर्क करतात. कारण 'ओबा' 'अय्या', 'अम्माई' हे प्रत्यय द्रविडी आहेत.

महाराष्ट्रातील वारली जमातीची भाषा मराठीच आहे. वारल्यांचे जीवन हे शेतकी-प्रधान आणि रूढीप्रिय आहे. कोणत्याही अयोग्य, अवैज्ञानिक गोष्टींचा त्याग करायला हे लोक अजूनही तयार नाहीत. उदा. शेतात राब भाजून त्यावर बी टाकण्याची पद्धती किंवा कोणत्याही दैवी शक्तीच्या कोपामुळेच आजार, पाऊस व मृत्यू होतो. इत्यादी नैसर्गिक घटना नाहीत असा यांचा समज आहे. (रूढीप्रियतेबरोबरच वारली जमात ही अतिशय कष्टकरी, प्रामाणिक, सत्यवचनी व सरळ स्वभावाची जमात आहे.) या जमातीच्या धार्मिक जीवनाचा आलेख प्रस्तुत लेखामध्ये केलेला आहे.

**धर्म**

आज संपूर्ण मानवी जीवनाला धर्माने व्यापून टाकले आहे. भूकेलेल्याला अन्न देणे, तहानलेल्याला पाणी देणे, या साध्या साध्या गोष्टीसुद्धा धर्मकृत्य समजल्या जातात. मग हा धर्म अस्तित्वात आला कसा? त्याची उत्पत्ती कशी झाली? याबद्दल अनेक कारणे सांगितली जातात. मानवी समाजाच्या इतिहासाकडे पाहिले तर धर्म ही फारच अलीकडची संस्था आहे. धर्माची उत्पत्ती आदिवासी जमातीच्या प्राथमिक अवस्थेत होणे शक्यच नाही. कारण त्याकाळी या लोकांना आपल्या टोळीशिवाय इतर जगच नव्हते. जंगलात शिकार करणे, कंदमुळे गोळा करणे, दगडी हत्याराने शेती करणे, एवढेच त्यांना माहीत होते. परंतु हिंस्त्र श्वापदाची भीती, निर्सगाची निरनिराळी गूढे उदा. सूर्य, चंद्र, ढग, पाऊस निर्सगाच्या चमत्कारिक घटना उदा. खूप पाऊस पडणे, नद्यांना पूर येणे, काही प्रदेश जलमय होणे, ढगांचा कडकडाट, वीज पडणे किंवा चमकणे या गोष्टी समजणे त्यांच्या आवाक्याबाहेरच्या होत्या. हिंस्त्र श्वापदापासून संरक्षण ते करू शकत नव्हते. आणि या सगळया गोष्टींचा त्यांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होत होता. साहजिकच या नैसर्गिक आपत्तीबद्दल त्यांच्या मनात भीती निर्माण झाली. म्हणून या सगळया गोष्टींचा त्रास कमी करण्यासाठी आपण त्यांची पूजा केली पाहिजे, आराधना केली पाहिजे, असे विचार आदिवासींच्या मनात आले आणि त्यांच्या उपासना पद्धतीचा उगम झाला. आदिवासींच्या या परंपरागत निसर्गपूजेच्या प्रकारात सर्व आदिवासींमध्ये सारखेपणा आढळतो. वारली जमातही याला अपवाद नाही. धान्य, कंदमुळे जमिनीत उगवतात, धान्यामुळे आपली गुजराण होते, म्हणून हे लोक धान्य म्हणजे 'कणसरी' आणि जमीन म्हणजे 'धरती'ची पूजा करतात. पितर म्हणजे आपले 'पूर्वज' त्यांना ते आपले देव मानतात. पितरांचे देव दगडावर किंवा लाकडाच्या ओंडक्यावर कोरून गावाच्या वेशीजवळ ठेवतात. आपल्या पितरांचे आत्मे भूत, पिशाच्च होऊन आपल्याला त्रास देऊ

नये म्हणून भूत पिशाच्चांची सुद्धा ते उपासना करतात. कोणतीही नैसर्गिक आपत्ती, रोगराई आली तर ती कोणत्यातरी देवतांच्या कोपामुळेच होते किंवा पिशाच्चयोनीतील आत्म्याने पछाडल्यामुळे होते असा त्यांचा दाट समज आहे. पूजा, उपासना ज्याच्या-मार्फत केली जाते त्याला 'भगत' असे म्हणतात. आदिवासी जमातीत भगताला फार मान आहे. त्याचा शब्द हे लोक 'देवाचा शब्द' मानतात. भगताच्या विरुद्ध एकही गोष्ट ऐकून घ्यायला आदिवासी तयार नसतात.

वारली जमातीचा धर्म हा सुद्धा संपूर्णतः निसर्गपूजेवरच आधारित आहे. ठराविकच हिंदू देव-देवता त्यांना माहीत आहेत उदा. राम, लक्ष्मण, हनुमान, शंकर, महालक्ष्मी. त्यांच्या पारंपरिक गाण्यातून गौरीचा उल्लेख केलेला आपल्याला आढळतो. पण किनाऱ्या-वर राहणारे वारली हिंदू देवतांना मानतात. लग्न झाल्यावर नवीन वधू-वर देवळांमध्ये आशीर्वाद घेण्यासाठी जातात.

वारली जमात ही 'शेतकीप्रधान' जमात आहे. त्यांचे संपूर्ण जीवन हे शेतीवरच अवलंबून असते. आणि शेती ही नेहमी पावसावर अवलंबून असते. पावसामुळे शेती पिकते. म्हणून पावसाला वारली जमातीत अतिशय महत्त्व आहे. पावसाला ते सर्वश्रेष्ठ देव मानतात. त्याला ते 'परमेश्वर' असे म्हणतात आणि आमचा 'परमेश्वर' अमर आहे असा त्यांचा समज आहे. पावसा-प्रमाणेच 'धरतरी' म्हणजे 'जमीन', 'गावतरी' म्हणजे 'गायत्री' आणि 'कणसरी' म्हणजे धान्य यांना ते आपल्या पवित्र देवता मानतात. कारण जमिनीमुळे धान्य मिळते, धान्यामुळे त्यांची उपजिविका होते, आणि हे धान्य पिकविण्यासाठी त्यांना गाईचा उपयोग होतो. ही जमात गाईचा वध कधीही करीत नाही. किंवा ते गोमांस खात नाहीत. जर कोणी गाईचा वध केला तर त्याला जमातीच्या बाहेर वाळीत टाकले जाते. त्याचे शुद्धीकरण केल्यानंतरच त्याला जमातीत परत घेतात. हे शुद्धीकरण त्याला साऱ्या जमातीसमोर करावे लागते. हे शुद्धीकरण करणे म्हणजे साऱ्यांसमोर गोमूत्र मिसळलेले गाईचे शेण खाणे होय. चंद्र, सूर्य, ढग, वीज, वादळ वारा यांनासुद्धा ते देव मानतात. आणि या साऱ्या गोष्टींचा उल्लेख नेहमी त्यांच्या गाण्यामध्ये आढळतो. कोणत्याही नवीन गोष्टींचा प्रारंभ करताना ते या देव-देवतांची पूजा करतात. आपल्या पूर्वजांना म्हणजे 'पितरांना' हे लोक देव मानतात. पुनर्जन्म भूत पिशाच्च यावर यांचा विश्वास आहे. वारली जमात काही झाडांना उदा. उंबर, पिंपळे, बेल, तुळस अतिशय पवित्र मानतात आणि त्यांची पूजा करतात. या झाडांना ते कधीही तोडत नाहीत, आणि जळणासाठी कधीही वापरत नाहीत. निसर्ग-पूजेबरोबरच ही जमात प्राणीपूजाही करते. ही पूजा त्यांचे हिंस्र श्वापदापासून रक्षण करते असे ते मानतात. वारल्यांची काही विशिष्ट दैवतेसुद्धा आहेत.

**१) नारनदेव –**

'नारनदेव' हा वारली जमातीच्या देवांचा देव आहे. याची उपासना केली तरच पाऊस पडतो अशी यांची समजूत आहे. म्हणून या देवाला ते पर्जन्य देवता म्हणतात. आणि हा नीती शिकविणारा देव आहे म्हणून त्याला 'नारनदेव' असे म्हणतात. नारनदेवाच्या अनेक नैतिक कथा त्याच्या जन्माची कहाणी आपल्याला या जमातीच्या लोकांकडून ऐका-वयास मिळते. घरोघरी 'नारनदेवाच्या' मूर्तीची प्रतिष्ठापना झालेली असते. नारन-देवाची मूर्ती म्हणजे दगडाला किंवा सुपारीला शेंदूर लावतात. आणि तो शेंदूर लावलेला दगड किंवा सुपारी (नारनदेव) एका टोपलीत तांदूळ घेऊन त्या तांदळात ठेवतात. प्रत्येक घराच्या मागच्या बाजूला ही 'नारनदेवाची' टोपली टांगलेली असते. कुठल्याही धार्मिक

विधीची सुरुवात करण्याआधी नारनदेवाची पूजा केली जाते. वारली जमात 'नारनदेवाची पूजा' माघ महिन्याच्या शुद्ध द्वितीयेला, सामुदायिकरित्या आणि मोठ्या समारंभापूर्वक करतात. ही पूजा भगताकडून केली जाते. पूजेच्या वेळेला तांदूळ पसरून ठेवलेल्या पाटावर नारनदेवाला ठेवतात. पाटाजवळ पाण्याने भरलेली घागर आणि घागरीवर नारळ ठेवलेला असतो. 'भगत' नारनदेवाला नारळ फोडतो, कोंबडीचा बळी देण्याची पद्धतही यांच्यात आहे. पूजा झाल्यानंतर वारली जमात पानाफुलांनी स्वतःला सजवून रात्रभर याच्याभोवती नाचत राहते. ही नाच-गाणी, दारू-ताडी पिणं त्यात रात्र संपते.

**वाघ्या –**

वाघ्या ही वारल्यांची ग्रामदेवता आहे. हा 'वाघ्या' आपले हिंस्र श्वापदापासून रक्षण करतो अशी यांची समजूत आहे. म्हणून या देवाला ते गावाबाहेरच्या झाडीत किंवा वडपिंपळाच्या झाडाखाली विशेषतः पूर्वेकडे तोंड करून बसवितात. वाघ्या हे देव म्हणजे वाघ्याची मूर्ती साधारण दोन ते तीन फूट उंचीच्या लाकडाच्या ओंडक्यावर कोरलेली असते. त्याच्या आजूबाजूला आणखी छोट्या छोट्या मूर्ती कोरलेल्या असतात. छोट्या मूर्तींना ते वाघ्याचे शिपाई असे म्हणतात. संपूर्ण लाकडाला माणसाचा आकार दिलेला असतो. वाघ्याच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्याचा विधी ते ऐन मध्यरात्री करतात. सर्व पुरुष मंडळी मध्यरात्री एकत्र होऊन उघडे होतात. नंतर या वाघ्याच्या मूर्तीला खांद्यावर घेऊन गावभर नाचवितात. बळी देण्यासाठी बकरी, कोंबडी बरोबर घेतलेली असते. "हे वाघ्या तूच आमचे आदिदैवत आहेस. तुझी कृपा आमच्यावर असेल तर आमच्यावर कोणतेच संकट येणार नाही. तुझ्या कृपेनेच आमची शेते पिकतात. तुझ्या कृपेनेच आमचे रोगराईपासून रक्षण होते. तूच आमचा कर्ता आहेस." अशा प्रकारे वाघ्यास आळवितात. नंतर भगताच्या मार्फत ज्या ठिकाणी मूर्ती बसवायची आहे तिथे तिची प्रतिष्ठापना करतात. नंतर कोंबडी, बकरीचा बळी देऊन त्यावर दारू हिंपडतात. वाघ्या दैवतात एक अद्वितीय शक्ती आहे असे या जमातीला वाटते. कारण प्रत्येकाच्या आयुष्यातील चांगले-वाईट प्रसंग याच दैवता-च्या कृपेवर अवलंबून आहेत अशी यांची समजूत आहे. 'वाघ्या' फक्त त्यांचे हिंग्ज श्वापदापासून रक्षण करतो असे नाही तर रोगराई पासूनही रक्षण करतो. त्याच्या कृपेने शेतात पीक चांगले येते. असे यांना वाटते. "वाघ्या" दैवताची पूजा नेहमी आश्विन वद्य द्वादशीला केली जाते. त्याला ते 'वाघवारस' असे म्हणतात. या दिवशी वाघ्याला नवीन शेंदूर लावतात. कोंबडी, बकरीचा बळी देतात. नारळ फोडतात, आणि मांस आणि खोबरे प्रसाद म्हणून वाटतात.

**हिरवा –**

हे वारल्याचे कुलदैवत आहे. हा त्यांना समृद्धी आणि बरकत देणारा देव आहे. हा देव म्हणजे मोराच्या पिसांच्या कुंचीमध्ये एकात एक अशा दोन छोट्या पिशव्या ठेवलेल्या असतात. सगळयात आतल्या पिशवीत 'हिरव्या देवाच्या' (माणसाच्या आकाराच्या) दोन चांदीच्या मूर्ती ठेवलेल्या असतात. या कुंच्याला लाल वस्त्रात गुंडाळून भिंतीला टांगून ठेवतात. एकावर एक अशी अनेक वस्त्रे आपल्याला प्रत्येकाच्या घरात दिसून येतात. कारण नवीन लग्न झाले की त्या पुरुषाच्या नावाने देवावर नवीन शेले (वस्त्रे) घालण्याची पद्धत यांच्यात आहे. फक्त पूजेच्या वेळेस ही वस्त्रे काढून ठेवली जातात. ही पूजा दरवर्षी नवीन पीक आले की करतात. या 'हिरवा' देवाला सात स्त्रिया आहेत असे हे लोक म्हणतात. या सात स्त्रिया म्हणजे शेंदूर लावलेल्या चार आणि शेंदूर न लावलेल्या तीन सुपाऱ्या होय. शेंदूर न लावलेल्या सुपाऱ्यांना ते 'कोरड्या स्त्रिया'

म्हणतात, आणि त्यांना कोंबडे बळी देत नाहीत. या सातही सुपाऱ्या ते एका टोपलीत ठेवतात. या दैवताची प्रतिष्ठापना करताना एक मोठा धार्मिक विधी केला जातो. आपल्यावर कोणतेही संकट येऊ नये म्हणून 'हिरवा उजळणे' हा एक विधी यांच्यात आहे. या विधीमध्ये एक कढईत तेल घेऊन त्यात देव टाकतात आणि खालून जाळ लावतात. नंतर भगत उकळत्या तेलात हात घालून देव बाहेर काढतो. शेवटी जेवणाचा कार्यक्रम (बकरे, दारू) होऊन हा विधी संपतो. या विधीच्या वेळेस तो घांगळी हे वाद्य वाजवितात.

**चित्ता** –

चित्ता हा देखील यांचे कुलदैवत आहे. तो यांचे हिंस्त्र श्वापदापासून रक्षण करतो अशी यांची समजूत आहे. हा देव अंगठी सारखा असतो. आणि ही अंगठी दोऱ्याने मुठीला लोंबती बांधतात.

**हिमाई** –

'हिरवा'देवा बरोबरच हिमाई देवीची पूजा केली जाते, वेगळी पूजा करत नाहीत. देवीची पूजा करण्यामागे विशिष्ट उद्देश नसतात.

**भगत** –

वारल्यांचे सर्व धार्मिक विधी हे भगतामार्फत केले जातात. भगताला ही जमात अतिशय मान देते. त्याचा शब्द हा देवाचा शब्द मानतात. धार्मिक विधींबरोबरच भगत वैद्याचे आणि ज्योतिष्याचे पण काम करतो, औषधे देतो. काही काही औषधी वनस्पतीची त्याला माहिती असते. रोगाचे निदान करताना, तो एका सुपात तांदूळ घेऊन तोंडाने काहीतरी पुटपुटत तांदूळ हलवीत राहतो. त्याला हे लोक 'खडी पाहणे' किंवा 'दिवा हेरणे' असे म्हणतात. मंत्रतंत्राची विद्याही यांना अवगत असते. त्याच्या साहाय्याने तो भूतांना शोधून काढतो, आणि घालवून टाकतो. इच्छुक तरुणांना हे भगत गुप्तपणे भगताचे शिक्षण देतात. पण हे शिक्षण घेताना विद्यार्थ्यांना फारच कडक व्रत पाळावे लागते.

**धार्मिक श्रद्धा** –

पुनर्जन्म, पिशाच्च, भूत यावर वारल्याचा अतिशय विश्वास आहे. 'चेडा', 'हेडली' आणि 'ब्रह्मा' या पिशाच्चयोनीतल्या देवांना ते फार मानतात. 'चेडा' म्हणजे माणूस जर अतृप्त इच्छा घेऊन मेला तर त्याला सापाचा किंवा बेडकाचा जन्म मिळतो. याला ते चेडा म्हणतात, त्याला ते फार भितात, आणि हा चेडा आपल्या घराजवळच राहतो अशी त्यांची समजूत आहे. त्यामुळे रात्रीच्यावेळी पाण्यातून जायला हे लोक तयार नसतात. 'हेडली' म्हणजे जर गरोदर स्त्री मेली तर तिचे भूत होऊन झाडाखाली पाळणा हलवीत बसते असे ते म्हणतात. आणि 'ब्रह्मा' म्हणजे तरुण मुलगा मेला तर त्याचे भूत होऊन कोणत्याही तरुण मुलीच्या मागे लागून तिचा उपभोग घेतो अशी यांची समजूत आहे. ज्या स्त्रिया स्वतःला येत असलेल्या मंत्रतंत्र विद्येचा दुसऱ्यावर प्रयोग करून त्यांना त्रास देतात, अशा स्त्रियांना ही जमात 'भूताळया' म्हणजे काही पाड्यावर (वस्तीवर) या पाड्यातील प्रतिष्ठित पूर्वजांची मूर्ती (शेंदूर लावलेला दगड) पाहायला मिळते. त्याला ते 'वीर' म्हणतात. रोगराईपासून मुक्त होण्यासाठी ते वीर या देवाची पूजा करतात. रानडुक्कराचा बळी देतात. 'वीर' नेहमी नवसाला पावतो अशी यांची समजूत आहे.

अशी ही मुंबईसारख्या अतिशय प्रगत शहरापासून अवघ्या ४० कि.मी. वर वसलेली अत्यंत मागास, शिक्षणाचा अभाव असलेली अज्ञानी, अशिक्षित, अडाणी, गरीबीने ग्रासलेली, आणि रोगराईने पछाडलेली मानवी वस्ती पाहिली कि मनात असंख्य प्रश्नांचे काहूर माजते.

● ● ●

# कोलाम : धार्मिक स्थिती

डॉ. प्रकाश गंभीर

मानवी संस्कृतीमध्ये धर्मास फार मोलाचे स्थान आहे. प्रत्येक समाज कुठल्या ना कुठल्या धर्माचे पालन करतो. धर्म हा त्याच्या नित्य व्यवहारातला एक महत्त्वाचे अंग बनतो.

कोलाम जमात ही महाराष्ट्रात महत्त्वाची समजली जाते आणि ही जमात साधारणत: यवतमाळ जिल्ह्यात पसरली आहे. यवतमाळ हा भाग महाराष्ट्राच्या इशान्य-पूर्वोत्तर भागामध्ये येतो. नागपूरजवळून यवतमाळ साधारण ९० कि.मी. अंतरावर आहे. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये १९८१ च्या जनगणनेनुसार कोलाम यांची संख्या १,१८,०७३ अशी होती आणि एकट्या यवतमाळ जिल्ह्यात फक्त ६५,७०७ अशी होती.

कोलाम समाज आपण भगवान राम यांच्या वंशाचे आहोत असे मानतो. कोलाम समाजाच्या उत्पत्तीबद्दल दोन मतप्रवाह आढळून येतात. एक म्हणजे ही जमात भगवान रामापासून आली आहे. याबद्दल कारण देताना सांगतात की, अजूनही आमच्याकडे ''गावबांधणी''ची प्रथा सुरू आहे. यामध्ये गावातील वेशी बांधून घेतल्या जातात. यालाच लक्ष्मण रेषा सुद्धा म्हणतात.

दुसरा मतप्रवाह असा आढळतो की, त्यांचे पूर्वज भगवान श्रीकृष्ण आहेत. असे सांगितले जाते की त्यांची जमात आधी भटकी होती. गुरे पाळणे आणि वळणे हा त्यांचा मुख्य व्यवसाय होता आणि श्रीकृष्णासारखी बासरी वाजविणे हा छंद त्यामुळेच श्रीकृष्ण त्यांचा पूर्वज.

कोलाम हे दिसायला कृष्णवर्णीय, मध्यम बांधा आणि तरंगित कुरळे केस असलेले. जवळ जवळ सगळयाच लोकांची नाके आणि ओठ जाड आहेत. तपकिरी रंगाचे डोळे बऱ्याच लोकात आढळतात. निळे आणि काळे डोळे फारच थोड्या लोकांत आढळतात.

**कोलाम जमाती विषयी** –

रसेल आणि लाल १९७५/५२० यांच्या 'ट्राईब आणि कास्ट ऑफ द सेंट्रल प्रोव्हिन्सेस ऑफ इंडिया'' या पुस्तकामध्ये कोलाम या जमातीचा उल्लेख केला आहे. कोलाम जमात ही द्रविडियन जमातीशी मिळती-जुळती आहे असे म्हटले आहे.

या जमातीच्या बोलीभाषेस ''कोलामी'' असे म्हणतात. त्यांची स्वतःची अशी लिपी नाही आणि म्हणूनच देवनागरी मधूनच रोजचे व्यवहार चालतात.

**समाज जीवन** –

कोलाम ही जमात एकत्रित राहत असून त्यांच्यामध्ये ऐक्य दिसून येते. ते नेहमीच दुसऱ्यास मदत करण्यास तयार असतात आणि आपले जीवन सुखा-समाधानाने घालवतात. येथे एकच धर्म सर्व लोक पाळत असल्यामुळे सर्व लोक यात आनंदाने सहभागी होतात.

**आर्थिक जीवन** –

कोलाम यांचा मुख्य व्यवसाय म्हणजे शेती. या व्यतिरिक्त ते रोजंदारीवर सुद्धा काम करतात. ते गाई, बकऱ्या आणि कोंबड्या सुद्धा पाळतात. त्यांची आर्थिक परिस्थिती बेताचीच असते.

**धार्मिक कार्यपद्धती** –

कोलामच्या जीवनात धर्माला एक महत्त्वाचे स्थान आहे. त्यांच्या दररोजच्या

जीवनात सुद्धा धर्माला खूप महत्त्व देतात. कोलामांच्या धर्मात भगतास अनन्य साधारण असे महत्त्व आहे. कोलामांच्यात अशी एक धारणा आहे की, भगत म्हणजे देव, भूत, पिशाच्च, आत्मा आणि समाजातील लोकसंवाद साधणारा दुवा आहे. जेव्हा एखादा आजार किंवा रोग झाला असेल तर भगताची मदत आजार बरा करण्यासाठी घेतली जाते. भूत-प्रेत जर कोणाला लागले असेल तर मंत्राच्याद्वारे भगत त्याला भूतापासून मुक्त करतो.

भगताचे कपडे सुद्धा इतरांपेक्षा वेगळे असतात. त्याला बऱ्याच झाडपाल्यांचे ज्ञान असते. प्रत्येक रोगांवर काय काय औषध, झाडपाला, कंदमुळे द्यावयाचे याचे ज्ञान असते. देवासाठी कोंबड्या-बकऱ्याचा बळी द्यावयाचा असेल किंवा कुठल्याही प्रकारची पूजा-अर्चा करावयाची असेल तर भगताच्या शब्दाबाहेर कोलाम जात नाहीत. त्याच्या मताप्रमाणे ते वागतात, तसे केले नाहीतर देवाचा कोप होईल याची भीती सतत त्यांच्या मनात असते.

**महत्त्वाच्या देव-देवता –**

कोलाम जमातीमध्ये बऱ्याच प्रकारचे देव आणि देवता आढळून येतात. यामध्ये प्रामुख्याने पूजा अर्चा करण्यात येणारी देवी म्हणजे करमराई, भुतायोदेवी, आईदेवी, मनुकबाई, वाह्या, बाईक, लांडाबाई, भवानी आणि सवरी. देवामध्ये सुद्धा भिमायक, जैयतूर, चुरगाळी, सबाका, मातीध्याम, सनसुरयाक, धानाखाना, पारधायक, दैवत, म्हसोबा, पाटादियाम, महादेव, भैरू बियारोम, सातवन, मारुती इत्यादी देवांचा समावेश केला आहे.

येथे कोलाम महत्त्वाचे जे देव-देवी पूजतात त्याविषयी थोडक्यात माहिती देणे इष्ट ठरेल.

**अ ) देवी –**

देवीचे स्थान कोलामामध्ये महत्त्वाचे आहे. आणि म्हणूनच भक्तीभावाने तिची पूजा केली जाते. प्रत्येक दिवशी या देवीची पूजा केली जाते. देवीचे मंदीर पाड्याच्या मध्यभागात असते.

**ब ) भूताया –**

ही देवी भूतावर नजर ठेवते. भगत भूत घालविण्यासाठी या देवीची पूजा करतो. मुख्यत: चैत्र महिन्यामध्ये पौर्णिमेच्या दिवशी या देवीची पूजा करतात.

**क ) भिमायक –**

भिमायक याच देवाला भिवसेन असे सुद्धा संबोधतात. हा सुद्धा देव उच्चतम समजला जातो. हा देव गावाच्या वेशीजवळ असतो, आणि त्यासाठी छोटीसी झोपडीसुद्धा बांधली जाते. एका लाकडाच्या चबुतऱ्यावर दगड ठेवून त्याला शेंदूर वगैरे लावून पूजा केली जाते. झोपडीवर लाल रंगाचा झेंडा सुद्धा फडकत असतो. याचाच अर्थ असा की या झोपडीमध्ये देव देवतांचे ठाण आहे. पेरणीच्या आधी ज्वारी, बाजरी, कापूस इत्यादींच्या बिया या देवास पूजेकरिता ठेवतात, आणि मग पूजा केल्यावर पेरणी करतात. बि-बियाण्यासोबत नारळसुद्धा वाहतात. जेव्हा पीक फुलावर येते तेव्हासुद्धा या देवांची पूजा केली जाते. कापणीच्या वेळीसुद्धा या देवाची प्रार्थना करून कोंबडी किंवा बकऱ्याची आहुती दिली जाते. पाऊस पडावा म्हणून सुद्धा या देवाची प्रार्थना केली जाते.

**ड ) बैंक –**

बैंक ही सुद्धा देवी कोलामाकडून पूजली जाते. पाड्यामध्ये आत शिरते वेळेस हिचे दर्शन होते. कोलाम यांची अशी धारणा आहे की, बाहेरून येणाऱ्या आणि जाणाऱ्या माणसांवर हिचा डोळा असतो आणि म्हणूनच ही देवी पहारेकरी आहे असे समजतात. बैंक ही देवी खेड्याच्या आत शिरण्याच्या ठिकाणी असते.

**धर्म आणि नातीगोती –**

कोलाम कुठल्या देव-देवींची पूजा करतो यावर ते एकमेकांपासून किती वेगळे आहे हे

दर्शवितात. प्रत्येक घरी दोन देव, तीन देव किंवा चारदेव असतात. परंपरागत चालत आलेली ही रूढी आहे. आपण किती देवांची पूजा करतो आणि ही परंपरा खूप वर्षांपासून आहे हे लहान मुलांनासुद्धा माहीत असते. महत्वाचा मुद्दा असा की, जेव्हा लग्न असते तेव्हा तुम्ही किती देव पूजता हे महत्वाचे ठरते, आणि त्याच नात्या-गोत्यातून सोईर-संबंध केला जातो. एकाच प्रकारचे देव पूजीत असल्यामुळे ते एकमेकांच्या जवळचे आणि ते एकमेकांचे नातलग समजले जातात.

**धर्म आणि स्त्रिया –**

बहुतेक करून कोलामी स्त्रियांना उत्सवामध्ये किंवा पूजा-अर्चामध्ये महत्त्वाचे स्थान नसते. पण त्या उत्सवामध्ये मात्र भाग घेत असतात. गावबांधणी किंवा होळीमध्ये कोलामी स्त्रिया भाग घेतात.

**गावबांधणी उत्सव –**

हा उत्सव कोलामामध्ये मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. हा उत्सव चैत्र महिन्यात येतो व तो पूर्ण दिवस साजरा करतात. पंचमंडळामधले पदाधिकारी यात भाग घेऊन हा उत्सव पार पाडतात.

या उत्सवात पाड्याच्या सभोवताली एक रेखा आखतात. रेखा जवळजवळ चौकोना-सारखी असते आणि या चौकोनावर चारही बाजूला चार दगड ठेवतात. पूजा अर्चा करून बकऱ्याचा बळी दिला जातो आणि त्याचे रक्त चारही दगडावर खेड्याच्या भोवती शिंपडतात. मग बकऱ्याचे मास सगळ्या लोकांत वाटून मग ते शिजवून खातात. खेड्याच्या मध्यभागी उंचशी जागा असते त्याला चावडी म्हणतात. त्या ठिकाणी पंचमंडळातील लोक मटणाची भाजी करतात. या उत्सवामध्ये लोक फारच आनंदी असतात. उत्सवाच्या आदल्या रात्री कोलाम स्त्री-पुरुष आणि बालके सगळे एकत्र येऊन आनंदाने नाच करतात. या दिवशी कोणीही बाहेरगावी जात नाही किंवा त्यांच्या गाई, बकऱ्यासुद्धा चरायला बाहेर नेत नाहीत. सगळे लोक गावातच असतात आणि प्रत्येकजण हा नियम पाळतात.

या उत्सवात सहभागी असलेले कोलाम पायात चप्पल किंवा जोडा घालीत नाहीत. ते चप्पल न घालताच. हा उत्सव पार पाडतात. या दिवशी आखलेली रेषा जो कोणी ओलांडेल किंवा पार करेल त्यांना दंड सुद्धा दिला जातो. हा दंड बहुतेक करून पैशाच्या स्वरूपात असतो.

**जन्म ते मरण:धार्मिक विधी –**

कोलाम, जीवनातील जन्म-मृत्यूपासून प्रत्येक घटनांची दखल घेतात व आपल्या-परिने साजरा करतात. मग ते लग्न असो किंवा मरण. यात ते सगळे भाग घेतात, आणि झालेल्या सुख दु:खात सामील होतात.

कोलामांच्या जीवनातील ह्या ज्या महत्त्वाच्या घटना आहेत त्याचे विधी ''दियाला'' या पुजाऱ्याकडून करवून घेतात. कोलामामध्ये मृतदेह जंगलामध्ये पुरण्याची प्रथा आहे.

**कोलाम उत्सवाची नावे –**

कोलाम बरेच उत्सव साजरे करीत असतात. काही मुस्लीम धर्माचे तर काही हिंदू धर्माचे सण ते साजरे करतात. जसे की, मोहरम, दिवाळी, दसरा, होळी, गावबांधणी, भिमायक इत्यादी सण ते मोठ्या उत्साहाने साजरे करतात.

कोलाम ही जमात जरी काही उत्सव किंवा सण मुस्लीम किंवा हिंदू धर्मासारखे करीत असले तरी स्वत:च्या ज्या चालीरीति आहेत, त्या तशाच पुढे त्यांनी चालू ठेवल्या आहेत. त्याचप्रमाणे इतर उत्सव सुद्धा मोठ्या धुमधडाक्याने साजरे करतात. ते भूतप्रेतावर विश्वास ठेवणारे आहेत. एखादा रोग किंवा व्याधी झाली तर ती भूत खेतामुळे झाली अशी भावना आहे. भूत खेत हे त्यांच्या

(पान २४ वर)

# माडिआ गोंडांचे धार्मिक जीवन :

डॉ. शौनक कुलकर्णी

समाजाच्या अस्तित्वासाठी आणि एकसंधतेसाठी आवश्यक असणारा असा धर्म हा एक सांस्कृतिक घटक आहे. धर्म म्हणजे ज्यायोगे मानव स्वतंत्र किंवा सामाजिक स्वरूपात कोणत्या तरी आदीदैविक गोष्टींवर श्रद्धा ठेवून जगण्याचा, दैनंदिन जीवनात मन स्थिर करण्याचा प्रयत्न करतो. असे आचार प्रत्येक समाजामध्ये अशा काही श्रद्धा असतात आणि त्या देवदेवता, सणवार, उत्सव, जन्मापासून सुरू होणारे आणि मृत्यूनंतरही चालू राहणारे विधी इत्यादी स्वरूपात प्रगट होत असतात. त्यामुळेच मानवशास्त्रात संस्कृतीचे स्वरूप समजून घेण्यासाठी समाजात अस्तित्वात असणाऱ्या धर्माचा आणि मानवी तसेच सामाजिक जीवनाचा काय संबंध आहे हे जाणून घेणे महत्त्वाचे ठरते. प्रस्तुत लेखामध्ये माडिआ गोंड या आदिवासी समाजाच्या संस्कृतीचे स्वरूप समजून घेण्याच्या दृष्टीने माडिआ गोंडांच्या धार्मिक जीवनाचा विचार केलेला आहे.

माडिआ गोंड ही आदिवासी जमात निसर्गोपासक आहे. परंतु सततच्या हिंदू संपर्कामुळे हिंदू धर्मातील इतर देवदेवतांचाही त्यांच्या पूजनात समावेश झालेला दिसून येतो. त्यांच्याकडून त्यांच्या देव-देवतांबद्दल बरीचशी गुप्तता राखली जाते. असे असले तरी मातामाई, गावच्या वेशीस संरक्षण देणारी शिवदेवी, रानटी प्राण्यांपासून संरक्षण देणारी पाटीमाँ तर गोवर कांजण्यांचा प्रतिबंध करणारी जोना अव्हाल, कागडी माता ही उष्णतेच्या त्रासापासून मुक्तता करणारी, याबरोबरच पिरका राव, महादेव आणि कन्यामारिआ, कन्यायी, कन्यांगा या सात बहिंणींचे माडिआ गोंड सार्वत्रिकपणे करतात. मृतात्म्याचे पूजनही माडिआ अग्रक्रमाने करतात.

या विविध देवता कधी, कोठे आणि कशा प्रकारे पूजल्या जाव्यात याला जसे महत्त्व आहे, तसेच ती कोणाकडून पूजली जावी, त्याचा उद्देश काय असावा, याचाही काही दंडक असतो. शिवदेवी ही गावाच्या शिवेजवळ असून गावाच्या वेशीचे रक्षण करणे हे तिचे काम, या देवतेभोवती मात्र बांबू तट्याचे कुंपण घातलेले असते आणि या देवतेची पूजा फक्त पुरुषांकडूनच केली जाते. पाटीमाँ किंवा पटावूल ही देवता प्रामुख्याने जंगलात वास्तव्य करून असते आणि जंगली श्वापदांपासून संरक्षण देणारी असते. ज्यावेळी घनदाट जंगलांचे प्रमाण जास्त होते आणि त्यात प्राण्यांचा वावर जास्त होतो त्यावेळी या देवतेच्या पूजनास विशेष महत्त्व येते. आजही शिकारीच्यावेळी या देवतेची पूजा आवर्जून केली जाते. या देवतेच्या देवळापाशी तीन दगड असतात त्यांना जोना अव्हाल असे म्हणतात.

सप्तदेवतांपैकी सातही देवता कशाच्या ना कशाच्या तरी द्योतक असतात. त्यांना कन्यामारिआ असे म्हणतात. भर कन्यांग ही देवता नदी, पाणी याची द्योतक असून प्रामुख्याने मासेमारीच्या वेळी तिची प्रार्थना केली जाते. तिचा कोप नदीतून सुसरी मगरीच्या रूपाने होत असतो. पाण्याच्याच संबंधीची दुसरी देवता म्हणजे घाट कन्यांग.

ही आंघोळीच्या पाण्याच्या ठिकाणी असते. चापर कन्यांग ही देवता जनावरे गुरे यांच्या निकोप वाढीसाठी आवश्यक मानली जाते. बेरा कन्यांग ही देवता पीक, शेती या करता पूजली जाते. आणि पेरणीच्या वेळी, पीक काढणीचे वेळी तिला बळीसुद्धा दिला जातो. सुखील कन्यांग ही वनदेवता असून गुरे वनात भटकताना तसेच भटक्या जनावरांना संरक्षण देणारी ही देवता असल्याचा विश्वास माडिआंना आहे.

धार्मिक आचार करण्याचा अधिकार जरी प्रत्येक माडिआस असला तरी आचार करण्याचे काम पुजाऱ्याकडेच असते. त्याला माडिआ भाषेत गैता असे म्हणतात. गैता हा समाजातील महत्त्वाचा घटक असून गावातील सर्व प्रमुख घटनांच्या वेळी, क्रियाकर्माचे वेळी त्याची उपस्थिती आवश्यक असते. पेरणी आणि कापणी यासारख्या महत्त्वाच्या कामी, जमिनीची पूजा करणे, साथीच्या रोगराईच्या काळात मातृदेवतेची पूजा करून रोगराई-पासून संरक्षण करणे, यासारखी कामे पुजारी करत असतो. गावात एक मुख्य पुजारी असून महत्त्वाच्या कामात त्याचा वाटा असतो. इतर देवदेवता आणि कार्यक्रमांसाठी स्वतंत्र पुजारी असतात. सामान्यपणे लहानपणापासून ज्या मुलास स्वप्न, दैवी संकेत होत असतात, किंवा ज्या व्यक्तिमध्ये अशी दैवीशक्ती जाणवते, त्या व्यक्तिचीच पुजारी म्हणून निवड केली जाते. अशा मुलाच्या खाण्या-पिण्यावर तसेच व्यक्तिगत, सामाजिक जीवनावर बंधने घातली जातात, आणि ती व्यक्ती धर्मकांड शिकण्यास सुरुवात करते. शक्यतो प्रत्येक देवतेसाठी स्वतंत्र पुजारी असतो. मात्र या नवीन पुजाऱ्यांची संख्या कधी वाढत नसते, कारण अभ्यास करणारी मुले अगदी थोडीच म्हणजे साक्षात्कार वगैरे होणारीच असतात. तसेच कार्यरत असणाऱ्या पुजाऱ्यांच्या वृद्धावस्थेने किंवा निधनामुळे नवीन पुजारी तयार होत असतात. वृद्ध अनुभवी पुजाऱ्यांकडून तरुण पुजारी सर्व गोष्टींची माहिती घेत असतात. यात कर्मकांडाबरोबरच विविध वनौषधी वनस्पतींच्या विविध भागांचा औषधी उपयोग तसेच पारंपरिक उपचार पद्धती यांचा समावेश असतो. स्त्रियासुद्धा पुजारी म्हणून काम करू शकतात. त्यांची निवडही याच पद्धतीने केली जाते.

या पुजारी मंडळींबरोबरच गावात एक द्रष्टा किंवा भविष्य सांगणारा ज्योतिषी असतो. हा एक सात्त्विक मनुष्य म्हणून मानला जातो. हा मनुष्य देवाशी संपर्क साधण्याचे, त्यांना प्रश्न विचारण्याचे आदी कामे करतो. सूप, तेल, धान्य यासारख्या गोष्टींचा वापर करून लोकांच्या अडचणींसाठी देवतांना प्रश्न विचारणे आणि घडणाऱ्या गोष्टी जाणून लोकांना त्या सांगणे इत्यादी कामे करण्यामध्ये तो तरबेज असतो, आणि या व्यक्तिमुळेच परमेश्वरास लोकांच्या इच्छा माहिती होतात असा त्यांचा समज आहे.

यांच्याबरोबरच गुनिआ या व्यक्तिचेही समाजात स्थान असते. प्रामुख्याने गुनिआ म्हणजे वैद्य किंवा वैदू होय. आजार बरे करणे, स्मृती परत आणणे, जादूटोणा/मंत्रतंत्र यासारख्या गोष्टींचा छडा लावणे असे याचे मुख्य काम असते.

गैता, ज्योतिषी आणि गुनिआ यांचे कामात थोडाफार फरक असला तरीही दैनंदिन जीवनात त्याला अतिशय महत्त्वाचे स्थान असून या तीनही व्यक्तिंना एकत्रित-पणे पुजारी म्हणूनच संबोधिले जाते. या सर्वांच्या मुख्य पुजाऱ्यास विविध कार्ये करावी लागतात. शेतात पीक चांगले यावे म्हणून आणि पीक चांगले आले म्हणून प्रार्थना करणारा पुजारीच असतो. लग्न लावून विधी करणारा पुजारीच मयत झालेल्या व्यक्तीचे क्रियाकर्म करत असतो. हे क्रियाकर्म होईपर्यंत गावाचे वतीने पुजारीच उपवास करत असतो. मृत व्यक्तीचे सर्व

क्रियाकर्म उरकल्यावर त्याच्या नातेवाईकां-कडून अन्न शिजवून घेऊन पुजारी उपास सोडत असतो. वांझ व्यक्तीवर विशेषत: वांझ स्त्रियांवर उपचार करण्यासाठी माडिआमध्ये विशेष पद्धती आहे. या काळात हळद आणि तेल वापरून स्त्रीला स्नान घातले जाते नंतर विविध मंत्राचे पठन करून स्त्रीला मंतरवले जाते या काळात स्त्री एकटी राहते, इतर रजस्वला स्त्रियांपासून दूर राहते. जर मंत्रतंत्रास यश येऊन गर्भसंभव झालाच तर विविध कपडे गूळ, नारळ चांदी किंवा इतर धातूच्या वस्तू त्या स्त्रीकडून पोचममाई किंवा मातामईस अर्पण केल्या जातात. एखादा आजार बरा करण्यासाठी वनौषधी वापरल्या जातात, जर रक्त दोष किंवा तत्सम शारीरिक आजार असेल तर गुनिआ तोंडाने आजार शोषून घेतो. जर एखाद्या आजाराबद्दल दुसऱ्या व्यक्तिवर संशय असेल अथवा कोंबड्या जनावरे रोगाशिवाय अचानक मरू लागली तर गुनिआ दोषी व्यक्तिस शोधून काढतो. या व्यक्तिचा न्यायनिवाडा सरपंचापुढे होतो, त्याचा दोष जाणून घेण्यासाठी सर्व पुजारी त्याला विविध प्रश्न विचारतात आणि त्याच्या उत्तरांवरून त्याचा दोष ठरवितात. हे जरी माडिआंच्या जीवनाचे अंग असले तरीही शिक्षणाचे वाढते प्रमाण, वाढती प्रसारमाध्यमं यामुळे आजाराच्या वेळी अशी पारंपरिक कारणे शोधण्यापेक्षा शासकीय आरोग्य केंद्रात जाऊन औषध घेण्याचे प्रमाण वाढत आहे.

अशा विविध धार्मिक आणि दैनंदिन क्रियाकर्मांचा आणि ते करणाऱ्या व्यक्तींची माहिती घेतल्यावर प्रश्न पडतो तो त्यांच्या धार्मिक स्थळांचा. मंदिर म्हटले की डोळ्यापुढे येते ती शांत पवित्र जागा होय. माडिआ सुद्धा पवित्र मंदिरात जातात पण त्याला ते म्हणतात 'पोचय' पोचम हे बहुधा गावाचे वेशीवर किंवा गावाचे मध्यभागी असते, साहजिकच येथील देवता गावाच्या वेशीचे संरक्षण करू शकतील किंवा मध्यावरून गावावर नियंत्रण ठेवू शकतील. बहुतेकवेळा पोचम पूर्वेकडे तोंड करून असते आणि त्याच्या चारही बाजूने बांबू किंवा तट्याचे कुंपण असते. हे पोचम महुआच्या झाडाखाली बांधण्याचा एक प्रघात आहे आणि त्याच्या दुरुस्तीचे, स्वच्छतेचे काम गावातील 'परमा' या व्यक्तीचे असते. देवळाच्या आतमध्ये मातीच्या घोड्यासारख्या दिसणाऱ्या चार मूर्ती चार बाजूंना असतात आणि मधोमध दगड किंवा मातीचे चार उंचवटे असतात त्यांना सात कन्यांगा म्हणून मानतात. एखाद्या कोपऱ्यात झोपाळा असतो, तर दुसरीकडे महुआ दारूसाठी मातीची मडकी साठविलेली असतात. ज्याप्रमाणे मातीच्या प्राण्यांच्या मूर्ती असतात त्याप्रमाणेच क्वचित धातूची बैलाची अथवा घोड्याची मूर्ती असते. आदिवासी समाज हा शिकारीबरोबरच शेती करणारा आहे, त्याच्या शेतकी जीवनात या प्राण्यांना जे महत्त्व आहे तेच कदाचित त्यांच्या मूर्ती पूजनातून सिद्ध होते.

सणवार, उत्सव यासारखे सामाजिक कार्यक्रम किंवा लग्नकार्य, निधन, श्राद्धविधी यासारख्या कौटुंबिक कार्यक्रमाखेरीज सर्व ग्रामस्थ आठवड्यातून एकदा पोचम येथे एकत्र जमतात. हळद, कुंकू, फूल, नारळ अर्पूण तेथे पूजन केले जाते. या कार्यक्रमाला फक्त रजस्वला स्त्रियाना येण्यास मज्जाव असतो. पोचम जशी संपूर्ण गावासाठी असतात, तशीच ती स्वतंत्र किंवा व्यक्तिगत कुटुंबासाठीही असतात. ही प्रार्थनास्थळेसुद्धा बांबू, तट्या मातीची असून हिंदीच्या झावळयांनी आच्छादलेली असतात.

माडिआंचे धार्मिक सणवार, कार्यक्रम हे देवता, स्थानिक देवता यांना प्रसन्न करण्या-साठी आणि त्यांचे आभार मानण्यासाठी असतात. बहुसंख्य सण/उत्सव हे शेतकी जीवनाशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे संबंधित असतात. शेती, वाईट हवामान साथीचे

आजार, रोगराई हे सर्व परमेश्वराचे नियंत्रणाखाली मानले जाते, आणि यातून मार्ग काढण्यासाठी देवतांना प्रसन्न करणे आवश्यक असते. तर काहीवेळा मिळालेल्या चांगल्या पिकामुळे, पावसामुळे, रोगराई न आल्यामुळे, देवतांचे आभार मानणे त्यांना आवश्यक वाटते आणि त्यातूनच संपूर्ण वर्षात एकामागून एक सणांचे उत्सवांचे चक्र चालू राहते.

माडिआंचे धार्मिक जीवन समजून घेण्याच्या दृष्टीने त्यांच्या काही प्रमुख सणांचा येथे आवर्जून उल्लेख करावा लागेल. 'जाता पांडम' हा सण जानेवारीत म्हणजे जेव्हा नवीन डाळी, कडधान्य तयार होऊन स्वयंपाकात वापरात येतात, त्यावेळी साजरा केला जातो. या सुमारास विविध भाज्या, कडधान्ये तयार असतात पण त्यांना योग्य बळी देऊन उत्सव होईपर्यंत त्यांचा स्वयंपाकात वापर होत नाही. फेब्रुवारीचे शेवटी इरपू किंवा इडू पांडम साजरा केला जातो. ज्यावेळी महुआच्या फुलांची फलधारणा सुरू होते. गोंडांच्या आर्थिक आणि धार्मिक जीवनात महुआला आत्यंतिक महत्त्व आहे. महुआची फुले अत्यंत चवदार आणि अधिक पोषणमूल्य असणारी असून त्यापासून केल्या जाणाऱ्या मद्यास सर्व दृष्टीने महत्त्व आहे. अगोदर नक्की केलेल्या दिवशी पोचम येथील महुआ झाडाखाली सर्व लोक एकत्र येऊन मातामाईस धान्य, दूध याबरोबरच कोंबडा बळी दिला जातो आणि भरपूर फुलांसाठी प्रार्थना केली जाते.

मार्चमध्ये माकी पांडम, हिंगा किंवा मोहोर (आंब्याची फुले) उत्सव साजरा होतो. छोट्या कैऱ्या तयार होऊ लागताच एखादा दिवस ठरवून पोचमपाशी भात आणि कोंबडा बळी शिजवून गावातील पुरुष मंडळी भक्षण करतात नवीन फळे देवतेस अर्पण करून अधिक उत्पन्नासाठी प्रार्थना केली जाते. या कार्यक्रमात स्त्रिया मुलींचा समावेश असत नाही. एप्रिल/मे मध्ये बिजा पांडम हा पेरणीचा सण साजरा केला जातो. निर्मितीच्या सर्व शक्तीपेरणी करायच्या बीजामध्ये एकत्रित करण्याकरिता हा सण असतो. बीजाच्या उगवण क्षमतेच्या शक्तिस कमी करण्यापासून प्रतिरोध करण्यासाठी हा सण साजरा केला जातो. या कार्यक्रमातही स्त्रियांचा सहभाग असत नाही. ज्या बिया नंतर पेरणीसाठी वापरल्या जाणार असतील त्या बिया कोंबडे, डुक्कर या बळींच्या रक्ताने पुरेशा भिजवल्या जातात. नंतर तो बळी शिजवून मातामाईस अर्पिला जातो आणि नंतर त्याचे सर्व ग्रामस्थांकडून भक्षण होते. नंतर प्रत्येक व्यक्तिस त्याच्या वाट्याचे रक्तात भिजलेले धान्य दिले जाते. हा सर्व विधी पुजाऱ्यामार्फत केला जातो.

सप्टेंबरात कोती पांडम हा सण साजरा होतो. नवा भात, काकड्या, भोपळा या पिकांसाठी हा उत्सव असून हा कौटुंबिक सण म्हणून साजरा केला जातो. डिसेंबरात साजरा होणारा सण म्हणजे जाता पांडम हा नव्या डाळी नवे धान्य यासाठी असतो. नवे धान्य काढण्या-आधी थोडे भरपूर रोटी करून महुआ मद्यासह देवतेस अर्पण केला जातो.

माडिआंचे धार्मिक जीवन समजून घेण्यासाठी त्यांच्या देवता, कर्मकांड, सणवार, उत्सव, देवळे यांच्याइतकीच महत्त्वाची वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट म्हणजे त्यांचे व्यक्तीच्या मृत्यूनंतरचे विधी, आणि हे विधी जिथे केले जातात ती जागा किंवा स्मशानभूमी गावाच्या बाहेर असून येथे मध्यम आकाराच्या शिळा गोलाकार, मांडलेल्या असतात. या गोलाच्या मध्ये एक मोठी शिळा किंवा क्वचित कोरीवकाम केलेला लाकडी खांब असतो त्यावर पक्षी, कासव किंवा सुरीची आकृती कोरलेली असते. ही परंपरा महाअश्मयुगीन (Megalithic) संस्कृतीशी नाते सांगणारी आहे.

मृत्यूसमयी व्यक्तिला बाजेवर न ठेवता जमिनीवर घोंगडे टाकून ठेवले जाते.

मृतदेहास नवीन पांढरे कापड घालून झाकले जाते, आणि तिरडीवर झोपवले जाते. तिरडीला माडिआ भाषेत घोला असे म्हणतात. नंतर चार नातलगांकडून त्याला उचलून, मिरवत स्मशानात नेले जाते. स्मशानातील क्रियाकर्म हिंदू संस्कृतीप्रमाणे असले तरीही मृताचे दफन करण्याचा प्रघात गोंडांमध्ये आहे. दफनासाठी खड्डा हा फारसा खोल नसतो. स्त्रियांना त्यांच्या दागिन्यांसह पुरले जाते व्यक्तीस साथीच्या रोगाने मृत्यू आला असल्यास त्याचे दहन केले जाते. दफन प्रकारात व्यक्तीचे शरीराभोवती गोलाकार शिळा मांडतात व त्यात व्यक्तिच्या वापरातील आवडत्या वस्तू ठेवतात. यावरून व्यक्तिच्या मरणोत्तर जीवनाबद्दल गोंडांच्या काही श्रद्धा असल्याचे नक्की होते. या दफन प्रकारात अगदी तंबाखूच्या चंच्या, लाकडी पेथ्या, बाजा, घरातील कौलांचाही समावेश असतो. बऱ्याचवेळी दफनावर चौथरा बांधला जातो. प्रसिद्ध धनवान व्यक्तिचे बाबतीत ९/१० फुटापर्यंत हा चौथरा बांधलेला पहायला मिळतो. दफन करताना मृतदेहाचे डोके पूर्वेकडे किंवा उत्तरेकडे करण्याचा सर्वसामान्य कल पहायला मिळतो. हा सर्व दफन प्रकार पाहिल्याबरोबर प्रागैतिहासिक कालातील महापाषाणयुगीन संस्कृतीशी साम्य वाटते, कदाचित हिंदू संस्कृतीचा पगडा येण्यापूर्वी-पासून अस्तित्त्वात असलेला गोंड समाज हा तत्कालिन परंपरा आजही जतन करीत असावा.

हे सर्व क्रियाकर्म मृत व्यक्तिचे नातलग मुख्य पुजाऱ्याचे मदतीने व सल्ल्याने करतात. या प्रसंगी पुजारी उपवास करतो. स्मशानातून येताना नदीवर स्नान करून कपडे बदलले जातात, आणि त्यानंतर मृत व्यक्तिचे नातलग भात शिजवून पुजाऱ्यास अर्पण करतात.

हे सर्व दफन प्रकार स्मशानातच पहायला मिळतात, परंतु क्वचित काही ठिकाणी गावातच असे प्रकार दिसल्यावरून चौकशी करता .असे सांगितले जाते की जर व्यक्तिचा मृत्यू हत्या किंवा खून अशा प्रकारचा असेल तर व्यक्तिच्या इच्छा अपुऱ्या राहू शकतात. यापासून कोणाला त्रास होऊ नये यासाठी त्याच ठिकाणी ताबडतोब असेच दफन करणे योग्य असते. या सर्व गोष्टीवरून आत्मा, मृत्यूनंतरचे जीवन अशा कल्पना समाजात (गोंड) असल्याचे नक्की होते.

● ● ●

---

*(पान १९ वरून)*

अवतीभवती, खेड्यात वावरत असतात असा सुद्धा समज आहे.

कोलामामध्ये महत्त्वाचा आणि उच्चतम असा देव आहे तो "भिवसेन". याची पूजा प्रामुख्याने धान्य पेरणी, कापणी यावेळेस केली जाते, आणि महत्त्वाचे म्हणजे हा देव कोलामांचे संरक्षण करतो असा समज आहे.

मृतात्म्याची पूजासुद्धा कोलाम करतात.

एक गोष्ट येथे प्रामुख्याने नमूद कराविशी वाटते, ती ही की, कोलाम अत्यंत साधेसुधे असून त्यांच्यामध्ये जर काही धार्मिक, सामाजिक बदल होत असतील आणि ते त्यांच्या हिताचे असतील तर ते बदल स्वीकारण्यास तयार असतात.

● ● ●

# 'बुडवा' : पावरांच्या धार्मिक जीवनातील महत्त्वाची व्यक्ती

**डॉ. प्रकाश गंभीर**

पावरा ही जमात अक्राणी महाल तालुका आणि धुळे जिल्ह्यात पसरली आहे. राजबर्डी येथील पावरा जमात उदय नदीच्या किनारी वसलेली आहे. येथील बोलीभाषेला "पावरी" असे म्हणतात. यात साधारणत: मराठी, गुजराथी आणि हिंदी या भाषेचा प्रामुख्याने समावेश झालेला आहे असे आढळते. येथील लोकांचा व्यवसाय शेती, मासेमारी आणि सरपण (लाकडे) गोळा करणे इत्यादी आहे. येथील घरांची मांडणी साधीच पण एकसारखी असून झोपड्या जवळ जवळ आहेत. आतील जागा ऐसपैस आहे. येथील सरपंच हा मुख्य समजला जातो आणि त्याला "बुडवा" असेही संबोधतात. पावरा लोक अंगापिंडाने भक्कम आणि मजबूत त्याचप्रमाणे सरळमार्गी आहेत. पावरा लोक अशिक्षित आहेत, पण समाजसुधारक जनार्दन महाराज वळवी यांच्या पुढाकाराने सुरू झालेली शाळा आणि इतर अनेक उपयोगी संस्था ह्या जमातीसाठी वरदानच ठरतात.

**"धार्मिक परिकल्पना, उदय आणि व्याप्ती"**

प्रत्येक लोकसमुहामध्ये सामाजिक जीवनात धार्मिक भावनेला फार महत्त्व दिले जाते आणि धार्मिक विधी त्या वर्गाचा, जातीचा किंवा जमातीचा एक महत्त्वाचा अंग, घटक होऊन जातो. मानवविज्ञान शास्त्रज्ञ ई. ओ. जेमस्‌च्या मताप्रमाणे धर्म मानवाचे स्थान पक्के करतो. धर्मामुळे एक प्रकारची मानसिक बळकटी निर्माण होते आणि त्याचमुळे बऱ्याचशा गोष्टी साध्य करण्यास मानवाची तयारी होते, त्याला बळ प्राप्त होते, आणि म्हणूनच धर्म हा सत्याचा शोधक आहे आणि धर्मामुळे समाज तग धरू शकतो. मानवाचे व्यक्तिमत्त्व घडविण्यात धर्माचा महत्त्वाचा वाटा असतो.

**धर्माचा उगम —**

पावरा धर्माचा विचार करता, या जमातीच्या मनात रुजलेल्या भावना लक्षात घेणे महत्त्वाचे ठरते, कारण धर्माची मुळे त्यांच्या पूर्वजापासून आलेल्या चालीरीति यांच्याशी बांधील आहे. नर्मदा नदीच्या तीरावर पावघाट म्हणून एक जागा आहे आणि ही जागा महाराष्ट्र, मध्यप्रदेश आणि गुजरातच्या सीमेलगत आहे. या परिसरात बरेचसे भिल्ल जमातीचे लोक राहतात आणि म्हणूनच यांचे वर्चस्व/पगडा तिथे जास्त आहे. इंदल सण या गोष्टीचे महत्त्व पटवून देतो. पावघाट पावराच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते कारण बरेचसे पावरा लोक येथूनच राजबर्डीला स्थायिक झालेले आहेत; किंवा इतरत्र पसरले आहेत. त्यांच्या धार्मिक प्रथेचा विधी, आचार, विचार प्रसार लिखित नसून तोंडानेच/बोलीनेच झाला आहे. सगळ्याच चालीरीति किंवा रीतिरिवाज ह्या परंपरागत आहेत. आधीच्या लोकांनी किंवा पूर्वजांनी असे केले होते म्हणून आम्ही असे विधी किंवा कार्य करतो अशा आशयाचे सूर ऐकावयास मिळतात आणि म्हणूनच परंपरा कशी चालत आली, एखादा धार्मिक विधी त्याचप्रकारे का करतात अशा गोष्टींना त्यांच्याकडे उत्तर नसते. या विधींना या जमातीमध्ये त्यांच्या समाजजीवनात किंवा धर्मात फार महत्त्वाचे स्थान असते, तो म्हणेल ती पूर्व दिशा.



03233 7A

**धर्माची परिकल्पना –**

पावरा समाज आधिभौतिक आणि आधिदैविक शक्तीवर जास्त श्रद्धा ठेवणारा आहे. ते काही देव आणि देवता यांची पूजा करतात. देव देवतांविषयीची भावना सुद्धा काल्पनिक आढळते. त्यांच्या घरात मूर्ती, पुतळे किंवा एखादे कुलचिन्ह सुद्धा आढळत नाही. राजबर्डी गावामध्ये तीन ठिकाणी देवळे आहेत. दोन ठिकाणी फक्त दगड ठेवलेले असून एक दगड टेकडीवर आहे. या ठिकाणी सागाचे झाड आढळते. पावरांचा असा समज आहे की, हे देव आहेत, ते रागावतात, शिक्षा देतात किंवा प्रसन्न सुद्धा होतात. या देवाव्यतिरिक्त भूत प्रेताला सुद्धा या धर्मात खूप महत्त्व दिले जाते. हे भूत-प्रेत दैनंदिन व्यवहारामध्ये अडथळे आणू शकतात. येथील महत्त्वाच्या देव आणि देवता म्हणजे इंद्र, जनूबाई (इंद्राची पत्नी) होळीमाता आणि वागदेव. यांच्या ज्या चालीरीति आहेत; त्या हिंदू धर्माशी मिळत्या-जुळत्या आहेत. हा एकच गणगोत्र असलेला समूह असल्यामुळे येथे एकाच प्रकारचे सण आणि उत्सव साजरे करण्यात येतात. आधी उल्लेख केल्याप्रमाणे पावरा जमातीमध्ये बुडव्याला अग्रगण्य स्थान आहे. बऱ्याचवेळा तोच पूजा-अर्चा करतो आणि म्हणूनच तो लोकांच्या आणि देवांच्या मधला दुवा समजला जातो. बऱ्याचशा धार्मिक गोष्टी (पूजा-अर्चा, सण, उत्सव) याच्या मध्यस्थीतून केल्या जातात.

**बुडवा एक महत्त्वाचा माणूस –**

पावरा समाजामध्ये बुडव्याचे स्थान महत्त्वाचे आहे. बुडवा फक्त धार्मिक विधी पार पाडीत नाही तर; औषधोपचार सुद्धा करतो. बुडवा आपले इतर व्यवहार करून धार्मिक विधीमध्ये भाग घेत असतो. तो लोकांसाठी ध्यानधारणा किंवा देवाचे ऋण फेडण्यासाठी सुद्धा बुडवा पूजा करतो. जादू-टोण्याचा लोकांवर बराच पगडा असल्यामुळे तो नाहीसा करण्यासाठी सुद्धा बुडवा उपयोगी पडतो. मंत्र जर व्यवस्थित आणि देवाला स्मरून/साक्ष ठेवून उच्चारला तर त्याला फायदा होतो अशी धारणा आहे. पण या व्यवसायामुळे आर्थिक फायदा होतोच असे नाही. पण बऱ्याच वेळा त्याला जेवणासाठी निमंत्रित केले जाते. फार क्वचित प्रसंगी त्याला नवीन कपडे मिळतात. बुडव्याला बऱ्याच रोगांची माहिती असते. त्यावरून किंवा त्याच्या अनुभवावरून तो रोग्यांचे निदान आणि औषधोपचार करतो. यामध्ये मुख्यत: झाडपाला, कंदमुळे, फळ, आणि फुले याचा उपयोग केला जातो. मंत्र आणि पूजा विधी आटोपल्यावर औषध दिले जाते. काही पैसे न घेता केलेल्या या कामामुळे तो सर्वांना आवडतो. सर्व लोक त्याच्याशी प्रेमाने वागतात आणि म्हणूनच तो लोकप्रिय असतो. बुडव्यावर गावातील लोकांचा खूप विश्वास असतो. एका गावामध्ये एकापेक्षा जास्त (दोन किंवा तीन) बुडवे असतात. जरी या बुडव्यास जास्त प्रमाणात मान मिळत असला तरी या बुडव्याला येथील लोक घाबरतात. सहसा कोणी त्याच्या वाटेला जात नाही. लोकांना अशी भीती असते की, हा आपल्यावर देवाचा कोप घडवून आणील. आणि म्हणूनच बुडव्यास भीतीयुक्त आदराने येथील लोक वागवतात.

बुडवा हा घरचा डॉक्टर (Family Doctor) सुद्धा असतो. जो बुडवा आपल्या जास्त जवळ राहतो त्याला लोक पूजा-अर्चा करण्यासाठी किंवा आजारपण घालविण्या-साठी बोलावतात. सगळयाच प्रकारचे विधी फक्त त्याच बुडव्याने पार पाडायचे असतात. एखादा असाध्य रोग जर बुडव्याला बरा करता आला नाही तर तो दुसऱ्या बुडव्याची मदत घेतो.

**बुडवा कोण होतो/बुडवा कोणास म्हणावे?**

पावरा जमातीची अशी समजूत आहे की, कोणतीही व्यक्ती बुडवा होऊ शकत नाही. ती एक देवाची देणगी आहे. जो



03233 7B

देवाची भक्ती, धर्मविधी किंवा आचारसंहिता पाळतो, असाच माणूस बुडवा होऊ शकतो. त्याला ध्यानधरणा सुद्धा करता आली पाहिजे, औषधोपचार करता आला पाहिजे. अशा प्रकारचा एखादा माणूस मग पावरा लोक निवडतात व देवापुढे सगळयांच्या संमतीने बुडवा म्हणून तो काम करू लागतो. राजबर्डी मधला रादिया सिंग सांगत होता की, एकदा त्याच्या स्वप्नात देव आला. तिथे भव्य देऊळ होते, झाडी होती, घनदाट अरण्य होतं. नंतर त्याने एक विशिष्ट प्रकारचा आवाज ऐकला, तो आवाज मंत्राच्या रूपाने त्याच्या कानावर पडत होता. त्याला मंत्र मिळाला आणि पूजाविधी कशी करावयाची याचे सुद्धा ज्ञान मिळाले. त्याच गावात राहणाऱ्या दुसऱ्या बुडव्याची सुद्धा हीच कहाणी. शंकर नावाच्या या बुडव्याला स्वप्नात देव दिसला. कोणता देव? सांगता येत नाही. देव त्याला जंगलात घेऊन गेला आणि त्याला मंत्र दिला. रोग्यांना औषधे कशी द्यायची याचे ज्ञान दिले आणि आता तू बुडवा होशील असे सांगितले.

बऱ्याचवेळा बुडवे (बुडवा होण्याच्या आधीचा काळ) घरापासून अलिप्त/वेगळे राहतात किंवा वेगळे घर तरी बांधतात. काही बुडवे ज्यांना धर्माबद्दल आस्था आहे, पूजा-अर्चा करण्याबद्दल प्रेम आहे, असा माणूस कुठेतरी, इकडे तिकडे किंवा रानात भटकत असतो. त्यानंतर तो गावात परत येऊन बुडवा म्हणून काम पाहतो. साधारणतः गावात कोणीच देवाची जी इच्छा आहे ती डावलू शकत नाही. त्याचप्रमाणे फारच थोडे लोक बुडवा म्हणून काम करायला उत्सुक असतात.

गावातील लोक सांगतात, "बुडवेगिरी" ही परंपरा वंशपरंपरेने चालत आलेली प्रथा आहे. वडील मुलाला बुडव्याची दीक्षा देतात. पण एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे फक्त वडीलधारा (थोरला) किंवा धाकटा मुलगाच बुडवा होऊ शकतो. मधला मुलगा बुडवा होऊ शकत नाही. बुडव्याच्या घरचे धार्मिक वातावरण त्याच्या मुलाला बुडवा बनण्यास कारणीभूत ठरते आणि त्याचमुळे मुलांना विविध प्रकारच्या व्याधी, रोग, औषधोपयोगी झाडे, कंदमुळे, फळ, फुले आणि ध्यानधारणा इत्यादी महत्त्वाची माहिती मिळते. याचवेळी हेही लक्षात घ्यावयास पाहिजे की, कोणीही बुडवा सहजा सहजी दुसऱ्याला मंत्र देत नाही. त्याना असे वाटते की, दुसऱ्याला जर मंत्र दिला तर त्याची तीव्रता खूपच कमी होते, मंत्र लागू पडत नाही आणि नंतर त्याचा काहीच उपयोग होत नाही, आणि म्हणूनच बरेच बुडवे दुसऱ्याला मंत्र देण्याच्या भानगडीत न पडता आपल्याच मुलांना ते ज्ञान देतात.

बऱ्याच वेळी असेही घडते की, मरतेवेळी बुडवा आपल्या मुलास जवळ बोलावून महत्त्वाचे आणि उपयोगी असलेले मंत्र देतो. अशी ही बुडवेगिरीची परंपरा चालू असते. बुडवेगिरीचा जरी शिक्का मिळाला तरी त्याला रोग बरा करून किंवा भूतप्रेत काढून आपण खरा बुडवा आहोत हे सिद्ध करावे लागते. त्यानंतर त्याच्यावर लोकांचा विश्वास बसतो.

देवाच्या नियमाप्रमाणे फक्त माणूसच बुडवा होऊ शकतो. शंकर या बुडव्याने तर एखादी स्त्री बुडवी होण्यासंदर्भाची कल्पना फेटाळून लावली. तो पुढे म्हणतो, बाई ही शुद्ध नसते आणि म्हणूनच तिच्या हातचे कार्य सिद्धीला पोहचत नाही. पण याउलट रादिया सिंग म्हणतो, एखादी बाई बुडवी होऊ शकते आणि भूतप्रेत किंवा भानामती ती काढू शकते.

**पूजा कशी करतात/पूजा कशाप्रकारे केली जाते?**

**पूजेचे प्रकार :** सगळयाच पूजा किंवा विधी ही बुडव्याच्या हातानेच झाली पाहिजे. मग तो देवापुढील नैवेद्य, देवाचा आशीर्वाद

किंवा मग देवाचा कोप काढण्यासंबंधीची पूजा असो. बुडवा पूजेचे कपडे घालून (त्यातल्या त्यात नवीन असलेले) पूजा करतो. बऱ्याच वेळा पूजा ४ प्रकारांनी केल्याचे आढळले.

**१ ) साधी पूजा –**

साध्या पूजेमध्ये बुडवा खाली बसतो आणि आपल्यापुढे टॉवेल घेतो. यामध्ये पानात ज्वारी ठेवतो आणि मग मंत्राचा जप करतो. यात बुडव्याचे फक्त ओठ हालतात पण आवाज काहीही येत नाही. जेव्हा तो मंत्र उच्चारतो तेव्हा तो ज्वारीचे दाणे ७-८ ठिकाणी विभागून ठेवतो. अशा प्रकारची ही साधी पूजा. ही पूजा देवाचे आशीर्वाद लाभण्यासाठी, सुखी ठेवण्यासाठी, ऐश्वर्य लाभण्यासाठी केली जाते.

**२ ) बरे करणे –**

दुसऱ्या प्रकारच्या पूजेमध्ये रोग्याला बरे करण्यासाठी मंत्र उच्चारले जातात. यात रोग्याला खाली ताठ बसण्यास सांगण्यात येते, आणि बुडवा उभा राहून मंत्र उच्चारतो. तो रोग्याच्या डोक्यावर ज्वारीचे दाणे टाकतो आणि त्याचवेळेस मंत्र सुद्धा जपत असतो. याच वेळेस रोग्यास कोणता रोग झाला हेही सांगण्यात येते. आणि त्या प्रमाणात उपचार केले जातात.

**३ ) भूतप्रेतासाठी पूजा –**

तिसऱ्या प्रकारामध्ये भूत-पिशाच्च लागू नये म्हणून पूजा केली जाते. बुडवा या पूजेमध्ये दाराच्या उंबरठ्यावर बसतो आणि हात लांब करून एकमेकांवर ठेवतो. आतल्या खोलीत ज्वारीचे दाणे ठेवून मंत्र उच्चारतो. पावरा लोकांच्या घराला फक्त एकच दार असते. खिडक्या किंवा झरोके नसतात. त्यामुळे अशी भावना-धारणा आहे की, भूत घरात दारातून प्रवेश करीत नाही आणि म्हणूनच भूताचा शिरकाव होऊ नये म्हणून उंबरठ्यावर बसून पूजा केली जाते.

**४ ) सण किंवा उत्सवासाठी पूजा –**

या प्रकारात सण किंवा उत्सवासाठी केल्या जाणाऱ्या पूजेचा समावेश होतो. यात प्रमुख बुडवा भाग घेतो. इतर बुडवे पूजेमध्ये सहभागी होत नाही. प्रमुख बुडवा जर गावाला गेला असेल किंवा आजारी असेल तरच दुसऱ्या बुडव्याला पूजेसाठी पाचारण केले जाते.

बऱ्याच वेळा बुडव्यास वास्तूशांतीच्या पूजेस बोलाविले जाते. घर बांधतेवेळेसच बुडवा येऊन महत्त्वाच्या सूचना देऊन जातो. सगळे घर बघतो, काही फाटे/बासे व्यवस्थित आहे की नाही बघतो, आणि नंतर मग एखादा फाटा बदलविण्याचा असेल तर बदलला जातो. सगळं काही ठीक झाल्यावर पूजा केली जाते.

बुडवा मंत्राच्या साहाय्याने चमत्कार सुद्धा घडवून आणतो. सन १९७९ साली राजबर्डीस दुष्काळ पडला होता. गावातील लोकांना वाटले देवाचा कोप झाला, आणि मग पूजा-अर्चा, विधी, मंत्रजप बुडव्याकरवी करून घेतली. याच वेळेस बुडव्याने एक वेगळीच पूजा केली. एका ताटलीत पाणी घेतले आणि त्यात तो नाचू लागला. पाण्याची पातळी जर हळूहळू कमी झाली तर पाऊस पडणार नाही. बरेच पाणी जर ताटलीत राहिले तर पाऊस पडेल. गावातील लोकांच्या म्हणण्याप्रमाणे बुडव्याने हा प्रयोग केल्यानंतर पावसाची एक हलकिशी सर येऊन गेली.

**पूजेचे साहित्य –**

पूजेचे साहित्य साधे आणि बऱ्याच वेळा सारखेच असते. जेणेकरून ते लवकर उपलब्ध होईल. यात प्रामुख्याने ज्वारी, नारळ, अगरबत्ती, आरती, तूप, शेंदूर, सुपारी, दोरा आणि कापड यांचा समावेश असतो.

पूजा झाल्यानंतर कोंबडी किंवा बकरे बळी देण्याची प्रथा आहे. एकही पूजा अशी

नाही की जी दारूमुळे पूर्ण होऊ शकते. मोहाची दारू पूजेनंतर घेण्याची प्रथा आहे.

**आजाराकडे बघण्याचा दृष्टीकोण –**

सगळेच्या सगळे आजार धार्मिक भावनेतून बघितले जातात. पावरा असे मानतात की, काहीतरी अद्भूत शक्ती (Supernatural Power) आहे आणि ती आपल्यावर रागावली किंवा तिचा कोप झाला तर आपण आजारी पडतो. ते असेही समजतात की, काही आजार चांगल्या साठीच असतात तर काही उपद्रवी असतात.

हे आजारपण आणि त्याकडे बघण्याचा दृष्टीकोण वेगवेगळ्या प्रकारात विभागता येईल.

१ यात प्रामुख्याने देवाचा समावेश केला आहे, आणि देवामुळे झालेले रोग/आजार चांगले समजले जातात. यामध्ये देवी येणे, गोवर, कांजण्या इत्यादींचा समावेश असतो.

२ यात देवाचा कोप होणे किंवा काहीतरी पाप केले म्हणून त्याची शिक्षा या आणि अशाच प्रकाराशी निगडित त्यांच्या भावना जोपासलेल्या असतात. खूप वर्षापर्यंत राहणाऱ्या रोगांचा यात समावेश असतो, असे की कुष्ठरोग, टी.बी., अर्धांगवायू इत्यादी.

३ यात भूत-प्रेतांचा समावेश असतो. या ज्या अदभूत शक्ती, भूत-प्रेत आहे, यांचा मानवाने आपल्या सोयीप्रमाणे उपयोग करून घेतला. एकमेकांचे हेवेदावे, वैर काढण्यासाठी सुद्धा पूजा करण्यात येते. यात बरेचसे प्रकार जसे की, चेटूक, डाकीण, मूठ मारणे, जादू-टोणा किंवा करणी इत्यादी असतात.

याचप्रमाणे प्रत्येक रोग विचारात घेतला जातो. यावर उपचार म्हणजे धार्मिक विधी. धार्मिक वृत्तीचा जबरदस्त पगडा पावरा लोकांच्या मनामध्ये असल्यामुळे इतर गोष्टींवर ते विश्वास ठेवीत नाहीत.

**रोगाचा शोध –**

प्रत्येक रोगावर उपचार म्हणजे बुडवा. बुडवा सांगेल त्याप्रमाणे औषधोपचार केले जातात. बऱ्याचदा ''दाणापूदी'' हे तंत्र रोग्याचे लक्षण आणि त्याची तीव्रता समजण्यासाठी वापरण्यात येते. यामध्ये बुडवा रोग्यास प्रश्न विचारतो व त्याचे उत्तर बुडवा देतो. अशी समजूत आहे की, हे उत्तर बुडव्यास देव सुचवितो. यासाठी सामुग्री असते ज्वारी आणि पेपर. ज्वारीच्या सहाय्याने काही आकृत्या काढल्या जातात आणि यावरूनच रोगांचे कारण शोधता येते.

समजा रोग्याची स्थिती गंभीर असेल तर बुडवा उतारा काढतो. यामध्ये अंड्याचा वापर करण्यात येतो आणि त्याला काळे लावले जाते आणि हे सगळे पानात गुंडाळून झाडाखाली ठेवण्यात येते. यामुळे रोगाची पडताळणी (Detection) होते आणि यावर मार्ग काढला जातो. दुसऱ्या प्रकारात उताऱ्यामध्ये ज्वारी, कोंबडी, सुपारी, अगरबत्ती इत्यादी साहित्य दाराजवळ (उंबरठ्यावर) ठेवले जाते आणि मग भक्तीभावाने पूजा करून हे साहित्य देवाचरणी वाहिले जाते.

**रोगांवर उपचार –**

बुडव्याकरवी रोगाचे निदान झाल्यानंतर त्याला औषध दिले जाते. बऱ्याचवेळा मंत्रानंतर औषध दिले जाते. जर समजा टायफॉईड (Typhoid) असेल तर ''सिरीची'' मुळे वाटून पाण्यातून देतात आणि मंत्र म्हणून रोग्याच्या अंगावर शिंपडतात. परंतु जर मोठी माता (small pox) असेल तर देवीजवळ बरे होण्यासाठी शपथ घ्यावी लागते. बरे वाटल्यानंतर पूजा अर्चा केली जाते. पूजेच्या साहित्यात दोन सुपाऱ्या, बांगड्या, कोरडा नारळ, शेंदूर, गुलाल, लाल पापड, गव्हाचे पीठ, बकरं किंवा दोन कोंबड्या देवीस वाहिल्या जातात. यालाच उतारा म्हणतात. ही पूजा प्रथम गाईच्या गोठ्यात केली जाते.

वरील सगळ्या गोष्टींचा सारासार विचार केला असता असे दिसून येते की, पावरा

जमातीचे लोक देवावर फार श्रद्धा ठेवतात, आणि देवाचा आपल्यांवर कोप होऊ नये म्हणून पूजा अर्चा सुद्धा करतात.

चेटूक केल्यामुळे जर एखाद्याला आजार झाला असेल अशा व्यक्तिचा मातीचा पुतळा तयार करण्यात येतो आणि हा मातीचा पुतळा जमिनीमध्ये पुरून टाकतात. पावरा समाजाची अशी भावना आहे की, जोपर्यंत हा पुतळा जमिनीत पुरुन टाकत नाही तोपर्यंत "बाधलेली" व्यक्ती अशक्त होत राहणार आणि एक दिवस संपणार.

डाकिणीमुळे जर बाधा झाली असेल तर दैवीशक्तीने बुडव्यास नक्की कोण आहे याचा पत्ता लागतो किंवा तो त्याबद्दल माहिती गोळा करतो. तो कोणत्या गावाचा, आपल्याच गावातला की बाहेरचा, त्याच्या घरी माणसे किती, जनावरे किती, त्या व्यक्तिचे वर्णन सुद्धा करतो पण मात्र तिचे नाव सांगत नाही, अशाप्रकारे नक्की कोण आहे याचा गावकऱ्यास पत्ता लागला आणि खात्री पटली की त्या व्यक्तिस ते गाव सोडावे लागते.

एखादा आजार जर मूठ मारणे किंवा जादूटोण्यामुळे होत असेल तर मात्र बुडवा पटकन त्या व्यक्तिचे नाव सांगतो. यानंतर दोन्ही पार्ट्यांतर्फे पंचायत बोलाविली जाते. यामध्ये खरे/खोटे यावर चर्चा घडवून आणली जाते, आणि त्यातच समेट घडवून आणला जातो किंवा दंड आकारला जातो. बऱ्याच वेळा या वादातून भांडणसुद्धा उद्‌भवते. परंतु जवळ जवळ ८०-९० टक्के प्रकरणात पंचायतसमोर न्यायनिवाडा होतो. अशाप्रकारे रोग आणि सामाजिक प्रश्न एकमेकात असे गुंतलेले आढळतात.

प्रसूतिकाळ, जन्म, वयात येणे, लग्न, पुनर्विवाह, घटस्फोट आणि मृत्यू या महत्त्वाच्या मानवी जीवनातील घटना. यामध्ये सुद्धा बुडव्यास महत्त्वाचे स्थान असते. आणि त्याच्याकडून या सगळयांसाठी विधी/पूजा-अर्चा केली जाते. पुनर्जन्मावर पावरांचा विश्वास आहे.

**सण/उत्सव –**

उत्सव म्हटला की, तिथे सगळे लोक (नातेवाईक) एकत्र येतात. गाठी-भेटी होतात. यामधूनच त्यांची एकसंध भावना निर्माण होते.

पावरा प्रामुख्याने ५ सण साजरे करतात. इंदल, जत्रा, वाघदेव, होळी आणि नवाई. यातील पहिले दोन नवस बोलण्यासाठी किंवा फेडण्यासाठी साजरे केले जातात. इतर सण गावातले सण असून वर्षातून एकदाच साजरे केले जातात.

**इंदल** : इन्द्र देवाच्या स्मरणार्थ हा उत्सव साजरा केला जातो. हा सण साधारणत: नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये साजरा केला जातो. हा सण आजूबाजूच्या गावात मिळून साजरा करीत असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर होतो आणि बरेच लोक, त्यांचे नातेवाईक एकत्र येतात. गावातील सरपंच तारीख ठरवितात आणि नंतर सगळया आजूबाजूच्या गावातील लोकांना ही माहिती देण्यात येते. त्या दिवशी वाजत-गाजत सगळे लोक इंदल मैदानावर जमतात. कोंबी नावाच्या झाडाच्या फांद्या यावेळेस पूजेसाठी वापरतात. त्याचप्रमाणे कोंबड्यासुद्धा देवाला वाहतात. बुडवा मंत्र जपतो आणि पूजा-अर्चा करतो. प्रजनन किंवा लोकभरभराटी (Fertility) वाढवावी म्हणूने कोंबीच्या झाडाच्या फांद्या येथील स्त्रियाजवळ दिलेल्या असतात. हा सण प्रामुख्याने ३ गोष्टीसाठी साजरा केला जातो. १) भरघोस पीक येण्यासाठी २) लोकसंख्या वाढविण्यासाठी ३) रोग बरा होण्यासाठी.

विधी साजरी करण्याची खास एक प्रथा आहे. ज्या लोकांना इंदल साजरा करावयाचा असतो त्यांनी एक खड्डा खोदून त्यामध्ये ज्वारी आणि कोंबीच्या फांद्या पुरायच्या. दुसऱ्या दिवशी जर ज्वारीच्या दाण्याची संख्या वाढली तर मनातील इच्छा पूर्ण होते असा

समज आहे. ही सर्व घटना बुडवा सोबत असताना होते. अशा तऱ्हेने इंदल साजरा करतात. बुडव्याने सांगितल्याप्रमाणे एखाद्या गोष्टीची पूर्तता करण्यासाठी शपथ घेतली जाते. अशा वेळेस नवस बोलतात. इंदल उत्सवात तो नवस फेडला जातो. नवस पाळणे (डोक्यावरील केस वाढविणे) आणि नवस फेडणे (डोक्यावरील केस ठराविक काळानंतर काढणे) या गोष्टी पावरा तंतोतंत पाळतात. यावरून हे स्पष्ट होते की, पावरा लोक धार्मिक वृत्तीचे असून ते त्याचे पालन काटेकोर रीतीने करतात.

**जत्रा –**

ज्याप्रमाणे इंदल मुलांच्या संदर्भात (मुलं व्हावी म्हणून, मुलांचे नवस करणे किंवा फेडणे) साजरा केला जातो त्याच-प्रमाणे जत्रा हा उत्सव/सण मुलींसाठी साजरा केला जातो. जातूबाई (इंद्राची पत्नी)च्या स्मरणार्थ हा सण साजरा केला जातो.

जर एखाद्या स्त्रीला पुत्र होत नसेल तर त्यासाठी बुडव्यांकरवी पूजा केली जाते. याचवेळी बुडवा २९ पानं आणि २९ सुपाऱ्या घेऊन पूजा करतो. यामध्ये कोंबडे आणि बकरे सुद्धा बळी दिले जातात, आणि नंतर सगळ्यांना याची मेजवानी दिली जाते.

**नवाई –**

नोव्हेंबर डिसेंबरमध्ये हा उत्सव पीक कापणी/सुगीच्या काळात साजरा केला जातो. नवीन धान्य घरी येते आणि अशाच धनधान्याच्या राशी येत राहोत म्हणून हा सण साजरा करतात. बुडवा घरी येऊन पूजा-विधी आणि काही मंत्र म्हणून जातो. या सणात भात, वरण आणि मोहाची दारू इत्यादींचा प्रामुख्याने समावेश असतो. संपूर्ण गावात घरोघरी हा सण आनंदाने, उत्साहाने साजरा करतात.

**वागदेव –**

वागदेव हे ग्रामदैवत समजले जाते. ऑगस्ट, सप्टेंबरमध्ये दसऱ्याच्या काळात साधारण मंगळवार किंवा बुधवार जो आधी वार येईल त्या दिवशी साजरा करतात. गावाच्या सीमेलगत वागदेवाचे मंदिर आहे तिथे पूजा केली जाते. यावेळेस कोंबडे-बकरे यांचा बळी दिला जातो.

**होळी –**

होळी हा सण सुद्धा हिंदू पद्धतीने साजरा करतात. पोलिस पाटीलच्या हातानी होळी पेटविली जाते. बुडवा पूजा करतो. होळी पेटविल्यानंतर सगळे लोक फेर धरून नाचतात आणि गातात.

वरील सगळे सण पावरा लोक मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने साजरे करतात. यावेळेस बरेचसे लोक दुरून आलेले असतात व भेटीगाठी होतात. एकेमकांचे सुख-दुःख कळते आणि म्हणून प्रत्येक सणास अनन्य-साधारण महत्त्व आहे.

जेव्हा आपण पावरा धर्माकडे बघतो तेव्हा असे दिसून येते की, प्रत्येक पावरा हा त्यांच्या धर्माच्या चालीरिती, रिवाज, रूढी आणि परंपराशी निगडित आहे. धर्माची मुळे पावराच्या मनामध्ये इतकी खोल रुजली गेली की, सहजासहजी ते त्यातून बाहेर येत नाहीत, आणि म्हणूनच प्रत्येक पूजेचे, विधीचे तंतोतंत पालन केले जाते. जर आपण त्याचे पालन केले नाही तर आपला सर्वनाश होईल अशी भीती त्यांच्या मनात असते. साधी आणि सरळ राहणी, चांगले आचार-विचार व आपुलकीची भावना यातूनच पुढे आलेली दिसते. पण हल्ली भोळ्या-भाबड्या पावरा जमातीस धर्माच्या नावाखाली लुबाडण्यात येत आहे. काही गोष्टी जरी चांगल्या असल्या तरी असे भोंगळ प्रकार थांबवायला पाहिजेत तरच पावरा लोकांचे जीवनमान सुधारेल.

# सातपुड्यातील आदिवासींचे देव आणि देवता

**डॉ. लता छत्रे**

कोणत्याही जमातीचा किंवा समाजाचा धर्म समजून घ्यायचा म्हटले म्हणजे सर्वात प्रथम प्रश्न डोकावतो तो म्हणजे त्या जमातीमध्ये किंवा समाजामध्ये कोणते देव मानले जातात? या देवांविषयी त्यांचे काय विचार आहेत? या प्रश्नांच्या उत्तरातूनच त्या जमातींचा 'धर्म' समजून घेण्यास मदत होते. प्रस्तुत लेखात धुळे आणि अक्राणीमहाल येथे वस्ती करून राहिलेल्या 'पावरा' या आदिवासी जमातीच्या देवांविषयी माहिती सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे.

जीवनात विविध प्रकारच्या घटना घडत असतात. काही घटना आनंददायी, दु:खदायी असतात तर काही घटना विस्मयकारक असतात. आनंददायी घटना मनुष्याला नेहमीच हव्याहव्याशा वाटतात. तर दु:खदायी घटना त्याला नकोशा वाटतात. अशा घटना टाळण्याचा तो प्रयत्न करतो. त्यासाठी राज्यसंस्थांसारख्या संस्था स्थापन केल्या जातात. परंतु काही दु:खदायी घटना टाळू म्हटल्या तरी टाळता येणे त्याला अशक्य असते. अशा घटनांवर नियंत्रण ठेवणे हे त्याच्या विचारांच्या आणि आचारांच्या बाहेर असते. अशावेळेस मनुष्य त्याच्या आकलन-शक्तीच्या जोरावर या घटनांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करतो. या घटनांचा सूत्रधार कोणीतरी अमानवी शक्ती असली पाहिजे असा त्याचा समज होतो. या अमानवी शक्तीबद्दल त्याच्या मनात भीती, प्रेम, वात्सल्य, आदर इत्यादी भावना निर्माण होतात. या भावनांची अभिव्यक्ती म्हणजेच मानवाने निर्माण केलेले देव आणि त्या देवांच्या उपासनेचे विविध मार्ग किंवा विधी. मानवाचा असा समज आहे की उपासनेने आणि योग्य पद्धतीने केलेल्या विधीमुळे देव म्हणजे अमानवी शक्ती प्रसन्न होते आणि जीवनात दु:खदायी घटना घडू नयेत म्हणून नियंत्रण ठेवते. देव या संकल्पनेमागे असलेल्या या समजामुळे आणि श्रद्धेमुळे मनुष्य देवाला विविध रूपात पाहू शकतो. जसे सृष्टीचे पालन करणारा, तिला निर्माण करणारा देव, मनुष्याचे नशीब लिहिणारा देव, मनुष्याला सुख, समृद्धी आणि संपत्ती देणारा देव इत्यादी.

प्रत्येक मनुष्याचा मग तो शहरात राहणारा सुशिक्षित सुसंस्कृत शहरवासी असो, वा दुर्गम भागात राहणारा, अशिक्षित आदिवासी असो, त्याच्या देवांविषयीच्या आणि त्यांच्या उपासनेविषयीच्या संकल्पना असतात. या देवांचे आणि त्यांच्या उपासनांचे स्वरूप समजून घेत घेतच आपण त्या जमातींचा धर्म समजून घेत असतो. सात-पुड्याच्या कुशीत राहणाऱ्या आदिवासीच्याही देवांबद्दल काही संकल्पना आहेत. त्यांची उपासना करण्याचे काही विधी आहेत. प्रस्तुत लेखात सातपुड्याच्या कुशीत राहणाऱ्या पावरा या आदिवासी जमातीचा धर्म समजून घेण्याच्या दृष्टीने त्यांच्या देवदेवतांबद्दलच्या कल्पना व त्यांची उपासना करण्याच्या पद्धतीचा आढावा घेतला आहे.

सातपुड्याच्या कुशीमध्ये अनेक छोट्या छोट्या गांवामधून प्रामुख्याने दोन प्रकारचे आदिवासी राहतात. एक म्हणजे भिल्ल व दुसरे म्हणजे पावरा. पावरा आदिवासी

स्वतःला रजपूत समजतात. असे सांगितले जाते की ते राणा प्रतापच्या वंशातले असून राणाप्रतापने जेव्हा मेवाडचा त्याग केला तेव्हा त्याने त्याच्याबरोबर असलेले भिल्ल सैन्यही आणले आणि तेव्हापासूनच येथे पावरा व भिल्ल या आदिवासी जमाती रहात आहेत.

या आदिवासींचे देव म्हणजे इंदल, पांढर मोगरा, अस्तंभ आणि तोरणमाळ. याशिवाय श्रीकृष्णावरही त्यांचे विशेष प्रेम आहे. श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्यावरील लोक-कथाही बऱ्याच आहेत. श्रीकृष्णाला ते गाण्डा ठाकूर म्हणतात तर अर्जुनाला फण्टाराजा म्हणतात.

इंदल म्हणजे इंद्रदेव, देवांचा राजा. या देवाच्या कृपेमुळे पाऊस चांगला पडतो आणि शेतात धान्य चांगले येऊन घरात सुबत्ता नांदते असा या पावरा आदिवासींचा समज आहे. त्यासाठी ते या देवाची आराधना करतात. सर्वसाधारणपणे दर पाच वर्षांनी या देवाची पूजा करतात. ही पूजाच इंदलची पूजा म्हणून ओळखली जाते. ही पूजा जशी दर पाच वर्षांनी केली जाते, त्याचप्रमाणे घरात बाळाचे आगमन झाल्यावर ते बाळ पाच वर्षांचा व्हायच्या आत ही पूजा करावी लागते. ही पूजा होईपर्यंत बाळाचे केस कापायचे नसतात, तर या पूजेच्या दिवशी बाळाच्या केसांची बट प्रथमच कापली जाते.

इंदलची पूजा डिसेंबर ते फेब्रुवारी या महिन्यात केली जाते. पूजेच्या आधी आठदिवस सर्व नातेवाईकांना हळद, तांदूळ व शेंदूर यांच्या पुड्या देऊन आमंत्रण दिलेले असते.

इंदलच्या पूजेची सुरवात संध्याकाळच्या सुमारास केली जाते. संध्याकाळी जंगलात जाऊन 'कळंब' वृक्षाच्या तीन फांद्या तोडतात. या फांद्या तोडण्यापूर्वी झाडाला दोऱ्यांनी वेढे देतात. झाडाची साग्रसंगीत पूजा करतात. नंतर या तोडलेल्या फांद्या वाजतगाजत घरी आणतात. घरात जेथे इंदलचा विधी करायचा असतो तेथे तीन खड्डे करतात. हे खड्डे ज्वारीने शिगोशिग भरतात व या तीन खड्ड्यांमध्ये तोडून आणलेल्या फांद्या रोवतात. फांद्या कोमेजून जावू नयेत म्हणून या फांद्यावर दूध आणि पाणी बेलाच्या पानाने शिंपडतात. असे करीत असताना फांद्या-भोवती प्रदक्षिणा घालतात. हे पाणी आणि दूध शिंपडण्यासाठी एक कुँवारा रात्रभर सतत तेथे बसलेला असतो. पुजारी या फांद्यांना हळद व तूप लावतो व पूजा करीत असताना अधूनमधून शेंदूर व तांदूळ टाकतो. या फांद्यांभोवती हे आदिवासी नाचतात आणि गाणी म्हणतात.

दुसऱ्या दिवशी पूजा केलेल्या या फांद्यासमोर बकरा कापतात. बकरा कापण्या-पूर्वी त्याची पूजा करतात व त्याच्या अंगावर पाणी शिंपडतात. पाणी शिंपडल्यावर बोकडाचे अंग शहारते. या शहारण्याचा अर्थ ते आदिवासी असा करतात की इंदलच्या पूजेचा विधी व्यवस्थितपणे पार पडलेला आहे आता, कापले तरी चालेल.

इंदलच्या पूजेच्या प्रसंगी नातेवाईक इंदल करणाऱ्या व्यक्तिस भेटवस्तू देतात. काही वेळेस भेट म्हणून बोकड, कोंबडंही देतात. या दिवशी गावातील सगळ्यांना जेवणाचे आमंत्रण असते.

पांढरमोगरा नावाची एक देवी आहे. तिला पांढरमाता, देवमोगरी किंवा देवमोगी असेही म्हणतात. गुजराथ राज्यात सात-पुड्याच्या एका उंच कड्यावर हिचे देवस्थान आहे. ही जागृत देवता आहे असे मानले जाते. मूल व्हावे म्हणून हिला नवस केला जातो. जर मुलगी झाली तर बकरी सोडली जाते व या सोडलेल्या बकरीचे पालन एखादा गरीब, गरजू आदिवासी करतो. मात्र मुलगा झाला तर या देवीच्या पायाशी बकऱ्याचा बळी दिला जातो.

या पांढरमातेची पितळेची मूर्ती असून तिच्या हातात कलश असून त्या कलशावर

नारळ आहे. माघी अमावस्येला हिची जत्रा भरते. त्या दिवशी तिला आंघोळीला नेले जाते व ते पाणी तीर्थ म्हणून स्वीकारले जाते.

हिच्या देवळाजवळून एक झरा वाहतो. त्या झऱ्याभोवती कुंपण घातलेले आहे व तेथेच बेनुहेझमच्या मूर्तीची स्थापना केलेली आहे. बेनुहेझम म्हणजे श्रीकृष्ण आणि अर्जुन. या बेनुहेझमचे दर्शन घेतल्याशिवाय देवीचे दर्शन घेता येत नाही.

देवमोगरीला आदिमाया पार्वतीचे रूप मानतात. या संदर्भात अशी गोष्ट सांगितली गेली की एकदा शंकर-पार्वती कैलास पर्वतावर सारीपाट खेळत होते. खेळ रंगात आला होता. त्यावेळेस नारदमुनी तेथे आले आणि त्यांनी या दोघांना असे सुचविले की कोणतेही दान न लावता खेळण्यापेक्षा काहीतरी दान लावून खेळा, त्यामुळे खेळाची रंगत वाढेल. नारदमुनींची ही सूचना त्या दोघांना आवडली आणि त्यांनी वस्तू पणाला लावून खेळण्यास सुरवात केली. खेळ खेळत असताना भगवान शंकर यांनी डमरू, कमंडलू, आदी वस्तू पणाला लावल्या आणि ते या सर्व वस्तू हरले. सारीपाट खेळण्यात आपण हरलो म्हणून भगवान शंकर चिडले आणि रागाने जंगलात निघून गेले. भगवान शंकर रागावले असताना तेथे जाण्यात काही अर्थ नाही असे समजून देवी पार्वतीने भिल्लीणीचे रूप घेऊन सातपुडा पर्वतावर आली आणि भगवान शंकर प्रसन्न व्हावेत म्हणून आराधना करू लागली. भिल्लीणीचे रूप घेतलेली देवी पार्वती म्हणजेच देवमोगरा किंवा देवमोगी होय.

अस्तंभ म्हणजे अश्वत्थामा असावा असा एक समज आहे. अश्वत्थामा हा सात चिरंजीवांपैकी एक आहे. या अस्तंभाची हे लोक पूजा करतात. हा अस्तंभा लोकांना अधूनमधून साक्षात् दर्शन देतो असे सांगितले जाते. महाभारतात युद्धप्रसंगी अश्वत्थाम्याने कुटील डाव टाकून अर्जुनपुत्र अभिमन्यू याला ठार मारले. तेव्हा श्रीकृष्णाने अश्वत्थाम्याच्या डोक्यातील मणी काढून तू असाच जखमी अवस्थेत भटकत राहशील असा शाप दिला. तेव्हा श्रीकृष्णाच्या वाणीने शापित झालेला अश्वत्थामा अक्रामी महाल मधील असली या गांवाजवळील एक उंच डोंगरावर आश्रयाला आला. अश्वत्थाम्याने या डोंगराचा आश्रय घेतला म्हणून या डोंगराला अस्तंबाचा डोंगर असे म्हणतात. हा अस्तंबऋषी ब्रह्मचारी असल्यामुळे या डोंगरावर जाण्यासाठी बायकाना बंदी आहे. त्यातूनही एखादी स्त्री हट्ट करून डोंगरावर गेली तर तिला मृत्यूला सामोरे जावे लागते असा समज आहे.

या अस्तंब ऋषींची जत्रा अश्विन अमावस्येला म्हणजे दीपावलीला अस्तंबाच्या डोंगरावर भरते. डोंगरावर अस्तंबाची दगडाची मूर्ती आहे. त्याला शेंदूर लावलेला असतो. या देवाचे वैशिष्ट्य म्हणजे या देवाला बकरं किंवा कोंबडं याचा नैवेद्य दाखवीत नाहीत. डोंगरावर एक बडवा असतो तो एखाद्याला रोग वगैरे झाला असेल तर त्याचे निवारण करण्यासाठी काही गोष्टी करायला सांगतो.

तोरणमाळ येथे नागार्जुनाचे स्थान आहे. तेथे महाशिवरात्रीस मोठी यात्रा भरत असते.

अशा तऱ्हेने सातपुड्यातील आदिवासी इंदल, देवमोगरा, अस्तंब आणि तोरणमाळ ह्यांची पूजा करतात व त्यांचा असा विश्वास आहे की या देवांच्या उपासनेमुळे त्यांना संपत्ती, संतती यश मिळते.

सातपुड्यातील आदिवासी ज्या देवांची उपासना करतात ते बघितले असता हिंदूंच्या देवाशी त्यांची तुलना करावीशी वाटते. आता आदिवासी पूजित असलेला इंदल देव आणि वैदिक संस्कृतीतील इंद्रदेव यांच्यात बरेच साम्य आहे. दोन्हीही देवांची पूजा चांगला पाऊस आणि उत्तम पीकपाणी यावं म्हणूनच

*(पान ३९ वर)*

# निसर्गोपासक भिल्ल.

डॉ. शौनक कुलकर्णी

संपूर्ण मानवी इतिहासात माणसाच्या संस्कृतीला आकार देण्याचे काम धर्म आणि त्यानुरूप येणाऱ्या धार्मिक श्रद्धा, कर्मकांड यामुळेच झाले आहे. धार्मिक मूल्ये, संकल्पना, श्रद्धा, नीती, कर्मकांड, सणवार, उत्सव, अद्भूत सामर्थ्यवाद, निसर्गवाद, हे सर्वच धर्माचे आणि पर्यायाने संस्कृतीचे महत्त्वाचे घटक आहेत.

छोट्या समाजाचा धर्म हा लोकांच्या व्यक्त आणि अव्यक्त श्रद्धा, भावना यातून जन्म घेत असतो. आदिवासी धर्म हा मानवी समाजातील धर्माचे मूळ स्वरूप आहे. आदिवासी समाजाला ऐतिहासिक पार्श्वभूमी असल्याने त्यांच्या धार्मिक जीवनाचा अभ्यास महत्त्वपूर्ण ठरतो. अशाच सर्वात मोठ्या आणि पारंपरिक इतिहास लाभलेल्या भिल्ल समाजाच्या धार्मिक जीवनाचा विचार प्रस्तुत लेखात केला आहे.

भारतीय आदिवासी समाजात 'भिल्ल' हा एक सर्वात मोठा आणि प्रसिद्ध समाज आहे. इतर आदिवासींप्रमाणे हा समाजही निसर्गोपासक आहे, त्यांच्या पारंपरिक धर्मकल्पनाबरोबरच विविध हिंदू परंपराही भिल्लांमध्ये पाहावयास मिळतात. सततच्या हिंदू संपर्कामुळे बहुतेक हिंदू देवदेवतांना भिल्ल समाजात श्रद्धेचे स्थान मिळालेले आहे.

भिल्ल या शब्दाची उत्पत्ती 'भिलवावर' या तमिळ शब्दापासून झाली असावी. याचा अर्थ धनुष्यधारी. हा शब्द धनुष्यबाण वापरणाऱ्यांसाठी झाला असावा. रामायण, महाभारत आणि इतरही संस्कृत साहित्यात भिल्ल हा शब्द सापडतो. रामायणातील वाल्याचा वाल्मिकी झालेला रामभक्त शबरी, शबर राजा किंवा निषाद ही सर्व मंडळी भिल्लच होत. महाभारतातील एकलव्य, कृष्णाला ज्याच्याकडून मृत्यू आला तो पारधी, हे भिल्लच होते. थोडक्यात भिल्ल हा भारतातील आदिम समाज आहे, आणि तत्कालिन आर्य किंवा हिंदू संस्कृतीशी जवळून आलेल्या संबंधामुळे त्यांच्या धर्माचे स्वरूप व्यापक झाले आहे.

भिल्लांच्या धर्माचे मूळ स्वरूप सचेतनवादी असून ते निसर्गोपासक आहेत. वनस्पती, प्राणी किंवा निसर्गातील घटकांवर त्यांची श्रद्धा असून उच्चतम अशी अमानवी शक्ती म्हणजे परमेश्वर असा त्यांचा विश्वास आहे. असा परमेश्वर सर्व व्यापक असल्याने चांगल्या/वाईट गुणाबरोबर तो माणसाच्या समोर येत असतो. त्यामुळे चांगल्या उपयुक्त घटकांना आदराने जसे श्रद्धेचे स्थान प्राप्त होते, तसे ज्यामुळे संकटांना सामोरे जावे लागते त्या घटकांना भीतीने किंवा संकटापासून दूर राहण्यासाठी श्रद्धेचे स्थान मिळते. गाय बैल, घोडा यांना मानाचे स्थान देऊन पूजले जाते. घोडा तर त्यांना फारच आदरणीय आहे. मंतरलेले घोडे त्यांच्या बऱ्याच लोककथातून डोकावताना दिसतात. याबरोबरच वाघ, साप अशा हानी पोहोचवणाऱ्या प्राण्यांचेही पूजन भिल्ल समाजात केले जाते. बैलाची पूजा तर वर्षातून दोनदा केली जाते. हे पूजन पेरणी आणि काढणी या शेती कामांचे वेळी केले जाते. या वेळी त्यांची हिंगे पाठी रंगवून, त्यांना चांगले खायला दिले जाते, विश्रांती

दिली जाते. वाघापासून भिल्लांच्या गुरांना धोका असल्याने वाघाचीही पूजा केली जाते. प्राण्यांप्रमाणेच कित्येक वृक्षांनाही श्रद्धेचे स्थान आहे. आंबा ही सर्वात पवित्र वनस्पती मानली जाते, आणि दूध, दही, धान्य वाहिले जाते. पिंपळ वनस्पती ही पवित्र मानली जाते. पिंपळाची पाने संपत्तीकारक मानली जातात, आणि त्यामुळे कामना पूर्ण करतात. वटसावित्रीचे व्रत हिंदूंप्रमाणेच भिल्लातही असते परंतु विटाळल्या स्रीस किंवा ज्या स्रीचा नवरा दारूचे आहारी गेला आहे अशा स्रीस वटपूजन करता येत नाही. केळ्याचे झाडही त्यांनी पवित्र मानले आहे.

यासारख्या सचेतन श्रद्धास्थानाबरोबरच नदी, डोंगर यासारख्या गावाच्या सरहद्दीवरील भौगोलिक घटक किंवा वारा पाऊस अशा नैसर्गिक घटकांवर भिल्ल माणूस खूपच अवलंबून असतो. संरक्षण, शांतता, भाग्योदयाकरता ज्या प्रमाणे त्यांचे पूजन होते, त्याप्रमाणेच पूर, दुष्काळ, अशा नैसर्गिक आपत्ती तसेच गुरे मरणे, कोंबड्या मरणे, साथीचे रोग यापासून संरक्षण मिळावे म्हणूनही त्यांचे पूजन केले जाते.

भिल्लांचे पारंपरिक सणवार, श्रद्धा किंवा कर्मकांड हे त्यांच्या शेती जीवनाशी निगडीत आहे. त्यातील काही महत्त्वाचे सणवार म्हणजे जमीनपूजा. प्रत्यक्ष पिकांची पेरणी जमिनीत होते आणि पीकही जमिनीतूनच येते. त्यामुळे प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे संपूर्ण समाज हा जमिनीवरच अवलंबून असतो जमीन हेच त्यांच्या उत्पन्नाचे साधन असते. घरेही जमिनीवरच बांधली जातात त्यामुळे जमिनीचे पूजनास अनन्यसाधारण महत्त्व आहे. ती स्वयंभू असल्याने तिचे कोणतेही मंदीर किंवा मूर्ती अस्तित्वात नाही, तरीही पिकाची पेरणी करणे, काढणी करणे, घर बांधणे यासारख्या सर्व कामांचे वेळी जमिनीचे यथास्थित पूजन केले जाते. शेती कामासाठी आवश्यक असलेल्या नांगराची वैशाखामध्ये नांगरणीपूर्वी पूजा केली जाते.

भिल्लांच्या देवतांची संख्या ही खूप मोठी आहे. त्यातील काही देवता महत्त्वाच्या आहेत. प्रत्येक कुटुंबास एक देवता असते, या देवतेचे पूजन पूर्वजांसाठी असून ते वडिलोपार्जितरित्या त्या कुटुंबात चालू असते. याच्या प्रतिमा बनवून शेतात झाडाखाली बसविलेल्या असतात. वर्षातील एखादा दिवस नक्की करून त्या दिवशी पूजन करून प्रसाद बनविला जातो. घरावर कुटुंबावर त्यांची कृपा राहावी हा त्याचा हेतू असतो. हिंदू धर्मियात होणाऱ्या श्रद्धा प्रकारासारखाच काहीसा हा पूजन प्रकार आहे. राजा पंथ या नावाचीही एक देवता असून, ती अचाट शक्तीची आणि सैतान भुते यांवर सत्ता चालविणारी आहे. जगात त्यानेच सुधारणा केल्या आहेत अशी त्यांची समजूत आहे. त्याच्या अनेक राण्या असून त्यापैकी महत्त्वाची म्हणजे राणी पंधार ही होय. या देवतेचा सहकारी विना देव असून दोघांनी एकमेकांच्या बहिींशी लग्ने केली. या दोनही देवतांना पूजनात अग्रक्रम असतो. या व्यतिरिक्त धान्य देवताही महत्त्वाची आहे तिला नंदेर्वो असे म्हटले जाते. तिला वर्षाआड बकरी - कोंबडीचा बळी दिला जातो.

वाघदेव ही वाघाच्या स्वरूपातील देवता जंगलात डोंगर कपाऱ्यात वास करून असते. हीचे पूजन दिवाळी ते होळीचे सुमारास केले जाते. ही देवता क्रोधाविष्ट झाली तर माणसे व जनावरांना इजा करते, या भावनेने तिला बोकड व कोंबडीचा बळी दिला जातो. गोपेहोहन किंवा भाटीदेव ही नागदेवता असून नागा-सापापासून संरक्षण मिळावे हा उद्देश त्या देवतेच्या पूजनामागे असतो. पा देवी, पा जंजाळी या जलदेवता असून जलचरांवर त्यांचे नियंत्रण असते. देव मोग्रा माता ही एक पारंपरिक देवता असून तिचे जंगलात

वास्तव्य असते. प्रत्येक घरात 'Y' या आकाराची एक लाकडी प्रतिमात्मक वस्तू असून मार्च महिन्यात ती पूजली जाते. ही वस्तू जंगलात नेली जाऊन तिची पूजा केली जाते आणि मागाहून सर्वांना यशोदायी ठरणारा प्रसाद दिला जातो.

हे सर्व जरी भिल्लांचे पारंपरिक देव असले तरीही त्यांचे स्वरूप, नावे आणि पूजनपद्धतीत वेगवेगळे प्रकार भिल्लांच्या वेगवेगळ्या उपशाखेत बघावयास मिळतात हे फरक फार मोठ्या स्वरूपाचे नाहीत पण तरीही नोंद घेण्याजोगे नक्कीच आहेत. उदा. तडवी ही भिल्लातील उच्च शाखा मानली जाते. हे लोक शेताचे रक्षण व्हावे म्हणून कालचे देव ! क्षेत्रपाल यांची पूजा करतात. शेतामध्ये काळे दगड उभारून त्यावर हळदकुंकू शेंदूर लावलेले दिसते, त्या याच प्रतिमा होत. खेदियार, मेलोडी, गुपशून माता या त्यांच्याच देवता असून त्या अमूर्त असतात, त्यामुळे त्यांच्या प्रतिमा नसतात. खेदियार मातेचे पूजन वर्षात नऊ दिवस करण्याचा प्रघात आहे. आठ दिवसाचे पूजनानंतर बोकडाचा प्रसाद केला जातो. या काळात गुढी किंवा पताका लावण्याचाही प्रघात आहे. गुपसुहान माता सर्पदंशापासून संरक्षण देणारी मानली जाते. बिओजी महाराज आणि भातीदेव यांच्या प्रतिमांचे पूजन सर्व तडवींचे घरात दिसते. भिल्लातील वसावे यांच्या घरात पारधी माता, निनम्या मारजुडिआ या पारंपरिक देवता दिसतात. यातील निनम्या ही लहान मुलांची संरक्षक असून ती शेतात एखाद्या झाडाखाली बसविलेली असते. बाकी सर्व देवता व पूजन प्रकार हे तडवींसारखेच असले तरीही बळी देण्याचे प्रकार तडवीपेंक्षा वसावेंमध्ये जास्त आहेत.

बराचकाळ हिंदू समाजाबरोबर संपर्क असल्याने भिल्लांचे हिंदूकरण झाले आहे. हिंदू देवतांचे पूजन भिल्ल समाजात मोठ्या प्रमाणावर होते. यामध्ये राम-कृष्ण या देवतांचाही समावेश आहे. त्यांच्याबद्दलच्या बऱ्याच कथाही त्यांच्या वापरात आहेत. मात्र या देवतांची मंदिरे फारशी नाहीत. शक्तीदेवता हनुमानाची सर्वत्र मंदिरे असून त्यामध्ये पूजनही होते. दिवाळीमध्ये काली-मातेचीही पूजा होते. तसेच ब्रम्हा, विष्णू, महेश ही सुद्धा श्रद्धास्थाने असली तरी शंकराची देवळे सर्वत्र असतात. त्या मंदिरात महाशिवरात्र, श्रावणी सोमवार यावेळी यात्रा भरत असतात. दानवांना मारून जगात शांतता प्रस्थापित करणारी म्हणून पाहिली जाणारी दुर्गामाता, तिचे नवरात्रीला पूजन केले जाते आणि दहाव्या दिवशी दसरा साजरा केला जातो.

भिल्ल लोकांचा पुनर्जन्मावरही विश्वास आहे. आत्म्याला परमेश्वरी रूप मानले जाते. परमेश्वर हा जीव आणि शिव या दोन रूपात विभागलेला असतो. आत्म्याचे अस्तित्त्व आकाशात असते आणि चंद्रसूर्याचे किरणा-मधून तो आईच्या शरीरात प्रवेश करून जन्म घेतो. आत्मा डोक्यात वास्तव्य करतो. झोपेत आत्मा शरीराबाहेर जाऊन येतो. मृत्यूनंतर आत्मा देह सोडून जातो, परंतु दुसऱ्या कोणत्याही मानवी किंवा प्राण्याच्या शरीरात शिरून जन्म घेतो. काही वेळा काही आत्मे क्रूर असल्याने भूत योनीत जातात, जर मनुष्य त्याच्या आयुष्यात दुःखी असंतुष्ट असेल तर तो भूत म्हणून रहातो, परंतु काही भूते देवाची असतात आणि ती तितकीशी वाईट नसतात. अशा देवांच्या भूतांची एकूण संख्या ५२ आहे. ही भुते शंकराच्या शंख, डमरू, चक्र, आणि लिंगा-पासून उत्पन्न झालेली आहेत. मृत शरीराचे दहन होताना त्याच्या धुरातून आत्मा वर स्वर्गात जातो. पुण्यवान लोकांच्या आत्म्यांना स्वर्गात रहायला मिळते तर पापी आत्म्यांना परत ८४ लाख योनीतून फिरावे लागते.

या व्यतिरिक्त त्यांच्या मनात असणाऱ्या भीतीच्या, विश्वासाच्या, शकुनापशकुनाच्या

बऱ्याच गोष्टी असतात. भिल्ल गोष्टीत येणारा राक्षस म्हणजे मोठ्या आकाराचा, मोठ्या डोळ्याचा, लांब दातांचा, अंगावर केस असणारा आणि डोक्यावर हिंगे असणारा राक्षस हा निशाचर, रक्तपिपासू असतो. तो सुंदर कुमारिकांना पळवून नेऊन त्यांच्यावर बळजबरी करणारा असतो. असंतुष्ट पुरुषाच्या मृत्यूनंतर त्याच्या इच्छा पूर्ण करणेसाठी तो पुरुष अशा रूपात येऊ शकतो. ज्या प्रमाणे पुरुषाचा आत्मा वाईट कृत्ये करतो, त्याप्रमाणेच हडळ जखीण या रूपात स्त्रिया येत असतात. स्वप्ने पडणे या गोष्टीलाही त्यांचे दृष्टिने अर्थ असतो. स्वप्न म्हणजे भविष्याची चाहूल म्हणून त्याकडे पाहिले जाते. आगापिये या देवतेमुळे स्वप्न पडतात अशी त्यांची श्रद्धा असते. दृष्ट लागणे ही सुद्धा एक समजूत असून एखाद्या व्यक्तिची नजर वाईट असल्यास किंवा वाईटावर असल्यास दृष्ट लागते. यामुळे उभी पिके सुकू लागतात, वास्तूदोष निर्माण होतात. लहान मुलांचे अन्न पाणी कमी होऊन ती सूकू लागतात, त्यांची वाढ खुंटते हे सर्व टाळण्या-साठी काळा दोरा/धागा हातात, कमरेत, गळयात बांधण्याचा उपाय ते करतात.

जेव्हा गावात लागोपाठ मृत्यू होतात, साथीचे रोग सुरू होतात, जनावरे मरू लागतात किंवा आटतात, उभ्या पिकांची नासाडी होते त्या वेळेस भिल्लांच्या गावात चेटकांची चर्चा सुरू होते. गावातील कोण स्त्री अथवा पुरुष हे कृत्य करत आहे हे गावातील पुजारी/बडवा सांगतो. अशा व्यक्तीस गावा-बाहेरील घरात ठेवले जाते. या व्यक्तीस सुधारण्याचे कार्य बडवा करतो. पुरूष चेटकापेक्षा स्त्री चेटकीण भयंकर मानली जाते. गावातील चेटकीणी आपला वारसा पुढे चालविण्यासाठी गावातीलच अविवाहित तरुणींना आकर्षित करून घेण्याच्या प्रयत्नात असते. सर्व विद्या शिकून घेतल्यानंतर त्या मुलीस ही स्त्री, चेटकीण किंवा डाकीण म्हणून मान्यता देते. परंतु यांचे कृत्य विनाशकारक असल्याने आणि मत्सर, द्वेष हे यातून घडत असल्याने अशा व्यक्तिंना गावात किंवा समाजात तितकेसे स्थान नसते, पण एक प्रकारची भीती मात्र असते.

शकून अपशकुनावरही या मंडळीचा खूप विश्वास असतो. एखादी स्त्री डोक्यावर पाण्याचा हंडा घेऊन दिसणे किंवा बोललेला शब्द पोपटाने - पक्ष्याने बोलणे हे शुभ लक्षण मानले जाते तर कामास जाताना मांजर आडवे जाणे, अथवा मिशा नसलेला माणूस दिसणे हे अशुभ लक्षण मानले जाते. तसेच मंदिरात चप्पल घालून जाणे, मंदिरात विटाळशीने जाणे, तसेच बडव्यांनी किंवा पुजाऱ्यानी मुक्तपणे स्त्री संग करणे या गोष्टी त्याज्य मानल्या आहेत.

भगत हा मुख्य पुजारी असतो. हा एकतर अनुवांशिकपणे होतो, अथवा ती विद्या शिकून घेणारा सर्व पथ्ये पाळणारा कोणीही होऊ शकतो. भिल्लांच्या वेगवेगळया पोटशाखेत वेगवेगळे भगत असतात. या भगतास सर्व धार्मिक कर्मकांडाचे अधिकार असतात. त्याला अभक्ष व अपेय पान करण्यास मनाई असते. वेगवेगळे मंत्र तंत्र, पूजा-अर्चा करून समाज सुखी रहावा, शांतता नांदावी या करता भगत काम करीत असतो. चेटकीण, डाकीण यांना सरळ करण्याचे वाईट लोकांना शिक्षा करून वाळीत टाकणे किंवा एखाद्याचे शुद्धीकरण करून परत समाजात घेणे हे सर्व याचेच काम असते. भगताचा एक मदतनीस म्हणजे भूत बडवा याला मांत्रिकही म्हणतात कारण हा माणसाचे शरीरातील भूतबाधा शोधून काढून त्यावर उपाययोजना करतो. परंतु याला धार्मिक कामाचा, देवतांच्या पूजा अर्चेचा अधिकार नसतो.

भिल्लांचे सणवार, उत्सव हे हिंदू संस्कृती-प्रमाणेच आहेत. शक्तीदेवता दुर्गादेवीसाठी नवरात्रोत्सव साजरा केला जातो. हा सण

नऊ दिवस साजरा केला जातो. याच्या आठव्या दिवशी धान्यपूजा केली जाते आणि रात्री वाद्य वाजवून, गाणी गाऊन जाग्रणे केली जातात. खेळ खेळले जातात. नवव्या दिवशी बोकडाचा बळी देऊन प्रसाद केला जातो तर दहाव्या दिवशी दसरा साजरा केला जातो. दिवाळी हा सणही मोठ्या प्रमाणावर साजरा होतो हा सण आश्विन कार्तिकात साजरा होतो. या काळात सर्वत्र दीप लावले जातात. या नंतर मार्गशीर्षात देव दिवाळी साजरी करतात. त्यानंतर माघ किंवा फेब्रुवारी मार्च महिन्यात महाशिवरात्र असते. या दिवशी महादेवास पंचामृती स्नान घातले जाते, दिवसभर उपवास केला जातो, रात्री पारंपरिक वाद्य, गायन, नृत्य केले जाते. मात्र या दिवशी सर्वजण मद्याचे (यहुआचे) सेवन करतात. यानंतर फाल्गुनात गोवऱ्या, लाकडे जाळून होळीचा उत्सव खेळला जातो आणि वातावरणात उष्णता निर्माण केली जाते. असे हिंदूचे बहुतेक सर्व मोठे सण भिल्ल पारंपरिक रीतीने साजरे करताना दिसतात. तसेच त्यांच्या देवतांच्या जत्रा ही भरविल्या जातात. असे सणवार, उत्सव, जत्रा त्यांच्या दैनंदिन जीवनात विरंगुळा निर्माण करतात.

अशा प्रकारे भिल्लांच्या दैनंदिन जीवनाशी, शेतकी जीवनाशी, निगडीत राहून समाजातील संघर्षमय ताणतणावांची बोच कमी करणारी परंपरा, श्रद्धा म्हणजेच भिल्लांचा धर्म आणि हेच भिल्लांचे धार्मिक जीवन.

● ● ●

*(पान ३४ वरून)*

केली जाते. त्याचप्रमाणे देवमोगरा ही देवता सुद्धा पार्वतीचा अवतार समजली जाते. प्रत्येक हिंदू पार्वतीचे आदीमाया म्हणून पूजन करतो. अश्वत्थामा तर महाभारतामुळे सर्वांनाच परिचित आहे. या दोन्हीही संस्कृती-मधील साम्य बघताना सांस्कृतिक मानव-शास्त्रज्ञानी सांगितलेल्या सिद्धांताची आठवण झाल्याशिवाय रहात नाही. त्याच्या मते जेव्हा दोन संस्कृती जवळ जवळ येतात तेव्हा त्यांच्यात वैचारिक, सांस्कृतिक देवाण-घेवाण होते. या देवाण-घेवाणीतूनच एक संस्कृती दुसऱ्या संस्कृतीतील काही गोष्टी शिकते, आत्मसात करते. तसेच तिचे असे खास घटक जतन करते. यातूनच नवीन संस्कृती निर्माण होते. काही सांस्कृतिक मानव-शास्त्रज्ञांचे असेही मत आहे की जेव्हा आदिवासी संस्कृती (Little tradition) आणि शहरी संस्कृती (Great tradition) जवळ जवळ येतात तेव्हा शहरी संस्कृतीमधील विद्वान, तत्त्वज्ञानी आदिवासी संस्कृतीतील चांगल्या गोष्टींचा स्वीकार करून त्या शास्त्रशुद्ध आणि तर्कशुद्ध पद्धतीने मांडतात. भगवान व्यासांनी रचलेले महाभारत याचे एक उदाहरण म्हणून सांगता येईल.

सांस्कृतिक मानवशास्त्रज्ञांचे वरील दोन्ही विचार पाहता असे वाटते की आदिवासी संस्कृती कधी काळी जवळ येऊन त्यांच्यात सांस्कृतिक देवाण-घेवाण झाली असली पाहिजे आणि काही कारणामुळे त्या पुन्हा एकमेकींपासून दूर गेल्या असल्या पाहिजेत.

● ● ●

# उत्सवप्रिय संथाल

डॉ. लता छत्रे

मानवशास्त्रज्ञांनी हे मान्य केले आहे की एकीकडे समाजाची धारणा आणि समाजात एकी राहावी आणि दुसरीकडे संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करणे हे धर्माचे महत्त्वाचे कार्य आहे. विधीरूपात्मक असणाऱ्या सण आणि उत्सव यांच्या माध्यमातून धर्माचे हे कार्य अखंडपणे चाललेले असते. धर्माचे हे स्वरूप 'संथाल' या आदीवासीमध्ये साजऱ्या होणाऱ्या सणांचे आणि उत्सवाचे स्वरूप बघता अधिक स्पष्ट होईल. त्या दृष्टीने प्रस्तुत लेखात संथाल आदिवासी साजरे करीत असलेल्या सणांचा आढावा घेतला आहे.

या आदिवासींमध्ये वर्षाच्या जवळ जवळ प्रत्येक महिन्यात कोणता ना कोणता तरी सण सार्वजनिक्ररित्या साजरा केला जातो. या सणांच्या निमित्ताने संबंधित देवदेवता तसेच गावदेव यांची पूजा आणि आराधना केली जाते. त्यामुळे त्या देवावर असणाऱ्या श्रद्धांना पुन्हा पुन्हा उजाळा मिळवला जातो आणि सण हे एकत्र येऊन साजरे करीत असल्यामुळे समाजात एकता प्रस्थापित होण्यास मदत होते.

या लोकांच्या वर्षाला सुरुवात होते जून महिन्यापासून, आणि या महिन्यापासून मे महिन्यापर्यंत जवळ जवळ प्रत्येक महिन्यात एकतरी सण असतोच.

**एरोक सीम** -- ( Erok Sim )

वर्षाच्या सुरुवातीलाच हा सण असतो. जून महिन्यात भातशेतीला सुरुवात करण्यापूर्वी हा सण साजरा केला जातो. या आदिवासींची 'जहेन इरा' नावाची देवी आहे या देवीचे वसतीस्थान गावात आहे. या ठिकाणाला 'जहरथन' असे म्हणतात. ते एक पवित्रक्षेत्र मानले जाते. तर भातशेतीला सुरुवात करण्यापूर्वी या पवित्र ठिकाणी भगताच्या हस्ते कोंबड्याचा बळी दिला जातो. या प्रसंगी शेतात सुगी येऊन विपुल धान्य मिळावे म्हणून विविध देवतांना आवाहन करतो आणि रोगराईपासून तसेच रानटी श्वापदांपासून गावकऱ्यांचे संरक्षण करावे म्हणून देवांना प्रार्थना करतो.

हा सण साजरा केल्यानंतर दुसऱ्या तिसऱ्या दिवशी अबजे बोंगा, ओरक बोंगा, आणि मरण बुरू या देवदेवतांना कोंबड्यांचा बळी देऊन गावकऱ्यांना मेजवानी दिली जाते आणि सर्वात शेवटी नाचगाणी होऊन सणाची सांगता केली जाते.

**हरिर सिमको** -- ( Harir Simko )

जुलै महिन्यात हा सण साजरा केला जातो. शेतात हिरवेगार भात उगवलेले असते आणि पीक चांगले येणार अशी आशा वाटत असते. ही सगळी देवाचीच कृपा या श्रद्धेने देवाचे आभार मानण्यासाठी हा सण साजरा केला जातो. या सणाचे वैशिष्ट्य असे की या दिवशी केवळ गावातील देवदेवतांची पूजा केली जाते. तसेच जून महिन्यात ज्या पद्धतीने प्रार्थना केली जाते, त्याच पद्धतीने या दिवशीही देवांची प्रार्थना केली जाते.

**इरि गुणडली नानवाणी -- ( Iri Gundli Nanwani )**

ऑगस्ट महिन्यात हा सण साजरा केला जातो. नुकतीच कुठे शेतात ज्वारी बाजरीची कणसे उगवायला लागलेली असतात. शेतात आलेल्या त्या पहिल्या वहिल्या कणसांचा नैवेद्य देवाला दाखविला जातो.

या सणाच्या दिवशी भगत कुळांच्या शेतात जातो. तेथे त्याला कापता येतील तेवढी कणसे कापतो. नंतर त्या कणसांना घेऊन जहेरथन या पवित्र ठिकाणी जातो. ही पवित्र जागा आधीपासूनच शेण लावून स्वच्छ केलेली असते. या पवित्र ठिकाणी असलेल्या देवांना कापून आणलेल्या कणसांचा नैवेद्य दाखविला जातो आणि पुढील प्रार्थना म्हणतो, 'हे बापू ठाकूरा, आणि जहेर इरा आम्ही तुम्हाला वंदन करतो. आमच्या शेतातील पहिले धान्य तुला अर्पण केलेले आहे. या आमच्या शेतातील धान्यामुळे आम्हाला शारीरिक बळ लाभो आणि आम्ही रोगमुक्त होऊ दे.'

अशा प्रकारे पवित्र ठिकाणी प्रार्थना केल्यावर भगत पुन्हा गावाकडे परत येतो, आणि गावातील प्रमुखांच्या देवांना नवीन आलेले धान्य अर्पण करून उरलेले धान्य स्वतःच्या घरी नेतो.

**गम्ह पौर्णिमा –**

श्रावण महिन्यातील पौर्णिमेला हा सण साजरा केला जातो. या दिवशी गाईंची पूजा केली जाते. त्यांच्या शिंगांना तेल लावले जाते. त्यांना महुआची फुले, भात, भेल फळ आणि विशिष्ट प्रकारचे गवत खायला दिले जाते. त्यानंतर गावातील एका मैदानात 'करम' नावाच्या झाडाची फांदी रोवली जाते. त्या फांदी भोवती स्त्रिया आणि पुरुष नाच करतात आणि नंतर त्या फांदीचे विसर्जन केले जाते. या प्रसंगी पूर्वजांना दारू देऊन संतुष्ट केले जाते.

**करम पोरोब –**

हा सण सप्टेंबर ऑक्टोबर महिन्यात साजरा केला जातो. रात्री गावातील पुरुष मंडळी 'करम' नावाच्या झाडाची फांदी तोडतात आणि गावातील गल्लीमध्ये एका ठिकाणी ती पुरतात. या फांदीभोवती गावातील तरुणमंडळी सकाळ होईपर्यंत नाचतात. नंतर त्या फांदीचे तलावात विसर्जन केले जाते. याप्रसंगी कोंबड्यांचा बळी वगैरे दिला जात नाही, परंतु गाव प्रमुखाच्या पितरांना तसेच 'मरण बुरू' या देवाला दारू दिली जाते.

**जंथर –**

हा सण नोव्हेंबर महिन्यात साजरा केला जातो. या दिवशी 'जहेन इरा' या देवतेला मेंढा किंवा डुक्कराचा बळी देतात. या प्रसंगी लागणारे पूजेचे साहित्य भगतच आणतो. आणि बळी दिलेल्या प्राण्याचे मांस खाण्याची परवानगी गावातील फक्त पुरुष मंडळीनाच असते.

**सोब्रे –**

हा उत्सव हिवाळयात म्हणजे सुगीच्या काळात आठवडाभर साजरा केला जातो. शेतात पीक चांगले येऊन सुगीचे दिवस येण्याच्या कामी पाऊस, सूर्य आदी देवांचा मोठा सहभाग असतो. या देवांचे आभार या सणाच्या निमित्ताने मानले जातात. हा सण साजरा करण्याचा निश्चित असा दिवस नसतो, तर गावकऱ्यांच्या सोयीने एक दिवस ठरविला जातो.

या सणाची सुरवात 'उम' नावाच्या विधीपासून होते. या विधीमध्ये गावकरी त्यांना स्वतःला शुद्ध आणि पवित्र करून

घेतात. घरे, अंगणे स्वच्छ करतात. त्यानंतर गावकरी जहेरथन या पवित्र ठिकाणी एकत्र जमतात. येथे वृद्ध गावकरी आधीच येऊन बसलेले असतात. या पवित्र ठिकाणी सर्वत्र अंडी पसरवून ठवेलेली असतात. नंतर गुराख्यांना त्यांच्या गाई घेऊन यायला सांगितले जाते. या गायींपैकी जी गाय या अंड्यांचा वास घेईल किंवा अंड्यावर पाय देईल ती गाय नशीबवान समजली जाते, आणि मग अशा भाग्यवान गाईच्या पावलांची साग्रसंगीत पूजा केली जाते.

याच्या दुसऱ्या दिवशी देवांना डुक्कर, बोकड, कोंबडे इत्यादींचा बळी देऊन त्यांचा देवांना नैवेद्य दाखविला जातो. तसेच पितरांचे आदरयुक्त स्मरण केले जाते आणि कुटुंब प्रमुखांकडून त्यांना नैवेद्य दाखविला जातो. यादिवशी संध्याकाळी गावकरी एकत्र येऊन मेजवानी करतात आणि देवतेला दारू देऊन त्या दारूचे सेवन करतात. गोपालपूजा म्हणजे जणूकाही या उत्सवाची अत्युच्चताच. रात्रीच्यावेळी जेव्हा सगळे गावकरी झोपलेले असतात, तेव्हा गावातील तरुणमंडळी जागी राहून घरोघरच्या गाईंना ढोल वाजवून उठवितात, आणि बाहेर काढतात. गावातील तरुण मुली नटून-थटून एकत्र येतात आणि एकमेकींचे हात धरून गावप्रमुखाच्या घरी येतात. तेथे गाई गुरांभोवती फेर धरून गाणी म्हणतात. अशाच पद्धतीने गावातील प्रत्येक घरातील गोठ्यामध्ये जाऊन गुरांभोवती फेर धरून गाणी म्हणतात. या गाण्यांनी संपूर्ण गाव अगदी दुमदुमून निघतो.

या दिवसाची मजेशीर गोष्ट म्हणजे गावातील काही ठराविक जागा राखून ठेवल्या जातात. दुपारच्या वेळेस गाई आणि म्हशींना त्या जागांवर बांधले जाते. त्यांचे पाय धुतले जातात. त्यांची शिंगे फुलं आणि गुळ लावून सजविली जातात. गावातील तरुण खेळाडू पुढे येऊन त्या जनावरांशी खेळतात आणि त्यांच्या शिंगांना लावलेला गुळ पळविण्याचा प्रयत्न करतात. अशा प्रकारे गुरांशी खेळ खेळल्यावर सगळी मंडळी गावप्रमुखांकडे जमतात.

नंतरचा दिवस असतो तो हको कटकोमचा. हको कटकोम याचा अर्थ मासे आणि खेकडे पकडणे. या दिवशी प्रत्येक संथाल आदिवासीने एक धार्मिक कार्य समजून शिकारीसाठी बाहेर पडले पाहिजे असा नियम आहे. यादिवशी त्यांना जर कोणतीही मोठी शिकार मिळाली नाही तर कमीत कमी मासे आणि खेकडे मारणे आवश्यक असते. यादिवशी प्रत्येकजण एकमेकांच्या घरी जातात आणि त्यांना शुभेच्छा देतात.

संपूर्ण आठवडाभर चाललेल्या या उत्सवाची सांगता बेजबा यादिवशी होते. या दिवशी विविध प्रकारचे खेळ खेळले जातात आणि विजयी खेळाडूला त्याचे मित्र खांद्यावर घेऊन मिरवत मिरवत गावप्रमुखाच्या घरी आणतात. तेथे विजयी खेळाडूचा सत्कार केला जातो.

**मोकोर —**

जानेवारीच्या साधारण दुसऱ्या आठवड्यात हा सण साजरा केला जातो. याला संक्रांत पूजा असेही म्हणतात. या दिवशी हे लोक मासे, खेकडे पकडतात आणि खातात. असे केल्याने आयुष्य वाढते असा त्यांचा विश्वास आहे.

**बाब —**

फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात हा सण नाचून गाऊन साजरा केला जातो. उन्हाळ्याच्या आगमनाचे स्वागत या सणाच्या निमित्ताने केले जाते.

याची सुरवात 'उम' या शुद्ध आणि पवित्र करण्याच्या विधीपासून होते. या दिवशी गावातील तरुण मंडळी जहेरथन या पवित्र ठिकाणी जमतात. तेथे दोन झोपड्या बांधतात. या दोन्हीपैकी एक झोपडी 'गोसने' या संथाल देवतेसाठी राखून ठेवली जाते तर दुसरी झोपडी 'जहेर इरा,' 'मोनरनको,' 'मरूण बुरू' आदी पंचदेवतांसाठी राखून ठेवलेली असते. या झोपड्यांच्या सभोवतालची जागा भगताकडून शेणाने सारवली जाते. नंतर गावातील सगळे तरुण आंघोळ करून स्वतःला पवित्र करून घेतात.

दरम्यान 'नायके' नावाचा भगत सुप, टोपली, धनुष्य-बाण फावडे, झाडू, शिकारीसाठी लागणारे शिंग आदी तेल लावून स्वच्छ करतो.

संध्याकाळी गावप्रमुखाचा नोकर, त्यांच्या धर्मगुरूला तीन कोंबड्या देतो. तीन वेगवेगळया तरुणांच्या अंगात अनुक्रमे 'जहेर इरा,' 'मरूण बुरू' आणि 'होसने इरा' या तीन वेगवेगळया देवी येतात. अंगात आलेले हे तीन तरुण संध्याकाळीच धर्मगुरूच्या घरी येतात. अशावेळेस जहेर अंगात आलेल्या तरुणाने हातात कडे घातलेले असते आणि डोक्यावर टोपली आणि हातात झाडू घेतलेला असतो. गोसने इरा ज्याच्या अंगात आलेली असते त्याच्या हातात धनुष्यबाण असतो. तर मरूण बुरू ज्याच्या अंगात आलेली असते त्याच्या हातात फावडे असते. ही सगळी आयुधे या तरुणांनी 'जहेरथन' या पवित्र ठिकाणाहून आणलेली असतात. त्यानंतर अंगात आलेले हे तरुण पुन्हा जहेरथन या पवित्र ठिकाणी जातात. गावातील इतर तरुण मंडळीही त्यांच्यामागून त्या पवित्र ठिकाणी जातात. तेथे जहेर इरा अंगात आलेला तरुण अंगणात झोपतो तर मरूण बुरू आणि गोसने इरा अंगात आलेले तरुण तेथे पहारा करतात.

रात्री सगळेजण पवित्र ठिकाणाहून धर्मगुरूच्या झोपडीत परत येतात. तेथे ते चटईवर बसतात. अंगात आलेल्या तरुणांना ओंजळ ओंजळभर तांदूळ देतात आणि भविष्याबद्दल भाकित करण्यास सांगतात. त्यानंतर धर्मगुरू जहेर इरा अंगात आलेल्या तरुणापासून पाय धुण्यास सुरुवात करतात. या प्रसंगी ढोलके वाजवून गाणे म्हटले जाते. तसेच गावप्रमुखांपासून सगळेजण या सोहळयात भाग घेतात. त्यानंतर त्या देवता त्यांना मुक्त करतात. मुक्त झाल्यावर सर्वजण एकत्र जेवण घेतात आणि दारू पितात.

दुसऱ्या दिवशीचा कार्यक्रम अतिशय सुंदर असतो. या दिवशी सकाळी धर्मगुरूची पत्नी धान्य दळते. गावप्रमुखाचा नोकर गावात तांदूळ, मीठ आणि हळद आणण्यासाठी जातो. नंतर गावातील सगळे जण पवित्र ठिकाणी जमतात. यावेळी धर्मगुरूच्या हातात टोपली असते आणि त्यामध्ये कडे, साखळी, झाडू, धनुष्य-बाण, शिंग, फावडे आदी वस्तू असतात. एका तरुणाजवळ तांब्यामध्ये पवित्र जल असते. आदल्या दिवशी ज्या तरुणांच्या अंगात आलेले असते, त्यांच्या पुन्हा अंगात येते. ते पुन्हा पारंपरिक चिन्हे अंगावर चढवितात आणि जंगलाकडे पळतात. त्यांच्यामागे तरुण मुले-मुलीही पळतात. तेथे मोरेनको अंगात आलेला तरुण सालवृक्षाच्या फुलाला बाण मारतो मरेन बुरू अंगात आलेला तरुण त्या झाडावर चढतो आणि फुलासकट फांद्या तोडतो आणि जहेन इरा अंगात आलेला तरुण ती फुले तोडून टोपलीत भरतो.

त्यानंतर वाटेतील महुआ झाडाची फुले तोडून ते सगळेजण त्या पवित्र ठिकाणी येतात, आणि धर्मगुरूंना देतात. अंगात आलेले ते तीन तरुण त्यांच्यासाठी असलेल्या झोपड्यात जातात. त्यानंतर त्यांचे पाय धुण्याचा कार्यक्रम होतो आणि उरलेले पाणी इतरांच्या अंगावर शिंपडले जाते. शेवटी अंगात आलेल्या देवता परत जातात आणि ते तरुण नित्याचे जीवन जगण्यास सुरुवात करतात. या रात्री धर्मगुरू त्याच्या कुटुंबासमवेत तेथेच राहतो.

नंतर सगळेजण नाचत आणि गाणी म्हणत गावात येतात. गावातील सर्वमंडळी या सालफुलांचे दर्शन घेण्यासाठी येतात. काहीजण जहेरथन येथे धर्मगुरूला आणण्यासाठी जातात, आणि त्याला वाजत गाजत गावात आणतात. गावातील स्त्रिया धर्मगुरूंचे पाय धुवून पूजा करतात. धर्मगुरू त्या बदल्यात त्यांना सालपुष्प देतो.

यानंतर सुरू होतो तो पाण्याचा उत्सव. यालाच आपण रंगपंचमी म्हणतो. या उत्सवात काही आदरणीय स्त्री-पुरुष वगळता सगळेजण भाग घेतात आणि एकमेकांच्या अंगावर पाणी टाकतात. अशा तऱ्हेने 'बाब' या उत्सवाची सांगता होते.

**जोम सीम –**

हा सण सार्वजनिक स्वरूपाचा नसून विशिष्ट कुळांमध्येच साजरा केला जातो. तसेच दरवर्षी 'जोमसीम' करत नाहीत तर ठराविक वर्षांनी तो केला जातो. त्यामुळे त्याचे स्वरूप खऱ्या अर्थाने सणात्मक नसते तर पूर्णपणे ते विधीरूपी असते. या विधीप्रसंगी सूर्यदेवतेला म्हणजेच सीण बोंग याला बोकडाचा बळी दिला जातो. केवळ फाल्गुन पौर्णिमा किंवा वैशाख पौर्णिमेलाच जोम सीम केला जातो. प्रथम कुळातील लोकांची सभा भरते आणि त्या सभेत निश्चित असा तारीख, महिना ठरविला जातो. आणि मग ठरविलेल्या दिवशी हा विधी करविला जातो. विधीची सुरुवात म्हणून बकऱ्याचे खच्चीकरण केले जाते. पहिला दिवस असतो तो 'डम'चा. या दिवशी घरेदारे झाडून स्वच्छ केली जातात. त्या दिवशी भात आणि बिरी नावाच्या कडधान्या व्यतिरिक्त काहीही खाल्ले जात नाही. जेथे बोकडाचा बळी द्यायचा आहे ती जागा शेणाने सारवून साफसूफ केली जाते. तेथे पवित्र पाण्याचा हंडा ठेवला जातो. या दिवशी दोन कुलदैवताची पूजा केली जाते. परंतु या कुलदैवताची नावे ते गुप्त ठेवतात. सूर्यदेवाला तसेच या दोन दैवतांना प्रसन्न करण्यासाठी ते बोकडाचा बळी देतात. या प्रसंगी पूर्वजांचीही पूजा केली जाते. यावेळी देवांना आणि पितरांना कुळांचे आदीदैविक आणि आदीभौतिक संकटांपासून रक्षण करावे म्हणून प्रार्थना केली जाते.

संथाल आदिवासींच्या बाबतीत असे दिसते की ह्यांचा असा विश्वास आहे की सगळीकडे म्हणजे नद्या, पर्वत, जनावरे यांच्यात चैतन्यभरून राहिले आहे. या चैतन्याला त्याचे असे स्वतंत्र अस्तित्व नाही तर हे चैतन्य आणि सजीव तसेच निर्जीव सृष्टी यांच्यात तादात्म्य आहे. त्यामुळे हे चैतन्य त्यांनी मानलेल्या दैवतांच्या रूपाने मनुष्य प्राण्यांमध्ये प्रवेश करू शकते.

अशा तऱ्हेने संथाल आदिवासी सण आणि उत्सव साजरे करण्याच्या निमित्ताने एकत्र येतात आणि त्यांच्या समाजात एकोपा निर्माण करून संस्कृतीचे संवर्धन करतात.

● ● ●

# जव्हारच्या परिसरात साजरा होणारा "बोहाडा"

**-- लेखक दयानंद मुकणे**

'भरसटमेट' हे जव्हार शहराला गस्त घालणारे किल्याच्या खालचे गाव. मेट म्हणजे गस्त घालण्याची जागा. संस्थानी अमदानीत येथे गस्त घालणारे सैनिक होते आणि त्यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी भरसट' नावाचा एक नाईक होता. या नाईकाचेच पुढे या गावाला नाव पडले. आज भरसटमेट या जागेचेच एका मोठ्या खेड्यात रूपान्तर झालेले आहे.

भरसटमेट हे गाव जव्हार शहराच्या सीमेला लागूनच अवघ्या दोन किलोमीटर अंतरावर आहे. हे गाव एका विस्तीर्ण माळरानावर वसलेले असून साधी पण आकर्षक अशी दुतर्फा असलेली चौमोळी घरे मन वेधून घेतात.

भरसटमेट गावात प्रवेश केल्यावर प्रथम दर्शन होते ते एका जुनाट वृक्षाखाली असलेल्या बजरंगबलीचे. गावच्या एकात्मतेचे प्रतीक असलेले हे मारूतीरायाचे मंदीर सुमारे दोनशे वर्षांपूर्वीचे आहे. या गावात ज्ञानमंदीरही आहे. वारली, कातकरी इत्यादी आदिवासी जमातींची येथे वस्ती असली तरी प्रामुख्याने कोकणा अदिवासींची संख्या येथे जास्त आहे. या सर्व जमातींचा शेती हा मुख्य व्यवसाय आहे.

आदिवासी जमातींचे उत्सव आणि नृत्य हे अविभाज्य घटक आहेत. भरसटमेट या गावातील आदिवासीही त्याला अपवाद नाहीत. येथील आदिवासी तारण नृत्य, डोल नृत्य तसेच इतर काही नृत्य प्रकार करण्यात तरबेज आहेत. विविध सण आणि उत्सव प्रसंगी वरील प्रकारचे नृत्यप्रकार पहावयास मिळतात. या आदिवासी जमातीत मोठ्या प्रमाणात साजरा होणारा उत्सव म्हणजे 'बोहाडा'.

बोहाडा या उत्सवास अक्षय तृतीयेपासून सुरवात होते. अक्षय तृतीया हा वैशाख महिन्यातील तृतीयेचा दिवस. साडेतीन मुहूर्तातील एक शुभदिवस आहे. शहरी तसेच ग्रामीण भागात ह्या दिवसाला महत्त्वाचे स्थान आहे. ग्रामीण भागात हा सण निरनिराळया जमातीमध्ये विविध पद्धतीने साजरा करण्याची प्रथा असून काही आदिवासी जमातीमध्ये हा दिवस अन्नधान्यांच्या समृद्धीचा दिवस म्हणून साजरा केला जातो. हा सण साजरा करण्यामागे त्यांचा असा विश्वास आहे की या दिवशी घरात सर्व प्रकारचे विपुल धान्य येते आणि घरातील धान्याचा क्षय न होता ते अक्षय रहाते.

अक्षय तृतीया साजरी करण्यामागे ही भावना असल्यामुळे अक्षय तृतीयेच्या आधी सात दिवस सात प्रकारचे धान्य एकत्र करून बांबूच्या विणलेल्या एका टोपलीत मातीमध्ये हे धान्य पेरतात. या धान्यांना रोज पाणी घालतात. सातव्या दिवशी ही रोपे खूपच वाढतात. या वाढलेल्या रोपांना गौरी या नावाने संबोधतात.

अक्षय तृतीयेच्या दिवसापासून गौरी-पूजनास सुरवात होते. विशेषतः कोकणा या जमातीत हा गौरी पूजनाचा कार्यक्रम

घराघरांमधून केला जातो. या दिवशी घरोघरी असलेल्या गौरी गावच्या पाटलाकडे एकत्र आणल्या जातात. जमलेल्या स्त्रिया या गौरीभोवती फेर धरून गाणी म्हणतात. नंतर टोपलीतील या गौरी डोक्यावर ठेवून वाजंत्रीच्या आणि गाण्याच्या तालात त्यांची मिरवणूक काढली जाते. या गौरींना गावातून मिरवत मिरवत नेऊन मारुतीच्या देवळापाशी आणले जाते. तेथे या गौरीची पूजा केली जाते व या गौरीला म्हणजे धान्याच्या काही रोपांना मारूतीच्या पायाशी वाहिले जाते. नंतर पुन्हा ह्या गौरीची मिरवणूक काढली जाऊन मिरवणूक एका विहीरीपाशी येते. तेथे या गौरीची शेवटची पूजा करून उरलेली रोपे विहिरीला अर्पण करून कार्यक्रमाची सांगता केली जाते.

यानंतर याच दिवशी या गावात श्री जगदंबेचा मोठा उत्सव सुरू होतो. याची सुरवात संध्याकाळी दिवेलागणीच्या सुमारास होते. श्री जगदंबेचा हा उत्सव सतत तीन दिवस साजरा केला जातो. यालाच बोहाडा असेही म्हणतात. या उत्सवप्रसंगी गाव सकाळपासूनच स्वच्छ केले जाते. सर्वत्र पताका वगैरे लावून गाव सुशोभित केले जाते. या उत्सवासाठी गावाच्या मध्यभागी एक मंडप घातला जातो. या मंडपाला चांदणी असे म्हणतात.

उत्सवाच्या पहिल्या दिवसाला 'थाप' म्हणतात. थाप म्हणजे स्थापना. दुसरा दिवस धाकट्या बोहाड्याचा आणि तिसरा दिवस मोठ्या बोहाड्याचा. या सर्व दिवशी सोंगे नाचविली जातात. या उत्सवाला आस-पासच्या गावातून लोक येतात.

या जगदंबा उत्सवाची पार्श्वभूमी अशी सांगितली जाते की फार फार वर्षांपूर्वी नाशिक जिल्हातील गंगापूर येथे या जगदंबा उत्सवाची म्हणजेच बोहाड्याची सुरवात झाली. पुराणकालीन, रामायणकालीन देवादिकांचे मुखवटे माणसाच्या चेहऱ्यावर धारण करून त्यांना नाचविण्याची प्रथा गंगापूरला आजही आहे. जव्हारच्या परिसरातील लोक बोहाडा पाहण्यासाठी गंगापूरला जात असत. नंतर नंतर मात्र जव्हार परिसरातील लोकांनी या बोहाड्याचे अनुकरण करून हा उत्सव सुरू केला. या उत्सवात लहान थोर अशी सर्व थरातील लोक सोंगं नाचवीत. जव्हारमध्ये संस्थानी राजवटीत या उत्सवाला अधिक प्रोत्साहन मिळून राजाश्रम मिळाला, आणि प्रतिवर्षी बोहाडा करण्याची प्रथा सुरू झाली. जव्हारमध्ये जरी हा उत्सव अधून मधून साजरा होत असला तरी जव्हारच्या ग्रामीण भागात पसरलेली या उत्सवाची लाट आजही एक सांस्कृतिक परंपरा म्हणून टिकून राहिली आहे.

देवादिकांचे मुखवटे पूर्वी मातीचे किंवा लाकडाचे केले जात. त्यानंतर मात्र हे मुखवटे कागदाच्या लगद्यापासून बनविण्यास सुरवात झाली. या मुखवट्यांचा संच ज्या गावी उपलब्ध असेल तेथून तो तीन दिवसांसाठी भाड्याने आणला जातो. सोंगे फक्त पुरुषच नाचवितात. देवीचे मुखवटेही पुरुषच स्त्रीवेष धारण करून नाचवितात. मुखवटे आकर्षक दिसण्यासाठी प्रतिवर्षी त्यावर रंगाचा साज चढविला जातो.

पूर्वी सांगितल्याप्रमाणे जगदंबेच्या उत्सवाची सुरुवात थापेपासून होते. पहिल्या दिवशी या उत्सवाची सुरुवात विघ्नहर्त्या गणरायाच्या आगमनाने होत असली तरी त्या आधी दिवेलागणीच्या वेळी पहिले भटजीचे म्हणजे नारदमुनीचे सोंग वाजत गाजत निघते. त्यापूर्वी गावातील सारे गावकरी

मिळून मारुतीच्या मंदिरात जातात त्यावेळी गावातील स्त्री-पुरुषांची जी मिरवणूक निघते तिला 'मूळपती' म्हणतात. या प्रसंगी मारुतीरायाची पूजा करून व्यवस्थित पार पाडण्यासाठी या ग्रामदेवतेस प्रार्थना केली जाते. त्यानंतर विघ्नहर्त्या गणरायाची पूजा करून सर्व अस्मादिकांचा गावात आनंदाने संचार होऊ दे म्हणून मुखवटा धारण केलेल्या गणरायाची पूजा केली जाते. वाजंत्रीच्या सुरात आणि मशालीच्या प्रकाशात गणपतीच्या सोंगापुढे धरलेला पडदा बाजूला सारला जातो. गणरायाही तोंड फिरवून सर्वांना दर्शन देतात आणि नाचत नाचत मार्ग आक्रमू लागतात. गणरायाच्या सोंगापुढे वाजंत्री, सनई यांचा ताफा गणरायाचे आगमन गीत आळवत असतो. गणरायास उत्सवाच्या स्थळाच्या सीमेपर्यंत मिरवत नेले जाते आणि तेथून ताबडतोब मागे फिरवून चांदणीत स्थानापन्न केले जाते. तेथे पुन्हा गणरायाची पूजा केली जाते.

गणरायाचे सोंग चांदणीत असतानाच वाजंत्र्यांचा दुसरा ताफा मोरावर आरुढ झालेल्या सरस्वती-सारजा या देवतेचा मुखवटा मिरवीत आणतात. ही विद्यादेवी चांदणीत येताच गणरायाही तिच्याबरोबर नृत्यात सहभागी होतात. पुन्हा ही दोन्हीही सोंगे उत्सवाच्या स्थळाच्या सीमेपर्यंत जाऊन परत चांदणीत येतात.

याच पद्धतीने नंतर एका मागून एक अशा गणपती, सरस्वती, मारुती, जंबूमाळी, सटवाई, महादेव, अग्निदेव या सोंगांचे मध्यरात्रीपर्यंत चांदणीमध्ये आगमन होते. मात्र या धामधुमीत या देवादिकांना राक्षसांशी लढाई करावी लागते. यात राक्षसांचा पराभव होतो. या राक्षसांची सोंगेही वाजत गाजत येतात. मध्यरात्रीनंतर उत्सवाच्या या पहिल्या दिवसाची समाप्ती होते.

उत्सवाचा दुसरा दिवस असतो तो धाकट्या बोहाड्याचा. पहिल्या म्हणजेच थापेच्या दिवसाप्रमाणेच या दिवसाची सुरवातही सोंगांना नाचवतच होते. मात्र या दिवशी थापेच्या दिवशी निघालेल्या सोंगापेक्षा सोंगे जास्त नाचविली जातात. मात्र पहिल्या दिवशी जी सोंगे नाचविली जातात. तीच सोंगे पुन्हा या दिवशीही नाचविली जातात. त्यानंतर रक्तदेवी, विष्णुदेव, बकासूर, भीष्म, श्रीकृष्ण, काळोबा, ब्रह्मदेव, पांडवादी अशा एकामागून एक दैवी शक्ती सोंगाच्या रुपाने प्रगट होतात. याप्रसंगी राक्षसांची सोंगेही नाचविली जातात. पहाट होण्यापूर्वी या सर्व देवदैत्यादिंची सोंगे त्यांच्या त्यांच्या जागी स्थानापन्न होतात.

उत्सवाचा तिसरा दिवस असतो तो मोठ्या बोहाड्याचा. पहिल्या दोन दिवसांपेक्षा हा दिवस खरा धामधुमीचा असतो. सोंगे नाचविणाऱ्यांना या दिवसाची रात्र लहान वाटते. म्हणूनच की काय असतील नसतील ती सर्व सोंगे चांदणीत येतात. सुरवातीला पहिल्या दोन दिवशी नाचविलेली सोंगे पुन्हा नाचविली जातात आणि मग तिसऱ्या दिवशीच्या नव्या सोंगांची त्यात भर पडते. ही नवीन सोंगे म्हणजे बहिरोबा, खंडोबा, रामलक्ष्मण, हिडिंबा, सूर्यनारायण, रावण, वेताळ, दक्षराजा, वीरभद्र, नरसिंह, उत्सवदेवता जगदंबा, म्हसोबा व लोंढा ही होय.

या सर्व सोंगात उत्सवाची स्फूर्ती देवता जी श्री जगदंबा हिच्या सोंगाचा मान सर्वांत अधिक असतो आणि त्यानंतर मान असतो जेजुरीच्या खंडोबारायाचा. खंडेरायाचे सोंग बांधण्याचा मान हा बहुतेक टिकाणी गावच्या पाटलाचा असतो आणि तो परंपरेने चालत

आलेला असतो. मध्यरात्रीनंतर हे सोंग धारण करणाऱ्याला बांधले जाते. हे सोंग धारण करणाऱ्याची घरधनीण त्याला आरती ओवाळून त्याची पूजा करते. पूजा होताच खंडेरायाला खंडेमहाराज की जयच्या जय-जयकारात त्याच्या वाघ्या मुरळींसह नाचविले जाते. या अस्मादिकांची स्वारी त्यांच्या भक्तगणांना घुमवत, घुमवत चांदणीपर्यंत संचार करते. या खंडेरायाच्या सोंगाचे वैशिष्ट्य असे की वाजंत्र्यांची ललकारी सुरू होताच खंडेरायाचा वारा कित्येकांच्या अंगात येतो आणि मग ती मंडळी तेथेच घुमत रहातात. वारा निघून गेल्यावर पूर्ववत ती मंडळी या कार्यक्रमात भाग घेतात. असे हे खंडेरायाचे सोंग बोहाड्यामध्ये साऱ्या भाविकांचे लक्ष वेधून घेते.

या खंडोबारायाच्या सोंगा व्यतिरिक्त त्राटिका, भीष्म, बकासूर, पांडव, चारण आदी सोंगेही फारच आकर्षक असतात. त्यांचा तालबद्ध नाचही पाहण्यासारखा असतो. दोन्हीही हातात पेटत्या मशाली घेऊन अक्राळ विक्राळ रूप असलेला मुखवटा धारण करून त्राटिका आणि शूर्पणखा जेव्हा राम लक्ष्मणावर हल्ला करतात तेव्हा त्यांची ही लढाई प्रेक्षणीय अशी असते. एका बाजूने राम आणि दुसऱ्या बाजूने लक्ष्मण त्याच्या-जवळच्या धनुष्यबाणाने त्यांना कोंडीत पकडून अखेर त्यांचा वध करतात.

चारणीचे सोंग हे तर अवर्णनीय असते. हे सोंग कुठलाही मुखवटा धारण न करता नाचविले जाते. चारण स्त्रीचा पोषाख करून डोक्यावर छिद्रांचे मडके घेऊन त्यात पेटत्या गोवऱ्या घालून, डोक्यावर ज्वालांचा भार घेऊन अक्षरशा जीव मुठीत घेऊन बेफामपणे हे चारण स्त्रीचे सोंग नाचत असते.

भीम, बकासूर हे तर डरकाळी फोडीतच प्रवेश करतात. पूर्वी ही सोंगे मिरवताना या सोंगांची चांदणीत भाषणे होत व त्या भाषणातून आवाहने, प्रतिआवाहने दिली जात व नंतर लढाई जुंपत असे. या दिवशीचे वेताळाचे सोंगही आकर्षक असते. या सोंगाचा मुखवटा बांधला जात नाही. तर सोंग घेणारा भरजरी पोषाख घालून डोक्यावर पेटत्या दिव्यांचा उंच मनोरा बांधतो आणि नाचतो. डोक्यावरील आकर्षक मिनाऱ्यामुळे या सोंगाची भव्यता काही औरच असते.

या सोंगापेक्षाही चित्तथरारक सोंग असते ते श्री जगदंबेचे. दोन्हीही हातात तलवारी घेऊन हे सोंग म्हसोबा व लोंढ्या या सोंगांना मारण्यासाठी धावते. देवी त्यांच्यावर चालून जाते आणि थोड्याच वेळात त्यांचा वध करते. ती वेळ सूर्योदयाची असते. येथे शेवटची सर्व सोंगे संपतात आणि रात्रही संपते.

श्री जगदंबादेवी असुरी शक्तीचा नायनाट करून विजयी मार्ग आक्रमू लागते. गावातील प्रत्येक घरचे या देवीला आमंत्रण असते. देवी प्रत्येक घरी जाते तेथे तिची आरती करून पूजा केली जाते. नारळाने तिची ओटी भरली जाते. या प्रसंगी नवसही फेडले जातात. देवीचे सोंग हे पूर्वापार चालत आलेल्या घराण्यातच बांधले जाते. हे सोंग नाचविणाऱ्यास उपवासाचे कडक व्रत पाळावे लागते. या उत्सवाला जोडूनच उत्सवाचे आकर्षण म्हणून कुस्त्यांचा कार्यक्रम केला जातो. या कार्यक्रमानंतर या उत्सवाची सांगता होते.

अशा तऱ्हेने आदिवासींच्या सांस्कृतिक जीवनाचे दर्शन बोहाडा या उत्सवात घडते.

● ● ●

# ‘काज’ -- वारली आदिवासींची आत्म्याविषयी संकल्पना

डॉ. लता छत्रे

धर्म म्हटला की आत्मा, आधिभौतिक शक्ती, आधिदैविक शक्ती या संबंधीचे विचार हे आलेच. म्हणूनच एखाद्या जमातीचे किंवा समाजाचे ‘धर्म’ विषयीचे विचार समजून घ्यायचे असतील तर त्यांचे आत्म्याविषयीचे विचार समजून घेणे अगत्याचे ठरते.

आत्मा अमर आहे की नाही, पुनर्जन्म, व्यक्तीच्या मृत्यूनंतर आत्म्याचे काय होते इत्यादी प्रश्नांचा उहापोह करणे ही केवळ तत्त्वज्ञांचीच मक्तेदारी आहे असे नाही तर निसर्गाच्या सान्निध्यात राहणाऱ्या, डोंगर-कपारींमध्ये वस्ती करणाऱ्या आणि सुसंस्कृत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शहरी समाजा-पासून दूर राहणाऱ्या आदिवासींनाही हे प्रश्न सतत भेडसावित आले आहेत. आदि-वासीनीही आत्म्याच्या स्वरूपाविषयी बरेच मनन आणि चिंतन केलेले दिसून येते. त्यांचे आत्म्याविषयीचे विचार तत्त्वज्ञांनी केलेल्या विचारांइतके तर्कशुद्ध नसतीलही पण त्यांचे विचार दुर्लक्ष करण्याइतके उपेक्षणीयही नाहीत. त्यांचे आत्म्या विषयीचे विचार एखाद्या उपपत्ती द्वारा आपल्या पुढे येत नाहीत तर त्यांचे विचार त्यांच्या जन्ममृत्यू विषयीच्या संकल्पनांमध्ये तसेच त्याप्रसंगी केल्या जाणाऱ्या विधींमध्ये प्रतिबिम्बीत होतात. प्रस्तुत लेखामध्ये ठाणे जिल्ह्यातील ‘वारली’ या आदिवासींच्या आत्म्याच्या स्वरूपाविषयीचा विचार समजून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

वारली आदिवासींमध्ये असा समज आहे की व्यक्तीच्या मृत्यूनंतर तिचा आत्मा लगेचच पुन्हा जन्म घेत नाही तर तो वर्षभर सुप्त रूपाने त्यांच्याचमध्ये वावरत असतो. एवढेच नाही तर आत्मा मृत व्यक्तीच्या वर्षश्राद्धाच्या दिवशी भगताद्वारा त्याच्या नातेवाईकांना आणि मित्रपरिवाराला भेटतो. याशिवाय त्यांचा असाही समज आहे की, मरतेसमयी व्यक्तीच्या काही इच्छा अपुऱ्या राहून जातात. तसेच त्या व्यक्तीला तिच्या आप्तांबद्दल जिव्हाळा, प्रेम किंवा काळजी वाटत असते. जर ह्या अपुऱ्या इच्छा घेऊन व्यक्ती मृत झाली तर तिच्या आत्म्याला गती मिळत नाही आणि तो अतृप्त आत्मा भटकत राहतो. उलट या व्यक्तीच्या मृत्यूनंतर जर आपण विशिष्ट विधी करून असे सांगितले की, ‘बाबारे’! तू तुझ्या आप्तांची काही काळजी करू नकोस, त्यांची काळजी घ्यायला आम्ही आहोत,’ तर त्या मृत व्यक्तीचा आत्मा भटकत न राहता त्याला वर्षानंतर पुढची गती प्राप्त होते.

वारली आदिवासींचे आत्म्याविषयीचे हे विचार, त्यांच्यात व्यक्तीच्या मृत्यूनंतर केले जाणारे विधी तसेच व्यक्तीच्या वर्ष श्राद्धाच्यावेळी केला जाणारा ‘काज’ हा विधी, या विधींचे स्वरूप समजून घेतले असता अधिक स्पष्ट होतात. म्हणून या विधींचे स्वरूप थोडक्यात समजावून घेऊ.

वारली आदिवासींमध्ये व्यक्ती मृत झाल्यानंतर तिच्या प्रेताला आंघोळ घालतात. त्यानंतर प्रेतावर पांढरा कपडा पांघरून त्याला गुलाल, बुक्का, फुले आणि तुळस वाहतात. अगरबत्ती लावतात. नंतर ते प्रेत स्मशानात दहन करण्यासाठी घेऊन जातात. स्मशानाच्या अर्ध्या रस्त्यावर आल्यावर प्रेताला खाली ठेवतात आणि प्रेतावरून पैसे ओवाळून फेकून देतात. हे पैसे प्रेताच्या पायाशी ठेवलेल्या मोडक्या- तोडक्या टोपलीत ठेवतात. नंतर ती टोपली तेथेच तीन दगडावर ठेवून प्रेताला पुढे स्मशानात नेतात. स्मशानाच्या अर्ध्या रस्त्या-पर्यंतच बायकामुले येतात आणि तेथूनच माघारी वळतात. स्मशानात चिता रचून प्रेताला चितेवर ठेवतात. चितेला अग्नी लावण्यापूर्वी प्रेताच्या चेहऱ्यावरील कापड बाजूला काढून प्रेताच्या तोंडात अंत्यविधी-साठी जमलेली मंडळी भाताची दोन दोन शितं टाकतात. नंतर हातात धरलेल्या मडक्यात पाणी आणून प्रत्येक इसम जांभळीच्या पानाने ते पाणी प्रेताच्या मुखात सोडतात. तसेच एक रुपया प्रेताच्या मुखात ठेवतात. मृताच्या आत्म्याला यमराजाकडून शिक्षा होऊ नये म्हणून मृताच्या हातात दोन रुपये ठेवतात. हे पैसे ठेवत असताना ''नगायेना नगा जाना'' असे म्हणतात. त्यानंतर मृताच्या नातेवाईकाने चितेभोवती पाच फेऱ्या मारून प्रेताच्या मस्तकापाशी जाऊन नमस्कार करायचा, प्रार्थना करायची आणि चिता पेटवून प्रेताचे दहन करायचे. प्रेताचे दहन झाल्यावर प्रत्येक जण नदीवर जाऊन स्नान करतो. स्नान झाल्यावर एक इसम कळंब्याची साल आणतो. ती साल हातात पाठीमागे धरतो आणि नंतर प्रत्येक इसम ओळीने ती साल हातात धरून त्याच्या स्वतःच्या तोंडात घेऊन नंतर मस्तकाला आणि शरीराला चोळतो.

त्यानंतर अन्त्यविधीस जमलेली सर्व मंडळी मृत व्यक्तीच्या घरी त्याच्या कुटुंबियांच्या सांत्वनासाठी जातात. यावेळेस घराच्या दारात शेणाचा आळा किंवा वाटी ठेवलेली असते. नंतर घराच्या कौलावर घरातील पाणी अशा पद्धतीने फेकायचे की ते आळ्यात पडले पाहिजे. त्या आळ्यातील पाणी प्रत्येक इसम त्याच्या स्वतःच्या डोळ्याला आणि डोक्याला लावतात. अशा तऱ्हेने देह पवित्र झाला आहे असे समजून घरात जातात आणि घरातील लोकांचे सांत्वन करतात.

अशा रीतीने व्यक्तीच्या मृत्यूनंतर वरील प्रकारचे विधी वारलीमध्ये केले जातात, मात्र यानंतर दहावा, तेरावा वगैरे प्रकारचे विधी त्यांच्यात नाहीत. या दिवसानंतर मृत व्यक्तीच्या संदर्भात केला जाणारा महत्त्वाचा विधी म्हणजे 'काज.'

वारलीमध्ये मृत व्यक्तीचे वर्षश्राद्ध जरूर करतात. तेच 'काज' या नावाने ओळखले जाते. या काजची वैशिष्ट्ये अशी की मार्गशीर्ष महिन्यातील कोणतातरी एक दिवस ठरवून हा विधी केला जातो. या दिवशी वर्षभरात पाड्यातील ज्या व्यक्ती मृत झाल्या असतील त्यांचा एकत्रितरित्या काज केला जातो. म्हणजेच व्यक्तीचा काज करीत असताना ती व्यक्ती मृत होऊन वर्ष झालेलेच असले पाहिजे, अशा प्रकारची आवश्यकता नसते. तसेच व्यक्तीचा काज हा एकदाच केला जातो. कारण त्यांचा असा समज आहे की काज केल्यावर आत्मा पुढच्या गतीला जातो.

काजच्या विधीची सुरवात संध्याकाळच्या सुमारास होते. हा विधी त्या दिवशी रात्रभर तसेच दुसऱ्या दिवशी दिवसभर चालू असतो.

या प्रसंगी पाड्यातील सर्व स्त्रियांना आणि पुरुषांना आमंत्रण असते. त्यांना जेवण आणि दारू दिली जाते.

सर्वात प्रथम अंगण शेणाने सारवले जाते. अंगणात झोपडीच्या समोर बांबूच्या सहा काठ्या उभारून ,एक छोटासा मांडव घातला जातो. मांडवावर बांबूच्या काड्या तसेच गवत ह्यांनी आच्छादले जाते. मांडवाखालची जमीनही शेणाने सारवून स्वच्छ केली जाते. त्या जमिनीवर शेंदराचा सडा घातला जातो. त्यावर फुले टाकली जातात. नंतर तांदूळाच्या दोन ओळी मांडवात घातल्या जातात. त्या दोन ओळींच्या मध्ये मृत व्यक्तीचे चिन्ह म्हणून एक आकृती शेंदराने काढली जाते. नंतर त्या आकृतीवर आणि तांदूळाच्या ओळीवर एक नाणे ठेवले जाते. नंतर ती आकृती कापडाने पूर्णपणे झाकली जाते.

मांडवाच्या बाहेरच्या बाजूलाही धान्याने दुहेरी चौकट घातली जाते. त्या दुहेरी ओळीमध्ये धान्याचा ढीग ठेवला जातो. ताज्या पाण्याने भरलेले मातीचे भांडे त्या ढिगावर ठेवले जाते. पहिल्या ढिगापासून काही अंतरावर धान्याचा दुसरा ढीग ठेवला जातो. त्याच्यावरही मातीचे एक भांडे ठेवले जाते. त्या दोन्हीही भांड्यावर शेंदराने विशिष्ट खुणा केल्या जातात. दुसऱ्या ठेवलेल्या मातीच्या भांड्यावर नारळ ठेवला जातो. ह्या सर्वांची मांडणी मुख्य भगताच्या हाताने केली जाते. तोच ह्या प्रसंगी म्हटल्या जाणाऱ्या मंत्रांचा आणि गाण्यांचा प्रमुख असतो. मांडवाच्या छप्पराला एक धागा बांधला जातो. त्या धाग्याचे दुसरे टोक नारळ ठेवलेल्या मातीच्या मडक्यात सोडले जाते. या धाग्याला बारा पाने बांधली जातात. मृत व्यक्तीच्या आत्म्यासाठी म्हणून उकडलेल्या भाताची लहान लहान पिंडांची चवळ आणि भाजी पानांनी बनविलेल्या एका द्रोणात आणली जाते, व हा द्रोण पहिल्या मातीच्या भांड्याच्या तोंडावर पक्का बसविला जातो. या मातीच्या भांड्याला दोरा बांधलेला नसतो. दुसऱ्या एका द्रोणातही अशाच प्रकारे अन्न ठेवून तो द्रोण मंडपावरून पाच वेळा ओवाळला जातो, व शेवटी मंडपाच्या छप्परावर ठेवला जातो. हा सर्व विधी मध्यरात्री केला जातो.

हा विधी करणाऱ्या व्यक्तीला 'कामडी' असे म्हणतात. हा मनुष्य त्याच्या साथीदारां-बरोबर वाद्यांच्या सहाय्याने रात्रभर विशिष्ट प्रकारचे गाणे आळवत असतो. प्रत्येक गाण्याच्या शेवटी गाणे म्हणणाऱ्यांचा मुख्य मोठ्या आवाजात मेलेल्या व्यक्तीच्या नावाने पुकार करतो. जेव्हा हा कामडी मोठ्या आवाजात मृत व्यक्तीचे नाव पुकारतो तेव्हा तेथे जमलेल्या स्त्रिया मोठ्याने रडायला सुरुवात करतात. हे सार्वजनिक पद्धतीचे रडणे दोन ते तीन मिनिटे अतिशय यांत्रिकपणे चालते. मध्यंतराच्या काळात गाणे म्हणणाऱ्यांना दारू पाजली जाते.

सकाळी दिवा पेटविला जातो आणि मृत व्यक्तीच्या जेथे जमलेल्या सगळ्या नाते-वाईकांना मांडवाच्या छप्पराला बांधलेल्या धाग्याला स्पर्श करण्यासाठी बोलाविले जाते. कामडी सर्वात प्रथम धाग्याला स्पर्श करतो. इतर त्याच्यामागे ओळीने उभे रहातात. असे करीत असताना प्रत्येक जण त्याच्यापुढील व्यक्तीला हाताने स्पर्श करतो. अशा पद्धतीने कामडीच्या द्वारा इतर व्यक्ती त्या धाग्याला स्पर्श करतात. नंतर कामडी दिव्याने मंडपाला ओवाळतो.

हे झाल्यानंतर कामडी पुन्हा गाणे आळवायला लागतो. या कामडीच्या विरुद्ध

बाजूस मातीच्या भांड्यासमोर बसलेला दुसरा भगत मृत व्यक्तीचा आत्मा त्याच्या स्वत:च्या अंगात यावा म्हणून प्रयत्न करतो. मृतात्मा अंगात येण्यापूर्वी त्याच्या अंगात नारायण नावाचा देव येतो. हा देव मृतात्म्यांना घेऊन येतो असा समज आहे. नारायण देव अंगात येण्यापूर्वी बहरम नावाचा देव त्या भगताच्या अंगात येतो. जेव्हा बहरम अंगात येतो तेव्हा तो मनुष्य मांडवापाशी ठेवलेली दारू पितो. आणि तेथेच ठेवलेल्या तलवारीने स्वत:च्या डोक्यावर वार करतो. वार केल्यामुळे त्याच्या डोक्यातून रक्त येते व त्या रक्ताचा मृतात्म्याला नैवेद्य दाखविला जातो. गंमत म्हणजे प्रत्येक धार्मिक विधीसाठी कोंबड्याचा बळी देणारे आदिवासी यादिवशी मात्र मानवी रक्ताचा नैवेद्य दाखवितात.

बहरम देवानंतर नारायणदेव भगताच्या अंगात येतो. त्यानंतर तो भगत मृत व्यक्तीचा आत्मा अंगात यावा म्हणून जोरजोराने शरीर हालवितो आणि कमाडी मोठमोठ्याने मंत्र म्हणून त्याला प्रोत्साहन देतो. जमलेली इतर मंडळी त्या दुसऱ्या भगताच्या अंगात मृतात्मा कसा येतो ते लक्षपूर्वक बघतात. त्याच सुमारास मेलेल्या मनुष्याचा आत्मा अंगात आलेला भगत मृत आत्म्यासाठी राखून ठेवलेली मंडपातील जागा ओळखतो व तेथे जाऊन बसतो. नंतर तो जमलेल्या व्यक्तींशी मृत व्यक्तीच्या आयुष्यात घडलेल्या घटनांविषयी गप्पा मारतो. मृत व्यक्तीच्या आयुष्यातील गुपित ओळखतो. मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना शोधून काढतो आणि त्यांच्या ओळखीच्या ठिकाणी घेऊन जातो. नंतर मृत व्यक्तीचे जमलेले नातेवाईक भगताला मिठ्या मारून रडतात. काही काळपर्यंत असेच चालते. नंतर तो भगत तंबूमध्ये जाऊन बसतो. तेथे बसल्यावर एका मागून एक अशा पद्धतीने प्रत्येक नातेवाईक त्या भगताला मिठी मारतो आणि रडतो. असे करीत असताना त्यांचा असा विश्वास असतो की जणूकाही मृत व्यक्ती त्यांना वेगळया माध्यमातून भेटत आहे.

जर मेलेली व्यक्ती पुरुष असेल तरच बहरम अंगात आलेली व्यक्ती डोकं कापते. जर मृत व्यक्ती स्त्री असेल बहरम अंगात आलेली व्यक्ती डोकं कापत नाही. तसेच ठराविक कुळाकडेच म्हणजे टोकऱ्या, नाकरा, बरफ, जाबर, मोर इत्यादींकडेच डोकं कापण्याची कामगिरी सोपविली जाते.

दुसऱ्या दिवशी दुपारच्या वेळेस मातीची मडकी जवळच्या झऱ्यापाशी किंवा वाहत्या पाण्यापाशी नेऊन फोडली जातात. यानंतर प्रत्येकजण तेथे अंघोळ करून शुद्ध आणि पवित्र होतो. येथेच वर्षश्राद्ध या विधीचा शेवट होतो. हा विधी नंतर पुन्हा कधीही केला जात नाही.

हल्ली मात्र 'काज' हा विधी करण्यासाठी बंदी घातली गेली आहे कारण डोकी फोडणे या प्रकारात एकदोन व्यक्ती मृत्यूमुखी पडल्या. म्हणून हल्ली काज ऐवजी व्यक्तीच्या मृत्यूच्या दिवशीच वर्षश्राद्धाचे विधी केले जातात. अर्थात याचे प्रमाण बरेच अल्प आहे.

अशा तऱ्हेने 'काज' साजरा करण्यामागे असा वारली आदिवासींचा विश्वास आहे की व्यक्तीच्या मृत्यूनंतर तिचा आत्मा वर्षभर दुसरा जन्म घेत नाही. तर तो लोकांमध्येच असतो. काज हा विधी केल्यावरच तो त्याच्या पुढच्या प्रवासाला जातो. तसेच व्यक्ती जरी मेली तरी तिचा आत्मा मृत होत नाही तर तो त्याच्या नातेवाईकांना काजच्या दिवशी वेगळया रूपात भेटतो.

● ● ●

# 'होळी' आदिवासींचा खास सण

**डॉ. लता छत्रे**

उत्सव कोणाला प्रिय नसतो? कारण उत्सव म्हणजे आनंद असतो, मनाला विरंगुळा असतो. लहान-मोठी गरीब-श्रीमंत प्रत्येक जण उत्सवात भाग घेऊन नाचत असतात, गात असतात. आदिवासी याला कसा अपवाद असेल? तोही उत्सवप्रिय आणि उत्सववेडा आहे. आदिवासींच्या उत्सव साजरा करण्यामागे निरागसता असते, निसर्गावर अपार श्रद्धा असते. त्यांच्यात शहरी उत्सवात दिसून येणारा बीभत्सपणा किंवा श्रीमंती थाट नसतो, तर उत्सव म्हणजे त्यांच्या कष्टमय जीवनाचा विसावा असतो. एकमेकांची सुखदुःखे समजून घेण्याचा तो एक मार्ग असतो. म्हणूनच आदिवासींचा उत्सव सामाजिक आणि धार्मिक दोन्हीही दृष्टीकोनातून महत्त्वाचा आहे.

बहुतेक सर्व आदिवासी जमातींच्या बाबतीत असे दिसते की कोणताही सण या भागामध्ये घराघरांमधून वेगवेगळा साजरा होत नाही तर प्रत्येक घरातील प्रत्येक व्यक्ती गावातील निश्चित केलेल्या एका ठिकाणी एकत्र जमतात आणि तो सण साजरा करतात. उदाहरण म्हणून बैलपोळा, दिवाळी, शिमगा, नवरात्र इत्यादी सणांचे देता येईल. त्यामुळेच आदिवासी भागात साजऱ्या होणाऱ्या सणांचे स्वरूप सार्वजनिक आणि म्हणूनच उत्सवरूपी असते.

आदिवासी समाजात सणांचे स्वरूप सार्वजनिक जरी असले तरी प्रत्येक आदिवासी जमातीमध्ये तो सण साजरा करण्याच्या पद्धती, त्यामागची धार्मिक भावना आणि लोककथा वेगवेगळया दिसून येतात. हिंदू महादेव कोळी ज्या पद्धतीने एखादा सण साजरा करतात त्यापेक्षा वेगळ्या पद्धतीने क ठाकर किंवा पावरा आदिवासी साजरा करतात. थोडक्यात सांगायचे म्हणजे या सार्वजनिकतेमध्ये सांस्कृतिक आणि धार्मिक विविधता दिसून येते. ही विविधता समजून घेण्यासाठी क ठाकर, पावरा आणि हिंदू महादेव कोळी हे आदिवासी साजरा करीत असलेल्या 'होळी' सणांची माहिती करून घेऊ.

क ठाकर या आदिवासी जमातीमध्ये होळी फाल्गुन महिन्याच्या पौर्णिमेला साजरी करतात. सण साजरा करण्यासाठी मात्र एक महिना आधीच तयारी सुरू करतात. घराघरांमधून लहान लहान विस्तव पेटविले जातात आणि हे सर्व विस्तव होळीच्या दिवशी एकत्र आणले जातात. पौर्णिमेच्या दिवशी गावातील एका विशिष्ट ठिकाणी मोठा खड्डा केला जातो. या खड्ड्यात मोठमोठी लाकडे आणून शिगोशिग रचतात. त्याआधी खड्ड्यात एक रुपया टाकतात. या लाकडाच्या ढिगात बांबूची काठी त्याच्या काड्यासकट रोवतात. या काठीला तांदळाची भाकरी बांधतात. बाजूनी गवत वगैरे ठेवतात. होळी कोणी पेटवायची हे आधीच ठरलेले असते. होळी पेटविण्यापूर्वी होळीभोवती जमलेले लोक मोठमोठ्याने बोंब मारतात. उदाहरणार्थ 'आवली रे आवली, या गांवकऱ्यांनो आम्ही होळी लावली'. ही आवली ऐकून गावातील इतर जण होळीभोवती जमतात. होळी लावणारा मुख्य जो असतो तो त्याच्या हातात आंबाडीच्या काड्या ज्याला सरकांड्या

म्हणतात त्या पेटवून होळीभोवती पाच फेऱ्या पूर्ण करतो व प्रत्येकवेळी फेरी पूर्ण झाल्यावर होळीला नमस्कार करतो. अशाप्रकारे पाच फेऱ्या पूर्ण झाल्यावर तो मुख्य मनुष्य होळी पेटवून देतो. होळी पेटविल्यानंतर प्रत्येक घरातील स्त्री होळीला प्रदक्षिणा घालते आणि नैवेद्य दाखविते.

होळीला त्यांच्या रूढीप्रमाणे नारळ आणि खोबऱ्याची वाटी अर्पण करतात. एखादे कार्य सफल व्हावे म्हणून कोणी जर नवस केला असेल तर तो होळीला कोंबड्याचा नैवेद्य दाखवितो किंवा साडीचोळी देऊन नवस फेडतो. ज्या कोणाला पुढच्या वर्षाकरिता नवस घ्यावयाचा असल्यास सात-आठ माणसे ओळीने बसतात. प्रत्येकाजवळ थोडे थोडे तांदूळ दिलेले असतात. ज्याला नवस घ्यावयाचा असतो तो नवस कशाच्या बाबतीत आहे हे बसलेल्यांना सांगतो. अर्थात ह्या बसलेल्या व्यक्ती भगत गणातीलच असतात. हे भगत तोंडाने काही तरी मंत्र पुटपुटतात, होळीला नवस करून हातातील तांदूळ होळीत टाकतात आणि होळीला नमस्कार करतात. मग जमलेल्या लोकांना सांगतात की अमूक व्यक्तीने त्याच्या घरात सुख नांदावे तसेच घरातील दुःख दूर व्हावे म्हणून नवस घेतलेला आहे. होळीत असलेला बांबू जोपर्यंत आवाज करीत नाही तोपर्यंत होळीभोवती जमलेल्यापैकी कोणीही घरी जात नाही. होळीतील बांबूचा आवाज झाल्यावर सर्व लोक होळीचा जयघोष करतात. त्यानंतर होळीत असलेला बांबूचा खांब खाली वाकवून त्याला लावलेल्या तांदूळाच्या लहान लहान भाकरी प्रत्येकजण तोडून घेण्याचा प्रयत्न करतात. तो खांब मोडून होळीच्या भोवती, ज्याने होळी लावली असेल तो पाचवेळा ओढत नेतो. बाकीचे लोक त्याच्या हातून बांबू पाडण्याचा प्रयत्न करतात. होळीभोवतीचे पाच फेरे पूर्ण झाल्यावर तो हातातील बांबू घेऊन धावत नदीकाठाला किंवा गावाबाहेर पळत जातो. नंतर त्या ठिकाणी जमलेला जनसमुदाय त्या ठिकाणची रक्षा घेऊन एकमेकांना रक्षा लावून नमस्कार करतात व एकमेकाना भेटतात. रात्री घरोघरी जाऊन प्रत्येक घरातून जेवण मागवितात व एकत्र करून गोपालकाल्या-प्रमाणे सर्वजण एकत्र बसून खातात. अशा रीतीने होळीचा दिवस गावातील सर्वजण एकत्र येऊन आनंदात घालवितात.

अशा पद्धतीने होळी साजरी केल्यानंतर दोन दिवसांनी होळी ज्या ठिकाणी लावलेली असते त्या ठिकाणी होळी लावलेली व्यक्ती आणखीन दोघातिघांना घेऊन येते व होळीत टाकलेले नारळ आणि खोबऱ्याची वाटी गोळा करतात आणि त्याचा प्रसाद म्हणून प्रत्येक घरी देऊन त्याच्या बदल्यात प्रेमाने पैसे मागतात. अशा प्रकारे रंगपंचमीपर्यंत हा सण साजरा करतात.

पावरा आदिवासींमध्ये होळीचा सण जरा वेगळया पद्धतीने साजरा करतात. यांच्या मते होळी ही एक देवता मनोरथ पूर्ण करणारी देवता आहे आणि म्हणूनच ते होळीला नवस करतात. त्या दिवशी नवस करणारा दागिने वगैरे अंगावर चढवून, नवीन वस्त्रे घालून, डोक्यावर वासुदेवासारखी टोपी घालून होळी पेटविण्यापूर्वी भगताकडे जातो. भगत त्याच्या गळयात माळ घालतो आणि मगच परत येऊन तो होळी पेटवितो. ज्या व्यक्तीने होळीला नवस केलेला असतो ती होळीच्या आधी सात दिवस उपवास करते. या काळात घरात कोठेही शीवाशीव होणार नाही याची काळजी घेतली जाते. होळीच्या दिवशी होळीपुढे कोंबड्याचा बळी देतात. त्यांचा असा विश्वास आहे की होळीला रक्ताचा नैवेद्य दाखविल्यामुळे घरातील इडापिडा टळते. भगतही त्यांना असा सल्ला देतो की घरातील इडापिडा

टळण्यासाठी होळीची ओळीने पाच सात वर्षे पूजा करा. नवस करणारी व्यक्ती पाच होळ्यांचे दर्शन घेऊन पुन्हा भगताकडे जाते आणि भगत त्याच्या डोक्यावर पाणी टाकून त्याला मुक्त करतो. त्या दिवशी भगताला दारू देतात, नारळ, कोंबडं, बकरं इत्यादी ऐपतीप्रमाणे देतात.

होळी पेटविण्यापूर्वी खड्डा करतात. या खड्ड्यात बांबू रोवतात. बांबूच्या टोकाला, जांभळीचा पाला बांधतात. खोबऱ्याची वाटी, ज्वारीच्या पाच भाकरी, बांबूची पालखी, गोवऱ्या इत्यादी खड्ड्याजवळ ठेवतात. नंतर होळीने पेट घ्यावा म्हणून खड्ड्यात लाकडे आणि कडबा ठेवतात. नंतर गावातील पोलिस पाटलाकडून विस्तव घेऊन येतात आणि हा विस्तव गवतावर ठेवतात. या विस्तवाला फुंकर मारायची नसते. गवतावर विस्तव ठेवल्यामुळे वाऱ्याने गवत पेट घेते. होळीने पेट घेतल्यावर जमलेले गावकरी होळीभोवती फेऱ्या मारतात, होळीला नमस्कार करतात आणि डाळ-गुळाचा नैवेद्य दाखवितात.

हे आदिवासी होळी लगेच पेटवीत नाहीत, तर ती वर सांगितल्याप्रमाणे रचून ठेवतात. रात्रभर होळीभोवती नाचतात आणि पहाटे होळी पेटवितात. होळीच्या निमित्ताने गावात बाजार भरतो.

नवस केलेल्यांना सात होळ्यांचे दर्शन घेण्याच्या निमित्ताने सात गावात भटकावे लागते. या भटकंतीच्या काळात ते गावात भिक्षा मागून त्यांची भूक भागवितात. सात गावातून हिंडून पुन्हा पहिल्या ठिकाणी येतात. अंघोळ वगैरे करून होळीची पूजा करतात. तिला कोंबडीचा बळी देतात. अशा तऱ्हेने पावरा आदिवासी, होळीचा सण साजरा करतात.

हिंदू महादेव कोळ्यांच्या बाबतीत असे दिसते की ही आदिवासी जमात तुलनेने सुशिक्षित आहे. यांचा जुन्नरसारख्या भागाशी वारंवार संबंध आल्यामुळे होळीसाजरी करण्याची त्यांची पद्धत साधी असली तरी ती शहरी घडणीची वाटते. हिंदू महादेव कोळ्यांच्या होळी या सणाचे स्वरूप काहीसे सार्वजनिक आणि धार्मिक आहे. होळीचा सण फाल्गुन पौर्णिमेला साजरा केला जातो. या दिवशी अंजनावळे गावातील आश्रमशाळे-समोरील मैदानात होळी पेटविली जाते. एका लोखंडी घमेल्यात गोवरी, ऊसाची कांडी आणि लाकडं एकत्र ठेवली जातात. नंतर त्यांची पूजा केली जाते आणि होळी पेटविली जाते. या पेटविलेल्या होळीला पुरण-पोळीचा नैवेद्य दाखवून ती पोळी होळीला अर्पण केली जाते. गांवकरी होळीभोवती ढोल वाजवितात आणि बोंब मारतात. हा सण साजरा करण्यामागे एक छानशी गोष्ट सांगितली गेली. फार फार वर्षांपूर्वी हिरण्यकश्यपू नावाचा राजा भारतामध्ये राज्य करीत होता. तो अतिशय दुष्ट होता. त्याला त्याचा मुलगा प्रल्हाद याचा वध करावयाचा होता. त्यासाठी त्याने दोनदा प्रयत्न केले, पण त्याचे हे दोन्हीही प्रयत्न फसले. त्या राजाला होलीका नांवाची बहीण होती. ती पण अतिशय दुष्ट होती. प्रल्हादाला ठार मारण्याचे आवाहन तिने स्वीकारले आणि त्याला ठार मारण्याचे ठरविले. प्रल्हादाला मांडीवर घेऊन धगधगत्या आगीमध्ये ती बसली. परंतु त्यापूर्वी तिने स्वतःचे आगीपासून संरक्षण व्हावे यासाठी विशिष्ट प्रकारचे कापड तिच्या अंगाभोवती गुंडाळले. तिचा हा कावेबाजपणा भगवान विष्णूंच्या लक्षात आला आणि वायूच्या मदतीने त्यांनी होलीकाच्या अंगावरील वस्त्र उडवून दिले आणि ते प्रल्हादाच्या अंगावर घातले. प्रल्हादाच्या अंगावर वस्त्र पडल्यामुळे त्याचे आगीपासून संरक्षण झाले परंतु होलीका मात्र त्या आगीमध्ये होरपळून मेली.

(पान ५९ वर)

# जुन्नर परिसरातील महादेव कोळ्यांचे सण आणि उत्सव.

डॉ. लता छत्रे

सांस्कृतिक बदलाचा अभ्यास करताना त्या संस्कृतीमधील सण आणि उत्सव यांना महत्त्वाचे स्थान आहे. प्रस्तुत लेखामध्ये हिंदू महादेव कोळी या आदिवासी समाजात होणाऱ्या सांस्कृतिक बदलाचा अभ्यास ते साजरे करीत असलेल्या सण आणि उत्सव यांच्या आधारे करण्याचा प्रयत्न केला आहे.

हिंदू महादेव कोळी ही आदिवासी जमात महाराष्ट्रामध्ये जुन्नर, भीमाशंकर इत्यादी भागात आढळते. प्रस्तुत लेखासाठी जुन्नर तालुक्यातील खटकाळे, अंजनावळे, देवळे इत्यादी छोट्या छोट्या गावांमधून विखुरलेल्या या जमातीचा अभ्यास केला आहे.

हिंदू महादेव कोळ्यांची मातृभाषा मराठी आहे. त्यांचा मुख्यदेव भैरवनाथ जो की शंकराचा अवतार मानला जातो तो असून विठोबा, श्रीकृष्ण, मरीमाता, कळसूबाई देव देवतांची आराधना हे लोक करतात. त्यांचा व्यवसाय शेती हा असून तो तितकासा प्रगत अवस्थेत नाही. या शिवाय मच्छीमार, मध गोळा करणे, लाकूडतोड इत्यादी दुय्यम व्यवसाय ही जमात करते. तलाठी, सरपंच, पोलिस पाटील इत्यादी मिळून गावांचा कारभार बघतात. अंजनावळे गावामध्ये शिक्षणाचा विशेष प्रसार झालेला दिसून येतो. त्यामुळे गावात तसेच गावातील लोकांच्या विचारसरणीमध्ये बराच बदल झालेला दिसून येतो. याचा परिणाम म्हणजे गावामध्ये जादूटोणा, करणी वगैरे प्रकार तितकेसे दिसून आले नाहीत किंवा भगताचे प्राबल्यही दिसून आले नाही.

जुन्नर मध्ये हे लोक बाजाराच्या निमित्ताने येत असल्यामुळे त्यांच्यावर शहरी जीवनाचा परिणाम झालेला दिसून येतो. शहरामध्ये साजऱ्या होणाऱ्या अनेक सणांचे आणि उत्सवांचे अनुकरण करून या लोकांनी त्यांचे स्वागत केले आहे.

या आदिवासी जमातीमध्ये साजरे होणारे सण आणि उत्सव यांचे दोन विभाग वर्गीकरण करता येते.

१) संस्कृतीचे जतन करण्यासाठी साजरे होणारे सण.

२) संस्कृतीच्या संवर्धनासाठी साजरे होणारे सण.

या दोन्ही विभागातील सणांची आणि उत्सवांची आपण सविस्तर माहिती घेऊ.

**संस्कृतीचे जतन करण्यासाठी साजरे केले जाणारे सण आणि उत्सव -**

संस्कृतीचे जतन करणे ही सोपी गोष्ट नाही किंवा एखाद्या व्यक्तीचे ते काम नाही, तर समाजातील अनेक लोकांनी एकत्र येऊन संस्कृतीचे जतन करणे आवश्यक असते. त्यासाठी समाजातील लोकांचे एकमेकांशी असलेले संबंध शुद्ध आणि सात्विक असण्याची गरज आहे. लोकांचे एकमेकांशी अशा प्रकारे संबंध प्रस्थापित करण्यामागे सण आणि उत्सव यांना महत्त्वाचे आहे. होळी, बैलपोळा, संक्रांत, किंक्रांत, दत्तजयंती, तुकाराम बीज, एकादशी इत्यादी सण या दृष्टीने महत्त्वाचे आहेत.

बैलपोळा हा एक पारंपरिक सण आहे. बैलपोळा या सणाला दुहेरी महत्त्व आहे. या सणाच्या निमित्ताने एकतर गावातील सगळे

लोक एकत्र येतात त्यांच्यात विचारांची देवाणघेवाण होते आणि दुसरे म्हणजे आदिवासींचे त्यांच्या जनावरांवर असलेल्या प्रेमाचे ते प्रतीक आहे. आदिवासींचा मुख्य व्यवसाय म्हणजे शेती. ही शेती आजही अप्रगत अवस्थेतच आहे. त्यामुळे साहजिकच बैल म्हणजे त्यांच्या व्यवसायातील उजवा हातच म्हणावा लागेल. या बैलांवरचे प्रेम, त्यांच्याबद्दल वाटत असणारी कृतज्ञता आदिवासी साजरा करीत असलेल्या या सणामागे दिसून येते.

या दिवशी प्रत्येकजण आपल्या बैलांना सजवितात. ते बैलांची शिंगे रंगवितात. विविध रंगांचे छाप त्यांच्या अंगावर काढतात, बैलांच्या डोक्याला बाशिंग बांधतात. अशा तऱ्हेने बैलांना सजविल्यावर हे आदिवासी बैलांची पूजा करतात, आणि त्यांना पुरणपोळीचा नैवेद्य दाखवितात. त्यानंतर या आदिवासींचा प्रमुख देव असलेल्या भैरवनाथाच्या मंदिरात बैलांना आणतात. या बैलांची लेझीम आणि ढोल यांच्या तालावर वाजत गाजत मिरवणूक काढतात. या मिरवणूकीचा शेवट अंजनावळे गावातील आश्रमशाळेसमोर होतो.

होळी हाही एक पारंपरिक सण आहे. हा सण सुगीच्या काळात म्हणजे फाल्गुन महिन्यातील पोर्णिमेला साजरा केला जातो. या सुमारास शेतीची बरीचशी कामे संपलेली असतात. नवीन पिकं आणि धान्यं आल्यामुळे लोकही खूष आणि आनंदी असतात. त्यामुळे हा सण साजरा करण्यासाठी लोक उत्साहाने भाग घेतात. अंजनावळे गावातील आश्रमशाळेसमोरील मैदानात ही होळी पेटविली जाते. एका घमेल्यामध्ये गोवऱ्या ऊसाची कांठी आणि लाकडे एकत्र ठेवली जातात. नंतर या सर्वांनी एकत्र पुजा केली जाते आणि पुरणपोळीचा नैवेद्य दाखविला जातो. या सुमारास गावातील जमलेले लोक होळीभोवती ढोल वाजवून बोंब मारतात. या सणाच्या बाबतीत एक पारंपरिक कथा सांगितली जाते. पूर्वी भारतामध्ये हिरण्यकश्यपु नांवाचा एक क्रूर राजा राज्य करीत होता. त्याला प्रल्हाद नावाचा मुलगा होता. हिरण्यकश्यपुला प्रल्हादाचा वध करावयाचा होता. परंतु त्याने केलेले दोन प्रयत्न फसले म्हणून हिरण्यकश्यपुची बहीण होलीका हिने प्रल्हादाला मारण्याचे आवाहन स्वीकारले. तिने प्रल्हादला मारण्याचे ठरविले. ती प्रल्हादला मांडीवर घेऊन अग्नीवर बसली. परंतु अग्नीवर बसण्यापूर्वी तिने स्वतःभोवती अग्नीविरोधक वस्त्र गुंडाळले. तिचा हा दुष्ट विचार भगवान विष्णुंच्या लक्षात आला. त्यांनी वाऱ्याच्या सहाय्याने होलीकेच्या अंगावरील वस्त्र उडवून ते प्रल्हादाच्या अंगावर घातले. अंगावर अग्नीविरोधी वस्त्र पडल्यामुळे प्रल्हादाचे अग्नीपासून संरक्षण झाले. परंतु दुष्ट होलीका मात्र मेली. दुष्ट होलीकेचा नाश झाल्यामुळे सगळी प्रजा आनंदित झाली. तो आनंद त्यांनी होळी पेटवून साजरा केला. त्या दिवसाची आठवण म्हणून होळी हा सण साजरा केला जातो. होळीनंतर पंधरा दिवसांनी येणारा गुढीपाडवा हा सणही हे आदिवासी लोक साजरा करतात. हिरण्यकश्यपुचा वध या दिवशी झाला असा या लोकांचा समज आहे. या दिवशी प्रत्येकजण आपल्या दारावर काठी उभारतात, नवीन भांडे व कापड त्यावर घालतात. घरात जेवणासाठी गोडधोड करतात.

संक्रांत आणि किंक्रांत हे सणही महादेव कोळी पारंपरिकतेने साजरे करतात. १४ जानेवारीला गावातील सगळेजण एकत्र जमतात आणि जंगलात शिकार करण्यासाठी जातात. शिकार करून आणलेले ससे, रानडुक्कर इत्यादींची गावाला मेजवानी असते.

दत्तजयंती हाही त्यांचा एक पारंपरिक सण आहे. मार्गशीर्षातील पोर्णिमेला दत्तजयंती साजरी करतात. कुकडेश्वर या गावामध्ये असणाऱ्या कुकडेश्वराच्या मंदिरात दत्तजयंती साजरी केली जाते. या दिवशी येथे जत्रा भरते. काही निमित्ताने शहरांमध्ये रहात असलेले महादेव कोळी दत्तजयंती साजरी करण्यासाठी कुकडेश्वर येथे एकत्र जमतात.

अशा तऱ्हेचे विविध प्रकारचे पारंपरिक सण आणि उत्सव साजरे करण्याच्या निमित्ताने महादेव कोळी एकत्र येतात आणि आपल्या संस्कृतीचे जतन करण्याचा प्रयत्न करतात.

संस्कृतीचे संवर्धन, वृद्धी केवळ तिचे जतन करून होत नाही. कारण संस्कृतीचे जतन केल्यामुळे संस्कृतीची वृद्धी होत नाही तर ती क्षीण होत जाते. संस्कृतीची वृद्धी होण्यासाठी संस्कृतीमध्ये बदल घडून येणे किंवा घडवून आणणे आवश्यक आहे. हे ओळखूनच महादेव कोळ्यांनी अनेक नवीन सण आणि उत्सव यांचे स्वागत केले आहे. गेल्या दहाबारा वर्षात शिवजयंती, नवरात्र, २६ जानेवारी, गणेशोत्सव इत्यादींसारखे उत्सव या भागात साजरे होऊ लागले आहेत. संस्कृतीच्या संवर्धनासाठी, नवीन मूल्यांचे व विचारांचे स्वागत आणि परिचय करून देण्याच्या दृष्टीने या सणांना महत्त्व आहे.

**संस्कृतीच्या संवर्धनासाठी साजरे होणारे सण-**

गणेशोत्सव, २६ जानेवारी, शिवजयंती हे उत्सव या आदिवासी भागात अलिकडेच सुरू झालेले आहेत. हे उत्सव साजरे करण्यात आदिवासी तरुणांचा महत्त्वाचा सहभाग आहे. शिक्षणाच्या निमित्ताने तसेच नोकरी, आठवड्याचा बाजार इत्यादी अनेक गोष्टींच्या निमित्ताने आदिवासी जीवनाचा शहरी जीवनाशी जवळून परिचय झाला. या परिचयातूनच शहरी जीवनातील चांगल्या गोष्टी त्यांनी उचलल्या आणि आत्मसात केल्या. वरील उत्सव साजरे करणे हे या अनेक आत्मसात केलेल्या गोष्टीपैकी काही होत. हे उत्सव साजरे करण्यामागचा प्रमुख उद्देश सामाजिक आणि सांस्कृतिक बदल करणे हाच आहे. आदिवासी तरुणांच्या हे लक्षात आले की हे आदिवासी श्रद्धाळू, धर्मावर विश्वास ठेवणारे आहेत, म्हणून जर एखादा सामाजिक, सांस्कृतिक बदल घडवून आणायचा असेल तर हे सण साजरे करण्याशिवाय अन्य मार्ग नाही. हे लक्षात घेऊनच त्यांनी वरील उत्सव साजरे करण्याचे ठरविले.

गणेशोत्सव भाद्रपद महिन्यात दहा दिवस साजरा करतात. गावामध्ये सार्वजनिक गणपती बसविला जातो. या दहा दिवसांमध्ये अनेक सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम करण्यात येतात. भजन, कीर्तन इत्यादींद्वारा आदिवासींमध्ये नवीन मूल्यांचा प्रचार व प्रसार केला जातो.

शिवजयंती ही वैशाख महिन्यात साजरी केली जाते. या दिवशी पोवाडा, शौर्यगीते, समरगीते तसेच शिवाजी राजांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्या जातात.

२६ जानेवारी या राष्ट्रीय सणाला आदिवासींमध्ये काही वेगळेच स्थान आहे. हा राष्ट्रीय सण घरोघरी साजरा न होता, आश्रमशाळेतील मुले एकत्र येऊन तो साजरा करतात. अंजनावळे येथील आश्रमशाळेतील मुले हा सण फार चांगल्या पद्धतीने साजरा करतात. पहाटेच शाळेचे अंगण झाडून स्वच्छ केले जाते. गावातील प्रमुख व्यक्तीच्या हस्ते झेंडावंदन होते. या प्रसंगी गावातील इतर प्रमुख व्यक्ती विद्यार्थ्यांना हिताचे दोन शब्द सांगतात. सर्वात महत्त्वाची आणि कौतुकाची गोष्ट म्हणजे ही आदिवासी मुले मराठी बरोबरच हिंदी आणि इंग्रजीमधून देशाच्या इतिहासाबद्दल माहिती देतात. आता हिंदी

आणि इंग्रजी मधून भाषण देण्याचा त्यांचा प्रयत्न कितीही वादाचा असला तरी देखील तो त्यांच्या प्रगतीवर, जगाच्या बरोबर जाण्याच्या ईर्षेवर नक्कीच प्रकाश टाकतो. या दिवशी रात्री आश्रमशाळेतील मुले एकत्र येऊन विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम करतात. आम्ही ज्या प्रसंगी उपस्थित होतो तेव्हा दोन मुलींनी हुंडाबळीवर खूप सुंदर नाच केला होता तसेच दारूबंदीवरही कार्यक्रम झाला. म्हणजे विविध गुणदर्शनाच्या नावाखाली हुल्लडबाजीचा प्रकार जो की आज शहरांमधील शाळांमधून दिसतो तो दिसला नाही. तर या प्रसंगीसुद्धा या आदिवासी मुलांमध्ये त्यांच्या समाजाबद्दल, समाजात काय घटना चालल्या आहेत, आणि त्यावर कसे भाष्य करावयास पाहिजे याची जाण आहे. आदिवासी मुलांचा हा प्रयत्न वाखाणण्यासारखा आणि शहरातील मुलांनी शिकण्यासारखाच आहे.

अशा तऱ्हेने २६ जानेवारी, गणेशोत्सव व शिवजयंती इत्यादी उत्सव साजरे करून महादेव कोळी आदिवासी हे त्यांच्या समाजात जागृती आणण्याचा, बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करताना दिसतात.

दसरा आणि दिवाळी ते सांस्कृतिक सण आहेत. दिवाळी ही राम-सीतेचे लग्न असते म्हणून साजरी केली जाते. नवरात्रीचा उत्सव अलिकडेच साजरा करावयास सुरुवात झालेली आहे. भैरवनाथाच्या मंदिरात नवरात्र १० दिवस साजरे केले जाते. पहिल्या दिवशी घटस्थापना केली जाते. सात प्रकारची धान्ये, गहू, सातु, हुलगा, वाल, साळी, नाचणी आणि हरबरा एकत्र करून केळीच्या पानावर त्याचा ढीग केला जातो. या ढीगावर पाण्याने पूर्ण भरलेले मातीचे भांडे ठेवले जाते. विड्याचे पान, नारळ, हळकुंड, कुंकू आणि फुले त्याला वाहिली जातात. दहाव्या दिवशी धान्ये उगवून वर आलेली असतात. विजयाचे प्रतीक म्हणून स्त्रिया ते उगवलेले धान्य डोक्यात घालतात. असे करण्यामागे त्यांचा असा विश्वास आहे की देवाने क्रूर राक्षसांना ठार मारून शांतता पसरविली. या दिवशीही लोक आपट्याची पाने एकमेकांना वाटतात.

अशा तऱ्हेने आदिवासीमधील सामाजिक आणि सांस्कृतिक बदलाचा अभ्यास करीत असतांना ते साजरे करीत असलेले सण आणि उत्सव यांना महत्त्वाचे स्थान आहे. कारण त्यांच्या माध्यमातूनच सांस्कृतिक मूल्यांचे जतन केले जाते आणि नवीन मूल्यांचा परिचय, आणि स्वीकार केला जातो.

● ● ●

*(पान ५५ वरून)*

होलीकासारखी दुष्ट स्त्री मेल्यामुळे राज्यातील सर्व जनता आनंदित झाली. त्या दिवसापासून दुष्टांचा नाश करणाऱ्या अग्नीच्या उपासनेस सुरुवात झाली. सर्वांना आनंदित करणारा हा दिवस लक्षात रहावा म्हणून होळी हा सण साजरा करण्यास सुरवात झाली.

अशा तऱ्हेने विविध आदिवासी जमातीत होळी हा सण त्यांच्या सांस्कृतिक आणि धार्मिक विविधतेनुसार साजरा करीत असले तरी या जमातीमध्ये या सणाचे स्वरूप सामाजिक आहे हे विसरून चालणार नाही.

● ● ●

*इंग्रजी ग्रंथ परिचय*

# एका ब्रिटिश पर्यटकाच्या दृष्टीतून हिमाचल प्रदेशातील आदिवासी जीवन व पारंपरिक स्थापत्यशैली

सुषमा सोनक

**एक निर्धास्त प्रवास.**

"कुलू; द् एण्ड ऑफ द् हॅबिटेबल वर्ल्ड" हे पुस्तक १९७२ साली प्रथम प्रकाशित झाले व पेपरबॅकमध्ये ते १९८९ साली आले. पेनेलोप चेटवूड, या इंग्रज स्त्रीने कुलू, मनाली व पार्वतीच्या खोऱ्यात स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काली केलेल्या प्रवासाची कथा तिने यात सांगितली आहे.

यातील लक्ष वेधून घेणारी पहिली गोष्ट म्हणजे या संपूर्ण प्रवासात ती एकटी असतानाही स्वतःच्या सुरक्षिततेबाबत अतिशय निर्धास्त आहे. याचा अर्थ तिच्यावर कठीण प्रसंग येत नाहीत किंवा येऊ शकत नाहीत असे नाही. उदाहरणार्थ या तिच्या प्रवासादरम्यान अपरात्री एका आडजागीच्या सरकारी विश्रामगृहात एक सहप्रवासी तरुण तिच्या खोलीत शिरून लगट करू पहातो. तेव्हा त्याला खोलीबाहेर काढून, त्या जुनाट दरवाजाचा होता होईल तेवढा नीट बंदोबस्त करून ती झोपी जाते. या अनुभवाचा ती स्वतःशी वाद करीत नाही वा त्यामुळे भयाची गठडी वळून ती पुढील प्रवासाचा बेतही रद्द करीत नाही. मात्र "वयाने तू माझा मुलगा शोभतोस रे" एवढेच त्या तरुणाला ती सांगते.

तसेच यानंतर काही दिवसानी रोहतांग पासजवळील एका गुहेत, जिथून पुढे केवळ बर्फाचे साम्राज्य सुरू होते अशा ठिकाणी एका रात्री एकटीने राहण्याचा निर्णय घेऊन ती पार पाडते तेव्हा या पूर्वानुभवाची छाया तिला शिवून मागे ओढत नाही. आपल्या अनुभवांना सामोऱ्या जाणाऱ्या तिच्या या वृत्तीतून जाणवते की आपला समाज स्त्रियांसाठी अधिक सुरक्षित व्हावा ही आमची मागणी रास्त आणि अनिवार्य तर आहेच अन् त्याबरोबरच आपल्या मनातील भयचिंता व असुरक्षिततेची सतत धास्तावणारी पातळी ओलांडता येणे स्वतःलाही तेवढेच आवश्यक आहे.

**भटक्या जमातींची आतिथ्यशीलता.**

या प्रवासात तिला भेटलेल्या समाजाच्या विविध थरातील लोकांपैकी तिला सर्वात आवडलेली माणसे, कुलू, मंडी व चंगच्या खोऱ्यातील गद्दी आणि गुजर या भटक्या धनगर जमातीतील होती. त्यांच्यातील स्त्रिया, पुरुष व अगदी लहान मुलांचीही कुठच्याही परक्या माणसाशी निर्व्याजतेने संबंध जोडू शकण्याची क्षमता, त्यांच्यातील आतिथ्यशीलता व अतिशय कष्टमय जीवनातही आनंदी राहण्याची वृत्ती मांडताना तिच्यातून इतरत्र नेहमी डोकावणारा तक्रारीचा सूर संपूर्णतया नाहीसा झालेला आहे. त्यांच्यासोबत घालवलेले क्षण तिला

सूर्याच्या कोवळ्या उन्हासारखे ताजेतवाने वाटलेत.

वाढत्या विकासाबरोबर नाहीसे होत चाललेले चारापाणी, पर्यटनाचा वाढता दबाव, अभयारण्यांची निर्मिती, या सर्व बदलत्या परिस्थितीत आधीच कठीण असलेली गुजरांची जीवनशैली पूर्णतया धोक्यात आलेली आहे. गेल्या पंचवीस वर्षात हा बदल वेगाने घडत गेला आणि आज १९९२ साली हेच गुजर अभयारण्यांविरुद्ध संघर्षाला उभे ठाकले आहेत. पर्यटकही त्यांना शत्रू वाटताहेत. आपल्या घासातील घास काढून देणारी ही माणसे त्यांच्याच प्रदेशातून हुसकावल्या जात आहेत आणि या पार्श्वभूमीवर चेटवूडच्या पुस्तकातील त्यांची चित्रणे, त्यांच्याबरोबर असताना तिला जाणवणारे सुरक्षितपण, ज्याचा तिने वारंवार कृतज्ञतापूर्वक उल्लेख केलेला आहे, त्यांची दानत व मदतभाव या गोष्टी मनात घर करून राहतात व त्यांच्या आजच्या परिस्थितीला कारणीभूत असलेली शहरी जीवनपद्धती आपल्याला शरमिंदी केल्यावाचून रहात नाही.

**साम्राज्यवादी मनोवृत्तीचा पगडा.**

चेटवूडच्या लिखाणातील स्त्री म्हणून पहिला सूर जेवढ्या सहजतेचा आहे आणि आजच्या बदललेल्या परिस्थितीत एका सामान्य पर्यटकाच्या भूमिकेतून तिने केलेल्या गरजू जमातीविषयकच्या नोंदींना दस्तावेज म्हणून प्राप्त झालेले मोल जेवढे उल्लेखनीय आहे तेवढाच तिच्या लेखनातील साम्राज्यवादी सूर खटकल्यावाचून रहात नाही. भारत पारतंत्र्यात असतांना तिचे वडील ब्रिटिश सैन्यातील कमांडर इन् चीफ होते. साहजिकच अगदी लहान वयापासून तिची जडणघडण साम्राज्यवादी मनोवृत्तीनेच केली. या प्रवासात तिला भेटलेल्या समानधर्मी पर्यटकांच्या किंवा तिच्या सइसांच्या बाबतीत तिची ही वृत्ती उफाळून येताना दिसते. खालील प्रसंगात तर तिच्या या वृत्तीचे बोलके उदाहरण सापडते.

सिमल्यावरून कुलूकडे येणाऱ्या तिच्या प्रवासातील एका टप्प्यावर तिला दिल्लीच्या ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस मधील दोघे विद्यार्थी भेटले. ते वयाने तरुण व उत्साही होते. त्यांच्यातील मदतभाव जागृत होता. लेखिकेने त्यांच्याबरोबर जो थोडाफार प्रवास केला त्या दरम्यान त्यांनी तिची सर्वतोपरी काळजी घेतली. याची परतफेड म्हणून की काय, ती सुरुवातीपासून शेवटपर्यंत "माझे ए.डी.सी." असा या पुस्तकात त्यांचा मानहानीकारक उल्लेख करते.

१९३१ साली लेखिकेने सिमला ते कुलू मनाली हाच प्रवास आपल्या आई समवेत खेचरावर बसून केला होता. त्या प्रवासाची अघाद्ध तयारी तिच्या वडिलांच्या ए.डी.सी.ने केलेली होती. त्या प्रवासात गावोगावच्या जमीनदारांनी त्यांना नजराणे दिले होते. देवस्थानांची वाजंत्री त्याच्या स्वागतासाठी हजर झाली होती. सोबत भरपूर शिधा, नौकर चाकर असल्याने खाण्यापिण्याची जय्यत तयारी होती. आजूबाजूची निसर्गशोभा पहाण्यात कसलाच व्यत्यय येण्याचे तेव्हा कारण नव्हते. या सरंजामशाही लवाजम्याच्या वारंवार उभरणाऱ्या आठवणीमुळेच की काय, दोन सुस्वभावी मुले भेटताच लेखिकेने त्यांचे 'आपले ए.डी.सी.

असे नामकरण करून टाकले. ते दोघे आपल्यासारखेच निसर्गाचा आनंद घ्यायला चाललेले प्रवासी आहेत त्यांचा दर्जा आपल्याहून खालचा नाही ही गोष्ट जणू तिच्या ध्यानातून निसटूनच गेली.

यातून जाणवते की खरे पहाता ही कहाणी दोन वेगवेगळ्या काळातील प्रवासांची व आता दुभंगलेल्या मनोविश्वांची आहे. राज्यकर्त्यांची कुटुंबीय म्हणून सर्व सुखसोयीनिशी १९३१ साली केलेला प्रवास अन् त्या मार्गावरील खेचरांच्या भल्या मोठ्या ताफ्याऐवजी फक्त दोन खेचरे अन् एका सईसानिशी स्वतंत्र भारतात एक परदेशी पर्यटक म्हणून केलेला प्रवास यात महद् अंतर आहे. हा प्रवास करताना लेखिका वारंवार मनाने त्या जुन्या विश्वात जाऊन साम्राज्यशाहीला हाक घालतांना आढळते. विशेषत: कोणत्याही सुखसोयींचा अभाव जाणवल्यावर तिच्या जुन्या आठवणी अधिकच जागृत होताना दिसतात.

**स्वातंत्र्यपूर्व काळातील ब्रिटिश मळेवाल्यांचे जीवन –**

ब्रिटिशांनी भारतात अनेक वैशिष्ट्यपूर्ण अशा गोष्टी रुजवल्यात. यापैकी याचा वेधक इतिहास लेखिकेने सांगितला आहे. विशेषकरून सफरचंदाची हिमाचल प्रदेशात लागवड प्रथमत: कधी झाली. ॲप्रिकॉट, पेर, चेरीज अशा अनेक फळांचे मळे त्यांनी या भागात कसे सुरू केलेत, ही लागवड करणाऱ्या इंग्रज मळेवाल्यांच्या जीवनातील सुरुवातीचा कष्टप्रद भाग आणि त्यांची नंतरची चैनीलोलूप जीवनशैली. शिकारीचा त्यांचा हव्यास व इतर भारतीयांशी त्यांचे असलेले संबंध, या साऱ्याचे वर्णन करण्यासाठी लेखिकेने त्यांच्या दैनंदिन्या, जुनी गॅझेटे, तसेच एका मळेवाल्याच्या वंशज स्त्रियांच्या प्रत्यक्ष मुलाखती अशा विविध ठिकाणाहून माहिती गोळा केली आहे. तिने घेतलेल्या मुलाखतीपैकी बार्बारा अन् हिलरी डौनाल्ड या दोन बहिणींच्या आठवणीतून तत्कालीन ब्रिटिश समाजाचे जिवंत चित्र आपल्यासमोर उभे रहाते.

१९४७ साली संपूर्ण भारतात इंग्रजविरोधी वातावरण तप्त झाले होते. एके दिवशी या दोन्ही बहिणी नगर या गावी किराणा आणण्यास गेल्या. तेव्हा शाळेतील मुलांनी त्यांच्यावर लहान खडे मारायला सुरवात केली. त्याबरोबर संतापून जाऊन त्यांनी लहान मुलांवर चाबकाचा मारा केला. मुले धूम पळून शेतात जाऊन लपलीत. या प्रसंगानंतरही त्यांचे पूर्वीचे उपकार स्मरून गावकऱ्यांनी त्यांच्या घरी पहारा देऊन त्यांचे रक्षण केले. कोणत्याही बक्षिसाच्या अपेक्षेशिवाय त्यांनी ही जबाबदारी अंगावर घेतली व निभावली. जेते आणि जितांच्या नात्यातील क्रौर्य, आणि माणूसकीचे अंगावर काटा आणणारे दर्शन येथे लेखिकेने घडवले आहे.

**ब्रिटिशांचे इतर परकीय नागरिकांशी संबंध –**

नगर याच गावी स्थायिक झालेल्या निकोलाय रोरिच या रशियन चित्रकाराला भारताशी एकरूप होण्याचा ध्यास होता. त्याच्यापासून नगरमधल्या सर्व इंग्रजी समाजाने सदैव कसे अंतर राखले हे या ध्यानात घेण्याजोगे आहे. आज नगरमध्ये रोरिचच्या घराचे रूपांतर त्याच्या कुटुंबियांनी कला दालनात केले आहे. तेथे त्याची चित्रे व

त्याने जमविलेली भारतीय शिल्पे पाहण्यासारखी आहेत. लेखिकेने त्यांच्याविषयी फारशी संयुक्तिक कारणे न देता उपहासच व्यक्त केला आहे.

**इंग्रजांचा स्थानिक परिसरावर प्रभाव –**

आपली सत्ता एखाद्या समाजात रूजवण्यासाठी केवळ त्या समाजातील लोकांच्या जीवनशैलीचा कायापालट वा मेकॉलेप्रणित मनोबदल एवढेच मर्यादित ध्येय इंग्रजांनी ठेवले नाही. जिथे ते गेले तेथे ते आपल्या बरोबर इंग्लंडचा एक तुकडा घेऊन गेले व जमिनीतून उगवणारी पिके, फळे, फुले, या सर्वांवरच त्यांनी आपली छाप उठवण्याचा प्रयत्न केला. आज आपल्या देशात अगणित स्थळांचा तोंडवळा येथे आलेल्या प्रत्येक राज्यकर्त्यांनी आपआपल्या संस्कृतीनुसार घडवायचा आटोकाट प्रयत्न केलेला दिसून येतो. या प्रयत्नात त्यांना कधी यश आले, कधी नाही.

**पारंपरिक स्थापत्य शैली –**

तत्कालीन ब्रिटिश समाजाच्या या कार्यपद्धतींचे वर्णन करून लेखिका त्या भागातील स्थापत्य शैलीकडे वळली आहे. दगड, लाकूड व तुळया एकमेकांवर रचून बांधलेली ही घरे भूकंप व इतर नैसर्गिक उत्पाततातही टिकून रहातात असे हिमाचल प्रदेशातील नागरिक आजही अगदी छातीठोकपणे सांगतात. ह्या पारंपरिक बांधकाम शैलीचा वापर न करता इंग्रजांनी आपल्याच पद्धतीने या भागात बांधकाम केले म्हणून लेखिका खूप हळहळते. मनाली व कुलूतील अधिकाधिक वाढत्या वेगाने होणारे पाश्चिमात्य विद्रुप बांधकाम पहातांना आज लेखिकेच्या या दूरदर्शीपणाचे महत्त्व पटते. तिने या भागातील मध्ययुगीन प्राचीन हिंदू व आदिवासी मंदिरांच्या बांधकाम पुस्तकात हिमाचल प्रदेशातील अनेक मंदिरांचे वर्णन केलेले आहे. कुलूच्या खोऱ्यातील परिसराचा विचार करून व तेथील उपलब्ध सामग्री वापरून लोकांनी स्थानिक शैली निर्माण केली तिचे विवेचन करतांना कुलू खोऱ्यातल्या पारंपरिक स्थापत्य शैलींची उदाहरणे लेखिकेच्या वर्णनातून जशी जिवंतपणे उभी राहतात, तसेच एकूणच परिसराचे, आणि समाजाचे ख्रिस्तीकरण व इंग्रजीकरण करण्याचा इंग्रजांचा अट्टाहासही दिसतो.

**धरसोडीची भूमिका –**

आणि म्हणूनच साम्राज्यशाहीचा पुळका असूनसुद्धा या लेखिकेने, केवळ या इंग्रजीकरणाची भलावण न करता त्या पलीकडे जाऊन त्या प्रदेशातील सामाजिक, धार्मिक, स्थापनीय व भौगोलीक परिस्थितीविषयी विस्तृत माहिती गोळा केली आहे ही विशेष गोष्ट आहे. या माहितीत ज्या चुका व गैरसमज आढळून येतात ते खास पाश्चिमात्य चष्म्यातून ती जेव्हा जेव्हा पहाते तेव्हा उद्भवतांना दिसून येतात. त्यातून या अभ्यासाच्या व लेखनाच्या अंगभूत मर्यादा स्पष्ट होतात.

बेदरकारपणे इंग्रजी साम्राज्यवादाचे समर्थन करण्याची प्रवृत्ती, भारतात ख्रिस्ती धर्माचा प्रसार केलेल्या मिशनऱ्यांविषयीचा भावूक कळवळा व त्याबरोबरच त्यांनी उखडलेल्या येथील लोकदैवतांविषयी अतोनात आकर्षण, ब्रिटनमधील सुखसोयींचा सहज स्वीकार आणि त्याबरोबरच कुलूच्या खोऱ्यातील सौंदर्यस्वादाचा रसभंग करण्यासाठी बससुद्धा येऊ नये अशी वारंवार

प्रगटणारी इच्छा, मुक्या जनावरांवर दया, व माणसांना अवमानितपणे वागवण्याची वृत्ती, अशा परस्परांविरोधी कल्पना ओढी व धाग्यांनी भरलेले आपले व्यक्तीमत्व लेखिकेने येथे मांडले आहे. कमी अधिक प्रमाणात अशा परस्परांविरोधी कल्पना मध्यमवर्गीय भारतीय समाजातही सापडतातच.

कुलू खोऱ्यातील भव्य निसर्गदृष्यांचे विलक्षण आकर्षण तिला भारतात खेचून आणते व त्याबरोबर स्वातंत्र्यपूर्व काळातील इंग्रजांचे तेथील गतायुष्य तिला खूणवत रहाते. गद्दी, गुजर जमातीचे लोक तिला आवडतात. हे 'आवडणे' म्हणजे नेमके काय? आज अभयारण्याविरोधी कडवी भूमिका घेणारे, पर्यटकांच्या हितसंबंधाना धोका आणणारे आजचे कडवे गूजर तिला 'आवडले' असते कां? कुलू खोऱ्यातील नागरिकांच्या विकासाबाबतची तिची भूमिका, खरे पाहता धरसोडीची आहे हे वाचता वाचता सारखे जाणवत रहाते. त्या प्रदेशातील लोकांच्यासाठी काय योग्य-अयोग्य आहे याचा विवाद तिच्या लेखनात दिसत असला तरी तिचे प्रमुख लक्ष्य मात्र त्या प्रदेशातील पर्यटकाच्या सुखसोयी हेच आहे, व काळ कुठेतरी थांबलेला पहाण्यातच तिला गम्य आहे असे वाटते.

**थिटा दृष्टीकोन.**

सर्वसामान्य मध्यमवर्गीय भारतीयांची मनोवृत्ती याहून वेगळी कुठे आहे? आपल्या प्राचीन संस्कृतीचे दमन कसे होत गेले या इतिहासाला मुखर होऊन तो समजून घेतल्याशिवाय आपल्याला आपला पाया कधीच सापडणार नाही. मात्र हा पाया मुळातच तपासून पहाण्याचीही जबाबदारी जशी आपली आहे आणि स्वातंत्र्योत्तर काळात परकीय सत्ता, परकीय लेखक याबरोबरच आपल्याच हातून आपल्या समाजावर अन्याय होत रहातो तेव्हाही त्याची कबुली देण्याचीही जबाबदारी आपलीच आहे हे विसरून कसे चालेल?

स्वतंत्र भारतात एक पर्यटक म्हणून प्रवास करताना येथील दळणवळणीच्या साधनांचा विकास, रोहतांग पासपर्यंत पसरलेले रस्त्यांचे जाळे केवळ निसर्गास्वादात व्यत्यय एवढ्याच मर्यादित अर्थाने लेखिकेला सामोरा होताना दिसतो.

तेथील परिसरावर, समाजजीवनावर, त्यामुळे काय बरे वाईट परिणाम घडताहेत याची तिला जाणीव असली तरी ते तिचे लक्ष्य नाही. ती केवळ तिच्या लहानपणीचे सुंदर स्वप्नवत दिवस पुन्हा जगायच्या ओढीने भारतात येते. हा 'रोमँटिक' दृष्टिकोन तिला सातत्यपूर्वक पेलता येत नाही तेव्हा ती वैतागते. एकूण पहाता तिच्या या दृष्टीकोनाचे थीटेपण टोकरतच रहाते. एवढे असले तरी वारंवार हाक घालणाऱ्या हिमशिखरांना साद देऊन तिने एकटीनेच हा प्रवास आखला व कुलूच्या प्रादेशिक व सांस्कृतिक जडणघडणीच्या इतिहासात भर घालणारे पुस्तक लिहिले आणि तेथील आदिवासी भटक्या जमातींचे चित्र आपल्यासमोर तुकड्या तुकड्याने का होईना मांडले हे महत्त्वाचे आहेच.

● ● ●

## ( फॉर्म ४, नियम ८ नुसार निवेदन )

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रकाशन स्थळ | : | ६४, आनंद पार्क, औंध, पुणे-४११ ००७. |
| २. | प्रकाशन काळ | : | त्रैमासिक |
| ३. | मुद्रक, प्रकाशक व संपादक | : | रामचंद्र केशव मुटाटकर |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | ६४, आनंद पार्क, औंध, पुणे-७. |
| ४. | स्वामित्व | : | महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद<br>६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७. |

मी, रा. के. मुटाटकर जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीनुसार व समजुतीनुसार खरा आहे.

३१ जानेवारी १९९३

**रा. के. मुटाटकर**
***-- प्रकाशक***

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने या नियतकालिकास अनुदान दिले असले तरी, नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

**-- वर्गणीदारांस सूचना --**

ज्यांची वर्गणीची मुदत संपली आहे, त्यांनी पुढील वर्षासाठीची वार्षिक वर्गणी रु. ३०/- फक्त त्वरित पाठवावी, ही विनंती.

*-- संपादक*

**-- लेखकांसाठी --**

'हाकारा' हे आदिवासी प्रश्नांना वाहिलेले एकमेव मराठी नियतकालिक आहे. यातून आदिवासी जीवन, संस्कृती, साहित्य, सण, उत्सव, कला, तसेच आदिवासी कार्यकर्ते व आदिवासींमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे अनुभव, काही सेवाभावी व्यक्तींची व्यक्तीचित्रणे याशिवाय आदिवासींसंबंधीच्या कथा, कविता इत्यादी सर्व प्रकारच्या लेखनांस प्रसिद्धी दिली जाईल. आपण आपले साहित्य नियमित पाठवीत जावे.

*— संपादक*

Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80

## महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण. शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकत्र व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिक शास्त्रे यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यत: आदिवासींबाबत अभ्यासकांना एकत्र आणणे.

मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाचे मूर्त स्वरूप म्हणून 'हाकारा' सुरू करण्यात आला आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारून आपणही या कार्यात सहभागी व्हावे. (संस्थांना फक्त 'हाकारा'चे सदस्यत्व मिळेल.)

मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

आजीव सभासद ३०० रुपये (फक्त व्यक्तिंसाठी)

हाकारा वार्षिक सभासद ३० रुपये (व्यक्ती व संस्था दोन्ही)

परिषदेच्या सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (दि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ॲन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड ड्राफ्ट अथवा मनीऑर्डरने पाठवावी. मनीऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**

रा. के. मुटाटकर, सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.

**आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे.**

हाकारा त्रैमासिकास महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ व भारतीय सामाजिकशास्त्र अनुसंधान परिषद, पश्चिम विभागीय केंद्र यांचेकडून अर्थसहाय्य मिळाले आहे.

Impressions. Bgm. Tel. : 21309